# दत्तकपणा 4

भाऊ नेविल, आणि शुभ दुपार, अधिक खरे, म्हणजे संध्याकाळ, आमच्या मौल्यवान मित्रांना, आज रात्री आम्हाला आनंद आहे कि आम्ही चर्चमध्ये परत आलो आहोत. थोडे उबदार वाटत आहे आणि म्हणून आम्ही प्रयत्न करणार आहोत, जेवढे जलद करता येईल तेवढे, सरळ संदेश वचनात जाणार आहोत.

प्रथम, आम्हाला काही घोषणा करावयाच्या आहेत, आणि एक—एक खास प्रार्थना विनंती. मला तुमची पत्रे मिळाली, जी देण्यात आली होती, आणि बहिणीला जिला वाटत होते कि तिला मेंदुची गाठ आहे. आणि तेथे अजून ही लुईसविला मध्ये. आणि दुसऱ्या सेवकाचा भाऊ, त्याच्या वडिलांना हदय झटका आलेला आहे; आणि तेथे फार पुष्कळ आजारी लोक या आजच्या जगात आहेत. अनेकजण बोलावित आहेत आणि आम्ही खरेच त्यांच्यासाठी हदयापासून प्रार्थना करतो, त्यामध्ये देव आमचे सहाय्य करो.

सामान्यतः माझ्या सेवकाईची पंच्याण्णव टक्के सेवा हीच आहे, की मी आजारी लोकांसाठी प्रार्थना करावी, तुम्ही पाहा, परंतु मला—मला एक असा दृष्टिकोन असा मिळाला की..., मी अजून ही आजाऱ्यांसाठी प्रार्थना करित आहे, आता, आठवण ठेवा. ते त्या बरोबर चालते. परंतु, ओह, आम्हांला जर मंडळी तिच्या योग्य स्थितीत नीट बसलेली मिळाली, तर आणि जर ती व्यवस्थित राहिली यासाठी की आम्ही कामास जावे, तुम्ही पाहा. सर्व व्यवस्थित केले पाहिजे, पाहा, सर्वकाही एकत्रित केले पाहिजे.

काहीतरी दुसरे माझ्या हृदयाला लागून गेले, काही क्षणांपूर्वी. जेव्हा एक वृद्ध सैनिक अनुभवी मनुष्य, त्याचा एक हात व पाय गोळीने जवळजवळ उडणार होता. तो आता मी जे सांगितले आहे ते ऐकण्यास येथे नाहीए. परंतु खरोखर एका राजकुमारासारखा व्यक्ती आहे, त्यांचे नाव रॉय रॉबर्सन, आणि ते येथल्या मंडळीचे विश्वस्थामधील एक आहेत, आणि एक उत्तम ख्रिस्ती व्यक्ती. तो आताच तेथे चालत आला, आणि म्हणाला, “भाऊ बॅन्हम, राष्ट्र अध्यक्षाला विसरू नका.” म्हणाला, “ज्या वेळी तो उतरला मला त्या बद्दल फार वाईट वाटते,” मी त्याला टी.व्ही वर पाहीले होते, “तो त्या विमानांतून उतरत होता, त्याचे अश्रू खाली गालांवर येत होते आणि त्याचे तोंड एका बाजूला वळालेले होते.” तुम्ही जाणता, तो रॉय बरोबर आणि त्यांच्याबरोबर युद्धात असलेला होता.

काहीही का असेना, राजकारणाच्याविषयी त्यांच्याबद्दल जरी वेगळे मत असले तरी, तो आमचा राष्ट्राध्यक्ष आहे. होय महाशय, माझे मत विचाराल तर, मी—मी लोकशाहीचा किंवा प्रजासत्ताकाचाही पुरस्कर्ता नाहीए. मी—मी एक ख्रिस्ती आहे. परंतु मी तुम्हांला सांगतो, मला त्यांच्या प्रती फार मोठा आदर वाटतो, राष्ट्राध्यक्ष दवाईट ईसिनहोवर ह्यांच्याकरिता. महाशय, तो खचित एक महान व्यक्ती आहे, माझ्या विचार करण्याप्रमाणे. जर त्याचे पुन्हा कार्यरत होण्याचे ठरले आणि मला मतदान करायचे असते तर. मी त्याला, माझे मतदान पुन्हा करीन. हे सत्य आहे. मी त्याची चिंता करीत नाही की त्याचे—त्याचे वय शंभर वर्षाचे असून तो वृद्ध आहे, तरीही मी त्यांच्यासाठी मतदान करीन, कारण मला तो आवडतो. आणि आज रात्री आपण त्याची आपल्या प्रार्थनेमध्ये आठवण करूया.

J.T. (जे. टी.), मी खरोखर वाहवा करिन त्या सुंदर सभेबद्दल, जी तुम्ही भरविली होती, तुम्ही आणि भाऊ विल्हार्ड ह्यांनी. जर मी बाहेरून आत आलोय, तर तुम्ही सर्व म्हणाले, “ठीक आहे, आता भाऊ बॅन्हाम, तुम्हाला माहित आहे, *अमुक—अमुक*.”

परंतु हे उत्तम ठरेल मी बाहेर थांबावे आणि तेथून ऐकावे, तुम्ही पाहता ना? [भाऊ, ब्रॅन्हम हसतात.—संपा.] ठीक आहे. अगदी, उत्तम.

माझ्याकडे काही प्रस्ताव आहेत काही मंडळयासासाठी, जर ते तुम्हाला हवे असतील, जर तुम्ही पाळकीय सेवा करण्यास तयार आहांत, आणि तुमचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. आणि, माझा विश्वास आहे की झाले असणार, आणि जर तुम्ही त्यात कायम झाले आहांत. माझ्याकडे एक ऑरिगॉन, तर काही वॉशिंग्टन, कॅलिफोर्नीया, आणि ऑरिझोना, वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. आणि जर तुम्हांला एखादी मंडळी किंवा त्यासारखे, काही घ्यायचे आहे, तर हे चांगले ठिकाण आहे तेथे सुरुवात करता येईल. आणि तेथे जीव सगळीकडे बोलावतायेत, त्यात हे जे भारतीय आरक्षित केलेले आणि जेथे तुम्ही जाऊ इच्छिता. आम्हांला फक्त कळवा, कारण मला आशा आहे की तुम्ही मुळात मुरलेले आहांत. हे खरे आहे. मला हे त्यांना करताना पाहून मी पसंद करितो.

तेथे भाऊ रडल, हे काही दिवसांत, त्यांच्यासाठी तेथे रस्त्याजवळ सभा आयोजीत करीत आहेत. तेथे संजीवनाच्या सभा होणार आहेत, भाऊ रडल. आणि मला—मला पक्के आठवते की मी त्या लहान व्यक्तीला सगळीकडे पाठवत असे, मी प्रयत्नशील असे की त्याला बाहेर प्रचारासाठी जुंपवावे. तो फार लाजाळू होता. तो म्हणत असे, "मला बोलता येत नाही." तुम्ही त्याला प्रचार करताना ऐकायलाच हवे. आमेन. पाहिले? तुम्हाला माहित नाही की तुम्ही काय करू शकता जर तुम्ही पवित्र आत्म्याला आपल्यावर पकड ठेऊ दयाल तर. हे सत्य आहे.

आणि भाऊ ग्रॅहम स्नेलिंग हे उटिका येथे, आणि भाऊ ज्युनियर जॅकसन तेथे खाली. आमच्या—आमच्या विचारांत ह्या सर्व आमच्या लहान बहिणीचा संबध असलेल्या मंडळया आहेत. आम्ही सर्व एकत्र आहोत. आम्ही आमच्यामध्ये सिद्धांतांवर किंवा आशेवर किंवा उद्दीष्टावर मतभेद करीत नाही, आमचे सिद्धांत, हे एक आहेत. आम्ही एकत्र उभे आहोत, अगदी सर्वकाही एकत्र. आम्ही जणूकाही एकच मंडळी आहोत. आणि आम्हाला नक्कीच त्या सर्व ठिकाणी पसरलेल्या अशा आवडतील; काही आफ्रिकेमध्ये आहेत, काही भारतात आहेत, आणि सगळीकडे, देशभरामध्ये. तेच आम्हांला हवे आहे की, सुवार्ता पसरवली जावी.

आणि मी पाहत आहे हे तरुण व्यक्ती पुढे येत आहेत, जसे येथे भाऊ जे. टी. पार्नल आहेत, आणि—आणि भाऊ विलार्ड आणि कित्येक, जेव्हा ते येतात, हे तरुणजण, जेव्हा मी म्हातारा होत आहे. जर का पुढे भावी काळ आहे, तर ते उदयांचे व्यक्ती बनोत. माझी इच्छा अशी आहे की हा संदेश कधी मरू नये. आणि तो मरणार नाहीच. तो जगलाच पाहिजे. आणि मला आशा आहे की तो आणण्यासाठी फार विलंब नाहीए.

एक लहान तान्हे बाळ मरणार आहे असे ते म्हणाले, बहिणी, मी पाहत आहे की आजच्या पूर्ण दिवसात ते तुला मिळाले आहे. हे फार चांगले आहे. आम्ही त्याबद्दल प्रभूचे आभारी आहोत, कारण प्रभू कृपाळू आहे, दयेने परीपूर्ण आहे. तेथे जे तुला सांगण्यात आले त्यावर विश्वास करीत राहा. पाहा, सर्वकाही ठीक होईल.

आता, तुम्ही ह्या शिक्षणात आनंद पावत आहां काय? तुम्हांला शिक्षण आवडत आहे ना? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] ओह, मी—मी—मी खरोखर विचार करतो की ते आमचे चांगलेच करते. आजाऱ्यांसाठी प्रार्थना, आणि दृष्टांत पाहणे, आणि दैवी आरोग्य ह्यापासून ते आम्हांला थोडा आराम देते. अर्थात, आता, आज रात्री आम्ही... प्रार्थना सभेनंतर, रात्री, आम्ही आजाऱ्यांसाठी पुन्हा प्रार्थना करू. आम्हांला ते सदैव करणे पसंत आहे, कोणालाही कधीही बाप्तिस्मा देणे.

किती जणांना हे आठवते की जेव्हा मी विजेच्या तारांवर चालत असे? बरे, मला त्या विजेच्या तारांमधून चालावे लागे, कित्येक वेळेला, मला प्रतिदिवशी तीस मैल रानांतून जावे लागे. मला दोनशे ऐंशी मैलाच्या तारांमधून चालावे लागे. मी त्यांतून खाली जात असे, शर्ट माझ्या हाती असे, आणि, ओह, खूप थकलेला, आणि त्या जंगलातून जात असे, आणि त्या हिरव्या झुडूपांना पाही. तेथे मी एका वृद्ध शेतकऱ्यास भेटे आणि झाडाखाली बसून मी त्याच्याशी येशू ख्रिस्ताच्या नावातील बाप्तिस्म्याबद्दल बोलत असे. तो म्हणे, "बरे, मला नेहमीच इच्छा होती की मी बाप्तिस्मा घ्यावा."

मी म्हणालो, "ते खाडीपासून फार दूर नाहीए." आणि तो म्हणत असे...

आणि त्यांच्यातल्या कित्येकांस त्या ठिकाणी मी घेऊन येशूच्या नावाने बाप्तीस्मे दिले. त्यांना त्या प्रकारे घेत असे, जरी कठिण भासे तरी जाई. हे सत्य आहे. कित्येक वेळेला माझ्या कामाच्या जुनाट कपडयानिशी, जाऊन एकास बाप्तिस्मा दिला, परत त्या विजेच्या खांबाजवळ गेलो. तेथे त्या विजेच्या खांबाजनिक रचनेचे काम करी. मी तेथे तारा यंत्राच्या तारा लावणारा होतो व खांबाजवळ एका मनुष्यासह काम करित असे, त्याला प्रभूविषयी बोलत असे. तो म्हणे, "बीली, का, मी एके दिवशी तुमच्या मंडळीत येईन व बाप्तिस्मा घेईन."

2 मी त्याला म्हणे, "त्या वेळेपर्यंत तुला का थांबावे असे वाटत आहे? आपण एका नदीजवळ आहोत, तेथे भरपूर पाणी आहे." त्यांना आताच पकडा. हे खरे आहे. तीच ती वेळ आहे. फिलीप्प म्हणाला...

3 तो षंढ फिलीप्पाला म्हणाला, "येथे पाणी आहे; मला कोणाच्याने मनाई करवेल?" हे सत्य आहे. काहीच नाही. जर तुम्ही तयार आहांत, तर तीच ती वेळ आहे. सैतानाला मुळीच संधी देऊ नका की त्याने कोठे शीरकाव करावा. उदयावर काही सोडू नका ज्या गोष्टी तुम्ही आज करू शकता. उदया कदाचित तुमच्यासाठी येणारही नाही. मला आठवले, एकेवेळी मी तसे केले होते व त्यांतून मला एक धडा शिकायला मिळाला. तेव्हापासून जे त्या एका दिवसात होते ते दुसऱ्या दिवशी करणे, म्हणजे उशीर करणे होय म्हणून ते सोडून दिले.

4 आता, खर पाहता, मला तुम्हांला फार वेळ थांबवत ठेवायचे नाही. परंतु मी जसा काय इतका—इतका गुंतलो गेलो आहे, मला माहितही नाही, परंतु मला फार बर वाटत आहे जोपर्यंत मी माझ्या बाजूला उभा राहत आहे. मला बर वाटत आहे.

5 आता वाचनाकडे जाण्याआधी. थोडया वेळेसाठी, आपल्या माना झुकवू या.

6 हे आमच्या स्वर्गिय बापा, तू जिवंत देव आहेस, सदाजीवी आहेस. जो सुर्य आता मावळला आहे, तोच सुर्य, दानिएलाने त्याकडे पहिले जेव्हा तो मावळला, यिर्मयाने त्याला मावळताना पाहिले होते. आदामाने मावळताना पाहिले होते, येशूने त्याला मावळताना पाहिले होते आणि ते हेच जग आहे ज्यात ते जगले व चालले आणि तू अजूनही तोच देव बनून राहिला आहेस.

7 आज रात्री पुष्कळ विनंत्या आहेत. एक मनुष्य ज्याच्या मेंदूला गांठ आली आहे, एका बहिणीला ही त्याच गोष्टीचे भय आहे. तू एकमात्र आशा आहेस, प्रभू, यांसाठी. ती गांठ फार घातकी झाली आहे, त्याला कोणीही थांबवू शकत नाही. ते डॉक्टरच्याही हाता पलिकडे गेले आहे. परंतु आज रात्री आम्ही ही लहान गोफण घेऊन येतो, जी त्या मेंढराला, पित्याच्या मेंढवाडयात परत घेऊन येईल. आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने आमची प्रार्थना प्रत्यक्ष त्या सिंहाला ठार मारण्यास पाठवितो, ती गांठ भयानक घातक आजारावर, यासाठी की त्यांना सुरक्षीतरित्या तुझ्या मेंढवाडयात घेऊन येईल.

8 देवा, आम्ही, आठवण करतो आजच्या रात्री आमचे प्रेमळ राष्ट्राध्यक्ष, भाऊ डव्हाईट ईसेनहॉवर. प्रभू, या देशाला त्याने मार्ग दाखविला आहे, त्यांनी युद्धापासून आम्हांला वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आश्वासन दिले आहे की कोरियाचे युद्ध समाप्त होईल जर त्याला संधी दिली तर. त्याने मातांनाही आश्वासन दिले आहे की तो त्यांच्या मुलांना परत आणिल. परंतु तो म्हणाला, “मला ते करायचे आहे, परंतु मी ते करू शकत नाही. मी माझे प्रयत्न करू शकेन, परंतु देवाला एकटयालाच ते करावे लागेल.” आणि तू त्याच्या संगती होता, आणि आता प्रभू ते सर्व काही कायम केले आहे. त्यांना ते अगोदरच का दिसू शकले नाही? देवा, मी प्रार्थना करतो की त्याला सहाय्य कर. त्या धाडसी जीवाला तू आशीर्वादीत कर, प्रभू. आणि आम्ही प्रार्थना करतो की तू आमच्यासाठी नंतरही पुढाऱ्यांची निवड कर; प्रभू, तू हे पूर्ण नेमणूकीप्रमाणे घडू दे.

9 आज रात्री तो एक, ज्यामध्ये आम्हाला फार रस वाटतो, आमच्या देशाच्या सार्वजनिक हिताच्या गोष्टीशिवाय, महान व गौरव युक्त जो एक राज्य स्थापित करण्यासाठी येत आहे ज्याचा अंत होणार नाही, तो तुझा पुत्र, येशू ख्रिस्त. मग ते शस्त्रास्त्रांची रास करतील, युध्द संपल्याचा इशारा ऐकतील आणि त्यानंतर कधी युद्धे होणार नाहीत. ते द्राक्षमळे लावतील आणि ते त्याचे फळ खातील. ते घरे बांधतील, त्यात राहतील. आणि त्यानंतर त्यांना कसलीही अडचण पडणार नाही.

10 आम्ही वचनाजवळ येत असताना आम्हांस आशीर्वादित कर. आणि, पित्या, तुला हे कारण ठाऊक आहे, शास्त्रलेखातून तुझ्या वचनाजवळ मी येत आहे. याचे कारण मला—मला असे वाटते की तुझी तशी इच्छा आहे मी त्याप्रमाणे करावे, ही तुझी दैवी इच्छा असून तुझ्या व्यवस्थेत आहे, हि त्यामध्ये...ही दिवसाची व्यवस्था आहे, यासाठी की लोकांना आपले स्थान व नेमणूक सांपडावी आणि त्यांनी युद्धाच्या काळासाठी सिद्ध व्हावे. जसे आमच्या एका भावाने तुला प्रार्थना केली, ज्याला फार काळ झाला नाही, म्हणाला “ओह, प्रभू या लांब काळापर्यंत तू आम्हांला प्रशिक्षण दिले आहे.” आता, पित्या, आम्हाला आमचा दर्जा दे. आम्ही जे करावे ते करण्यासाठी आम्हाला बाहेर काढ, यासाठी की आम्ही पित्याच्या कामांत असावे. हे आम्ही तुला प्रभू येशूच्या नावाने मागतो. आमेन.

11 आजची दुपार कहिसी विस्मयकारक दुपार भासते, लुईसवीले येथील एक प्रसिद्ध डॉक्टर व त्याची नर्स यांच्याशी बोलत होतो. त्यांनी गौरवी प्रभूच्या गोष्टी ऐकल्या. आणि तिचे वडील एक डॉक्टर होते. आणि ती दुपारच्या वेळी आली आणि माझ्या खोलीत आली. एक आश्चर्यजनक व्यक्ती. काहीशी थोडी कठीण, तुम्हाला माहीत आहे कट्टर प्रकारची, सुरुवातीपासूनच खरी प्रेसबेटेरियन, परंतु तिच्या गालावर अश्रूंची धार वाहत होती. ओह, मी...डॉक्टरच्या कार्यालयात, नर्सेसमध्ये, सगळीकडे हे दिसून येते, देवाने त्यांच्यात घातले आहे. मला वाटत नाही, नॉर्टन्स इन्फरमेरी इस्पीतळात येथे एकही नर्स नाही, की मी तिला साक्ष दिली नाही पवित्र आत्मा मिळण्याबाबत, आणि मी तीला विचारले नाही की तिने येशूच्या नावाने बाप्तीस्मा घेतलाय काय. कोठे ही मला असा एकही डॉक्टर दिसला नाही ज्याच्या संपर्कात मी आलो नाही...पाहा?

12 त्याबद्दल त्यांना सांगा. आमच्याकडे जास्त वेळ राहीला नाही, भावा. ते कितीही कठीण असे का ना भासो, फक्त थांबा जिथपर्यंत शेवटचा श्वास सोडून पलीकडे जाऊन पाहू, तेव्हा तुम्हाला वाटेल अरे मी ते केले असते तर खरंच बरे होते. होय महाशय. त्या वेळेपर्यंत थांबू नका, ते आताच करा. हीच ती वेळ आहे. ओह, ते असहमत असतील, अनावश्यक बडबड, संताप करतील, परंतु त्याचा तसा विचार नव्हता. त्यांचा खरोखरच तसा अर्थ नाहीए. ते—ते—ते ठीक आहेत. ते तुमच्या बद्दल अनावश्यक बडबड करतात, फक्त—फक्त आठवण ठेवा, त्यांचे—त्यांचे तसे म्हणणे नाहीए. त्यांना तसे करावे असे

शिकवीले असावे त्यामुळे ते त्याला टांगुन राहतात, म्हणून तुम्ही त्यांच्या कल्पना ओळखू शकतात. तुम्ही त्यांच्याशी बडबड करू नका, तुम्ही कोणाशीही अनावश्यक बडबड करु नका, परंतु त्यांवर प्रेम करा. नंतर त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

13 बरे, आपण ९व्या वचनाकडे खाली आलो असे मला वाटते, मला माहित नाही. पुरुषांनो, ते तिसऱ्या अध्यायापासून खूप दूर आहे, नाही का? परंतु, ओह, माझ्यासाठी ती खडकातील मध आहे. आम्ही आता बोलत होतो, आठवा, म्हणजे पुन्हा एकदा त्याची पार्श्र्वभूमी पाहूया. आणि आता, भाऊ नेविल, तुम्ही—तुम्ही मला जरा ओढा जर मी वेळेकडे न पाहता एकसारखा पुढे बोलत राहिलो तर. यासाठी की मला आजाऱ्यासाठी प्रार्थना करता येईल. आम्हाला कणन कण सुद्धा हवा आहे. आणि आज रात्री माझी इच्छा आहे की वेदी जवळ बोलवावे. मी...येथे संपवितो यासाठी की बाकीचे राहिलेलं मला वाचता येईल.

14 परंतु त्याचा उद्देश हा आहे की, ख्रिस्तामध्ये आम्ही आमची स्थिती पाहावी, ते असे नाही पाहावे की ज्यामध्ये तुम्ही, तुम्ही अडखळाल किंवा दुसरे काही...जेथे तुमचा फायदा होईल, परंतु तेच स्वतः देवाने, आमच्यासाठी केले आहे. हे ह्यासाठी नाही झाले की तुम्ही फार चांगले होता आणि एका रात्री चर्चला जात होता आणि कोणा एका भावाने तुम्हांला वेदिकडे जाण्याचा रोख दाखविला. आणि ते तसे नव्हतेच. तो देव होता, जगाच्या पायारंभाअगोदर, त्याने सार्वकालिक जीवनासाठी तुमची नियुक्ति केली. जेव्हा तुम्ही त्या दिवशी तेथे जाल, यात काहीच आशचर्य नाही, की ते चाळीस...चोविस वडिल ज्यांनी आपली मुकुटे काढली, प्रत्येकांनी आपले मुकुट काढुन ठेवले आणि उपडे पडले, त्यांच्याकडे काहीही नव्हते म्हणण्यासारखे, नाही प्रचारक, नाही वडील, कोणीही नाही. सर्व स्तुती कोकऱ्याला आहे! त्यादिवशी देव त्याच्यामध्ये सर्व गोष्टी करील. ओह, जर आम्ही ते जाणले व ओळखले तो कोण होता ज्याला त्यांनी क्रुसावर खीळले होते. आता त्या वर...

15 आम्हाला पार्श्वभूमी कळण्यासाठी, आपण 8 व्या वचनापासून सुरुवात करुया.

> *सर्व ज्ञान व बुद्धि ह्यांच्यासह त्याने ही कृपा* आपल्यावर *विपुलतेने केली आहे;*
>
> *त्याने स्वत:च्या इच्छानुरूप स्वसंकल्पाचे रहस्य* आपल्याला *कळविले,...*

16 "त्याच्या इच्छेची रहस्ये." आणि लक्षात ठेवा आम्ही त्यावर कसे टांगलो आहो? आजच्या सकाळी कितीजण येथे आहेत, पाहूया. येथे आम्ही कसे त्यावर थांबलो होतो, "त्याच्या इच्छेचे रहस्य." आता, ही काही छोटी गोष्टी नाहिए, मग ते रहस्य आहे. देवाची इच्छा ही एक रहस्य आहे. आणि प्रत्येक मनुष्याला देवाची इच्छा शोधायची आहे त्याच्या किंवा तिच्या स्वत: साठी, देवाचे रहस्य.

17 आम्हाला ते कसे सापडले? पौल, ज्याला हे कळविण्यात आले. त्याने सांगितले की त्याला ते मनुष्यांपासून मिळाले नाही, रक्त आणि मांस याने नाही. तो कोणत्या शाळेत गेला नाही, नाही कोणत्या सेमेनरीमध्ये. त्याचे त्यांजशी काही कर्तव्य नव्हते. परंतु त्याला...हे येशू ख्रिस्तांकडून प्रकट करण्यात आले, जो त्या दिमिष्काच्या रस्त्यावर त्याला भेटला होता, एका—एका प्रकाश झोतामध्ये, जसा अग्नीचा स्तंभ असतो तसा, आणि त्याला पाचारण झाले. आणि तो अरबस्थानात निघुन गेला व तीन वर्ष तेथे राहिला आहे. भाऊ इगन? तुम्ही कधी त्यावर विचार केलाय का? पौल तीन वर्षे त्या अरबस्थानान होता, भाडयाच्या त्या खोलीत कुठेतरी होता, त्या मजल्यात खालीवर करत होता, त्या सर्व जून्या गुंडाळीबरोबर. त्यांच्याकडे नवीन नव्हते, पौलाने मुख्यतः ते

लिहिले. त्या जुन्या गुंडाळ्यांमध्ये, कसे देवाने सुरुवातीलाच, सार्वकालिक जीवनासाठी आपल्याला पूर्वीच नेमले होते. त्याने कसे येशूला पाठविले, त्याच्या अर्पणाद्वारे आम्हा सर्वांना त्या जीवनाच्या झाडाचा अधिकार मिळाला. ज्यांच्याविषयी त्याला पूर्वज्ञान होते, त्यांना त्याने बोलाविले, ज्यांना त्याने बोलाविले, त्यांना त्याने न्यायी ठरविले, ज्यांना त्याने न्यायी ठरविले त्यांना त्याने अगोदरच गौरविले. देवाने, जगाच्या प्रारंभापासून, आपल्याला पुत्राच्या दत्तकपणासाठी पूर्वीच नेमले होते. आता संपूर्ण सृष्टि ही कण्हत आहे, देवाच्या पुत्रांच्या प्रगट होण्याची वाट पाहत आहे. ओह, मी कल्पना करू शकतो की पौलाकडेसुद्धा आश्चर्यकरक वेळ होता. मला त्याच्याबरोबर असणे आवडले असते. काय तुम्हांलाही नाही काय?

18 आता तो म्हणाला, "त्याने स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले." कधी पवित्र आत्मा तुम्हांवर घ्या, आणि पाहात राहा कसे ते कार्यरत आहे. आज दुपारी जेव्हा जवळजवळ तिस मिनट अभ्यासावर नजर फिरविली, तेवढा वेळ नाही, परंतु त्याच्या निम्मा, त्यावेळेमध्ये पंधरा मिनिटांत. आता मी धावपळीत होतो, आणि मी विचार केला, "ते रहस्य, किती रहस्यमय!" आणि शास्त्रभागाने मला जुन्या करारात नेले, मग पुन्हा नवीन करारात; ते एकत्रित बांधले, त्याच्या येण्याचे रहस्य पाहावे, त्याच्या इच्छेचे गुज, आमचे त्याच्याबरोबर एकत्रीतपणे बसणे याचे रहस्य. लक्षात ठेवा, हे सेमेनरीमध्ये शिकविले जाऊ शकत नाही. हे रहस्य आहे. शिक्षणाद्वारे तुम्ही ते ओळखू शकत नाहीत, दैवी अभ्यासानेही नाही. हे एक रहस्य आहे जे जगाच्या प्रारंभापासून लपवून ठेवले होते, देवाच्या पूत्रांच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहे.

19 माझ्या भावा, माझ्या बहिणी, मला सांगा, आता ही वेळ सोडून, असे कोणती वेळ अशी कधी होती की देवाच्या पुत्रांनी प्रकट व्हावे? इतिहासातही कधी अशी वेळ होती, कि त्यांनी ती वेळ प्रकट करावी की सृष्टीला मुक्तता मिळावी? सृष्टी, सृष्टीही स्वतः कण्हत आहे, त्या प्रकट होण्याच्या वेळेची वाट पाहत आहे. का प्रायश्चित होण्यापूर्वी, पवित्र आत्माही ओतण्याअगोदर, जुन्या कराराच्याही अगोदर व त्यानंतरही तेथे प्रकट होण्याची वेळ नव्हती. ह्या वेळेपर्यंत ते प्रतीक्षा करीत आहेत. आता सर्व काही गोष्टी घडून येत आहेत, व आकार घेत आहेत, एक मध्याचा धोंडा म्हणून, देवाच्या पुत्राचे प्रकट होणे व परतणे, आणि देवाचा आत्मा ह्यां मनुष्यांमध्ये येणे, एवढे तंतोतंत, इतपर्यंत कि त्यांची सेवकाईही ख्रिस्ताच्या फार जवळची असेल की ती ख्रिस्ताशी जोडली जाईल आणि त्याची मंडळी एक होईल.

20 पिरॅमिडच्या इतिहासाचा अभ्यास आजपर्यंत किती जणांनी केला आहे? मला वाटते एका महिलेने तिचा हात वर केला आह्रे ठीक आहे.

21 देवाने तीन बायबल लिहिली. त्यांतील एक आहे आकाशांतील राशिचक्र, हे पहिले बायबल आहे. मनुष्यांना ते जाणण्यासाठी वर पाहावे लागे कि देव वरचा आहे. राशिचक्रचा अर्थ समजा, त्यावर तुम्ही कधी अभ्यास केला आहे काय? ते युगांबद्दल सांगते, अगदी कर्क युगांबद्दल ते सुरुवात दाखविते...ख्रिस्ताच्या जन्म राशिचक्राची पहिली प्रतिमा काय आहे? तर कन्या. शेवटची आकृती कोणती आहे? लिवो सिंह. ख्रिस्ताचे पहिले येणे आणि दुसरे येणे, हे सर्व तेथे लिहिले आहे.

22 मग नंतर बायबल लिहिले गेले, ते दगडांमध्ये, त्याला म्हणतात, "पिरॅमिडस." देवाने पिरॅमिडस मध्ये लिहिले. जर तुम्ही त्याचा अभ्यास केला, पाहा पुरातन इतिहास आणि त्यांची युद्धे, महापुराच्या नाश अगोदर ते कसे बांधण्यात आले होते.

23 तिसरे बायबल हे कागदांवर लिहले गेले, जे महान हुशार व बुद्धीमान जग येणार होते त्यांच्यासाठी. आता, देव काळानुसार खाली उतरला, आम्ही आता सिंह राशित आहोत. आपण आता पिरॅमिडच्या सर्वात वरच्या भागात आहोत. आपण प्रकटीकरण पुस्तकाच्या, शेवटच्या अध्यायात आहोत. शास्त्रज्ञ म्हणतात आम्ही मध्यरात्रीस 3 मिनिटे बाकी आहेत त्यात आहोत ओह, विचार करा, आपण कुठे आहोत.

24 आणि लक्ष द्या, आता पिरॅमिड घेऊया, ते सोपे आहे. ते त्रिकोणा प्रमाणे कार्यरत असते.

25 जेव्हा आम्ही खाली येथे, मंडळींच्या युगाच्या आरंभी, म्हणजे लुथरच्या वेळेच्या सुधारणुकीच्या काळानंतर, जर कोणी मनुष्याने म्हटले कि तो ख्रिस्ती आहे तर त्याचा अर्थ जीवन किंवा मृत्यु होय. ते अशांना ठार मारीत जे म्हणत की मी ख्रिस्ती आहे. त्यामुळे त्यांना फार छळांतून जावे लागे…प्रत्येक युग, प्रत्येक वेळेंतून, तेथे छळ झालेला आहे. “जे सर्व ख्रिस्त येशू मध्ये दैवी जीवन जगू इच्छितात त्या सगळ्यांचा छळ होईल.” लुथरच्या युगात, हे म्हणणे भयानक होते “लुथरन.” तुम्हाला धर्मवेडा समजण्यात येई, आणि ठार ही मारण्यात येई. या लुथरन लोकांना पुष्कळ वेळा खांबावर, जाळून वैगेरे प्रमाणे ठार मारण्यात आले आहे.

26 पिरॅमीडप्रमाणे, मंडळी हि मग कमी होत गेली. ते त्यानंतरच्या कृपेच्या पायरीत येते, त्याला पवित्रकरण म्हणतात, वेस्लीच्या वेळी, जेव्हा त्यांनी अॅन्ग्लीकन चर्चला विरोध दर्शविला, त्यावेळी त्यांनी पवित्रकरण शिकविले. त्यानंतर ते पुन्हा कमी कमी होत गेले, मग त्यांना धर्मवेडे लोग संबोधण्यात आले.

27 येथे किती आहेत जे पूर्वी मेथॉडीस्ट होते किंवा जात होते, किंवा मेथॉडीस्ट चर्चबरोबर संलग्न होते? तुमच्यातले अर्धे, तुम्हांला माहित आहे कि मेथॉडीस्ट चर्चकडे एकेकाळी पवित्र आत्मा होता? मी मेथडीस्ट चर्चमध्ये गेलो होतो आणि त्यांना जमिनीवर पडताना पाहिले आहे, त्याच्या चेहऱ्यावर पाणी टाकताना आणि त्यांना हवा मारत असताना पाहिले आहे, पवित्र आत्मा त्यांच्यावर येऊन राहत असे हे खरे आहे. आता हे सत्य आहे, कंटकीच्या खालील त्या पहाडी भागात तेथे आमचे मेथॉडीस्ट लोक आहेत. तुम्ही लोक हे मंडळींचे सभासदत्व घेणारे आहेत. आम्हांकडे मागे हे मेथॉडीस्ट आणि बॅप्टिस्ट होते आम्ही वेदीजवळ पडत आणि एकमेकांना पाठीमागे लाथा बसत जीतपर्यंत आम्हांला काही मिळत नाही. आम्ही त्यातून येतो, त्यानंतर आम्ही जे जगलो ते वेगळे.

28 परंतु तुम्ही फक्त येता आणि तुमचे नाव तुम्ही वही मध्ये नोंदविता आणि म्हणता, “मी मेथॉडीस्ट आहे.” आणि तुमच्यावर मीठ टाकले जाते आणि थोडे पाणी शिंपडले जाते, आणि तेथेच सर्व संपते. बाहेर जाता आणि अर्धी विजार घालता, चेहऱ्याची सजावट करता, घोड्यांच्या शर्यती लावता, पैज मारता, जुगार खेळता, फठीचे यंत्र खेळता आणि सर्व काही, तरी चांगले मेथॉडीस्ट, पाहा. हे मेथडीस्ट नाही. हे फक्त चर्चचे सभासदत्व घेतलेले आहेत. हे खरे आहे. बॅप्टिस्ट, त्याच मार्गावर आहेत, प्रेसबेटेरियन, ते ही त्यांच्या खालोखालच्याच मार्गावर आहेत.

29 जसे डेविड ड्यूपलेसिस म्हणाले, “नातवंडे, देवाला कोणी नातवंडे नाहीयेत.” देवाला कधी नातवंडे नव्हती. त्याला पुत्र आहेत, परंतु नातवंडे नाहीत. हे खरे आहे. तुम्ही लोक जे मेथडीस्ट चर्चमध्ये येत असत, किंवा पेंटेकॉस्टल चर्च, किंवा बॅप्टिस्ट चर्च कारण तुमची आई किंवा वडील हे पेंटेकॉस्टल किंवा बॅप्टिस्ट आहेत, मग तुम्ही नातू ठरता. ते पुत्र होते. तुम्ही नातू आहात, पाहा, म्हणून देवाला तसे काही नाहीए. चर्चमध्ये तसे पुष्कळ आहे, परंतु—परंतु नाही—नाही…देवाशी तसं नात नाहीए.

30 आता, याकडे लक्ष द्या, जसे खाली उतरतो, तसे खाली होतो, आणि मंडळी अल्पसंख्याक बनत जाते. पेंटेकॉस्टल युग आले. त्याने खचीत पुष्कळ अडथळे छाटले. मग त्याने काय केले? त्याने मेथडीस्ट आणि लुथरन यांना मागे सोडून दिले.

31 आता पवित्र आत्मा हा पुढे पुढे होऊन पेंटेकॉस्टच्या युगातून बाहेर आला आहे. त्यांनी काय केले? ते संघटीत झाले, त्यांनी नावे दिली, "आम्ही असेम्बलीस ऑफ गॉड आहोत. आम्ही वननेस आहोत, आम्ही टूनेस आहोत, आम्ही देवाची मंडळी आहोत. आम्ही *हे* आहोत किंवा *ते* आहोत. तुम्ही त्याच्याशी संबधित नाहीत, तुम्ही स्वर्गात जाऊ शकणार नाहीत जर तुमचे नाव त्या पुस्तकात नाही आहे." अशा निरर्थक गोष्टी! मी त्याची काळजी करीत नाही कि जर तुम्ही बॅप्टिस्ट, मेथडीस्ट, प्रेसबेटेरियन आहात, तुम्ही तुमचे नाव जीवनाच्या पुस्तकात ठेवले जेव्हा देवाने ते ठेवले. जर तुम्ही सार्वकालिक जीवनासाठी पूर्वनियुक्ती केलेले आहात, देव तुम्हाला कशाहीप्रकारे बोलावणारच, कसेही करुन, कोणत्याही—मार्गाने किंवा इतर. तो खात्रीने करीलच. "जे पित्याने मला दिले आहेत ते माझ्याकडे येतील." याने काही फरक पडत नाही कि तुम्ही कुठल्याही चर्चचे का असेना त्याचा त्याच्याशी काही संबंध नाहीए. परंतु संप्रदाय हि एक गोष्ट कधीच करणार नाहीत, परंतु तुम्हाला पुष्कळ अडखळवील कि तुम्ही देवाबरोबर जाऊ नये, परंतु ते काहीही करू शकत नाहीत. सर्व विश्वासी अविश्वासी यांच्या समुदायाला ते एकत्र आणतील. अर्थात, तुम्हाला हे आढळेल जेथे तुम्ही जाल, तेथे आणि त्यांना ते स्वर्गात हि आहे. म्हणून, ते ठीक आहे, परंतु तुम्ही तुमच्या संप्रदायांकडे पाहत आहा. येशूकडे पाहा, तोच एक आहे ज्याच्याकडे पाहत राहावे.

32 आता, जसेजसे आम्ही खाली येत जातो…त्यांच्याकडे होते…कितीजण माझा विश्वास आहे की ही स्त्री जिने आपले हात उभारले होते, तिने त्या पिरॅमिडचा अभ्यास केला आहे. तुम्हाला माहित आहे, कि पिरॅमिड वर कधीच वरचा कळस नाहीए. कधी होता काय? कधीच त्यावर कळसाचा धोंडा नव्हता. कधी नव्हता, कधी सापडला हि नाही. त्यांना माहित नाहीए त्या जशी काय झाले. का? का त्यावर कळसाचा धोंडा घातला गेला नाही, जो माथ्याचा धोंडा, त्यावर का घातला नाही. कारण त्याला नाकारले गेले जेव्हा तो आला. तो नाकारलेला धोंडा होता. हे खरे आहे. परंतु त्यावरचा भाग येईल. हे सत्य आहे. आणि मग जे खडक त्या माथ्याच्या धोंडाशी जुळणारे आहेत, ते सुद्धा त्या खडकासारखे एक खडक बनतील, ते पूर्णपणे सगळीकडून, सांधे जुळले जातील. पिरॅमिड हे एवढे परिपूर्ण आहे की त्याच्यातून वस्तराचे पाते सुद्धा जाऊ शकत नाही, कारण ते इतके एकत्र जोडले गेले आहेत. इतके सुंदर गंवडयांचे काम आहे. काही त्यातल्या दगडाचे वजन हवेत शंभर टनांच्या पटीत होते, आणि ते अशारित्या एकत्र जोडलेले आहेत.

33 त्याच मार्गाने देव आपल्या मंडळीला आणतो. आम्ही अगदी बरोबर रित्या एकत्र जोडलेले आहोत, एक हृदय आणि एकमन. आता कोणी म्हणेल, "बरे, लुथरनकडे त्याकाळी काही नव्हते." तुम्ही विश्वास करित नाही काय? लुथरन हे पुनरुत्थानात उठले जातील जसे इतर ही पुनरुत्यानात उठले जातील. बॅप्टीस्ट, प्रेसबेटेरियन्स, आणि सर्व देवाची मुले, ही त्या पुनरुत्थानात उठतील. आणि त्याच कारणामुळे लोक म्हणतात, "ओह, बरे तेथे एक संजीवनाची लाट येईल जी अशी चालू राहील की एक करोड पेंटेकॉस्टल्सनां वाचविल. ते सर्व वाचले जातील आणि तेथे रुपांतर होईल," तुम्ही चुकत आहां ते शरीराचे रुपांतर हजारो हजारोंच्या शरीराचे होईल, हे खरे आहे, परंतु गेल्या सहा हजार वर्षांच्या तारणाच्या संख्येने ते बनवले जातील. सहा हजार वर्षांपूर्वी मनुष्य प्रकाशात चालतो जसा प्रकाश त्यांच्याकडे येतो, जेव्हा तो पुलांना पार करतो तो

त्यांच्याकडे येतो, आता, जर तो हे नाकारील, तर तो अंधारातच राहील. परंतु जर का तो पुढे जात जाईल!

34 आता, लक्ष दया, मग प्रभू येशूचे येणे हे अगदी जवळ आहे. जोपर्यंत तो आत्मा खाली येत नाही…फक्त केवळ न्यायीपण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, आणि आता ती योग्य म्हणजे माथ्याचा धोंडा येण्याच्या वेळेत, अशा वेळेत. मंडळीला ख्रिस्तासारखे एकदम परिपूर्ण बनवत आहे यासाठी की ख्रिस्त आणि मंडळी ही दोघे एकत्र जोडली जातील, तोच आत्मा. आणि ख्रिस्ताचा आत्मा तुमच्यामध्ये असेल, तो तुम्हांला ख्रिस्ताचे जीवन जगण्यास लाविल, ख्रिस्ताच्या जीवनाची कृती येईल, ख्रिस्ताची कामे करता. "जो माझ्यावर विश्वास ठेवतो, मी जी कामे करतो. तो ही ती करील," येशूने असे म्हटले आहे. पहा? आम्हासाठी, एक सेवकाई येत आहे ती सेवा हुबेहुब ख्रिस्तांच्या जीवनासारखी असेल. ती सेवकाई कशी ओळखली जाते? प्रभूच्या आगमनाची.

35 आजच्या जगाकडे पाहा, आणि लक्ष दया क्रुसचेवने काय म्हटले, सर्व इतर महान गोष्टी, आणि मोठे जागतिक पातळीवर संघर्ष, होणार हे अगदी जवळ आहे, कोणत्याही वेळी, कोणत्याही संकेदाला पीठामध्ये बदलू शकते. हे सत्य आहे. आणि जर ते, आम्हाला माहित आहे ते जवळ आहे. कोणताही जाणता व्यक्ती हे वर्तमान पत्रात वाचू शकतो किंवा रेडियोवर ऐकू शकतो, आणि जाणू शकतो की ते समाप्त झाले आहे. बरे लक्षात ठेवा, हे सर्व होण्यापूर्वी ख्रिस्त आपल्या मंडळीसाठी येतो. म्हणून येशू ख्रिस्ताचे येणे किती बरे जवळ आहे? कदाचित आजची रात्रीची ही सभा समाप्त होण्या अगोदर ही असू शकते. आपण अंतिम समयात. संपूर्ण सत्य आहे.

36 मंडळी कडे पाहा, जसे येतात, तसे जातात. तुमच्या मनात हे पकडून ठेवा, तुम्ही जे इतिहासकार जे इतिहासाचा अभ्यास करता. लुथरन चर्चकडे पाहा जे न्यायीपण अंतर्गत होते, कॅथोलिकच्या शिक्षणांतून नुकताच बाहेर आलेले असे, त्यांकडे जाताना पाहत आहेत. मग वेस्लीकडे पाहा थोडे जवळ येताना, पवित्रीकरणा अंतर्गत, शास्त्र भागात विणले जात आहेत. दरम्यान बरोबर पाहा, वेस्ली. मग मागोमाग येते ते पेंटेकॉस्टल चे युग आणि पेंटेकॉस्टल युग हे आत्मिक वरदानांचे, वरदानांच्या पुर्नउभारणीचे, पाहा आता एक युग येत आहे ते माथ्याच्या धोंडयाचे असणार पाहा, माझा अर्थ काय? प्रभूचे येणे, हे प्रकट केले गेले आहे. देव आणि सर्व निर्मिती ही मंडळीला तिथे स्थान मिळेपर्यंत प्रतीक्षा करित आहे.

37 आजच संकट, ज्यांना मी भेटलो…फार जवळ आहेत,…जेव्हा आपण परदेशी जातो, तुम्ही मिशनरीवाले व तसे तुम्ही ते जाणता. मला चाचणी करण्याची होती मला शारीरिक चाचणीची गरज होती, तुम्ही जाणता, जेव्हा माझी चाचणी होत होती तेव्हा त्यांनी मला खोली बाहेर आणले, मी तेथे पीत होतो…माझ्याकडे जसा पिठाचा गोळा किंवा जेवणा सारखा, किंवा यासारखे काही असे पाहू लागला, आणि मी ते प्यालो होतो. आणि बाहेर येऊन तेथे बसलो, अर्धातासभर थांबलो आणि वाट पाहू लागलो की ते माझ्या पोटांतून गेले कि नाही. मी आजूबाजूस पाहू लागलो, आणि तिथे एक लहान स्त्री होती, ती मला अशी दिसली की जणूकाही मरणारच आहे. तिचे इतके…छोटेसे हात व पाय. आणि मी पुढे गेलो, एक मनुष्यापासून, दुसऱ्या पर्यंत असा पुढे होत गेलो, आणि तिच्या जवळ गेलो, ती जेथे खाली होती. तेथे पोहचलो. ती फार मला दयानिय भासली, मरणाच्या पथास टेकलेली. आणि मी तिच्या जवळ गेलो. मी म्हटले, "मला माफ करा, बाई."

तिने म्हटले, "तुम्ही कसे आहात?" ओह, ती फार आजारी होती!

आणि मी म्हणालो, "काय झाले आहे?"

38 ती म्हणाली, "मी माझ्या मुलीला भेटायला गेली होती टक्सन येथे. तेथे मी आजारी झाले, त्यांना निदान लागत नाहीऐ."

39 मी म्हणालो, "मला तुम्हाला विचारायची आहे एक गोष्ट." मी म्हणालो, "मी शुभवर्तमानाचा प्रचारक आहे. तु ख्रिस्ती आहेस का? जर तो समय आला तर तू तयार आहेस का?"

आणि ती म्हणाली, "मी *अमुक—अमुक* चर्चशी संबधीत आहे."

40 मी म्हणालो, "मी तुला तो प्रश्न विचारला नाही. तू ख्रिस्ती आहेस काय अणि पवित्र आत्म्याने भरलेली आहेस काय आणि जर त्याने बोलावणे पाठविले तर तू जाण्यास तयार आहेस का?" त्या स्त्रीला मी काय म्हणतोय ते कळले सुधा नाही. पाहा? ओह, किती करुणाजनक दृश्य या जगाचे आहे!

41 आता, "त्याने त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य आम्हांला कळविले," त्याचे येणे... मला काही वाचू दया. मी वाचत होतो...आता आपण वळूया, "त्याच्या इच्छेचे रहस्य." इब्रीकरांस पत्राकडे आपण वळूया, फक्त एक मिनिट, इब्रीकरांस पत्राचा 7वा अध्याय, मला वाटते बरोबर आहे. आणि मला ते तुमच्यासाठी वाचायला आवडेल, त्यामुळे तुम्हाला इतके चांगले वाटू शकते, जेव्हा आम्ही स्वतःला स्वर्गीय स्थानात बसल्यासारखे वाटेल. इब्रीकरांस पत्र, 7 वा अध्याय.

> *हा मलकीसदेक,* (आता लक्ष द्या) *शालेमाचा राजा, परात्पर देवाचा याजक...*

42 आता रहस्य काय आहे? येथे ते रहस्य आहे, हे पाहा. हा कोण व्यक्ती आहे, "बनवितो, ओळखतो, त्याच्या इच्छेचे रहस्य," हा मलकी सदेक? मी येथे सगळ्यासाठी थांबत आहे, बायबल अजूनही वळण घेत आहे. इब्रीकरांस पत्र, 7 वा अध्याय, पौल बोलतोय, गलतीकडचा तोच मनुष्य.

> *हा मलकीसदेक, शालेमाचा राजा व परात्पर देवाचा याजक...अब्राहाम जेव्हा राजास ठार मारून परत आला, तेव्हा ह्याने त्याला सामोरे जाऊन आशीर्वाद दिला;*
>
> *व अब्राहामाने त्याला सर्व लुटीचा* दशमांश *दिला; तो आपल्या नावाच्या* अर्थाप्रमाणे *एकतर नीतिमत्वाचा राजा...त्यानंतर आणि दुसरे शालेमाचा राजा* (हा कोण व्यक्ती आहे?) *जो, शांतीचा राजा होता;*
>
> *त्याची माता पिता वंशावळ, जन्मदिवस अथवा त्याच्या आयुषाचा* शेवट... (*ह्यांचा उल्लेख नाही*) *नाही...*

43 हा कोण मनुष्य आहे? तो कोण होता? त्याला पिता कधीच नव्हता, त्याला कधीच आई नव्हती, त्याला सुरुवातच नव्हती, किंवा अशी वेळ ही नाही की तो कधी मरू शकेल. तो अब्राहामाला भेटला जेव्हा तो राजांस ठार मारून परत आला. तो काय करीत होता? तो लुटुन नेलेल्या आपल्या भावांस, लोटास परत आणण्यास गेला होता. आणि त्याने राजांस ठार मारले; ज्या राजांनी त्यांना ठार मारले होते; मला वाटते दहा किंवा पंधरा राजे, आणि त्यांची राज्ये. परंतु अब्राहामाने आपले सेवक तैनात केले आणि त्यांचा पाठलाग केला, त्याने त्या रात्री टोळ्या बनवल्या, पाहा जेव्हा त्याने त्याला पकडले ती रात्रीची वेळ होती. ओह, भावा, आम्ही आता अंधारात काम करित आहोत, आमच्याकडे जो प्रकाश आहे तो

सुवार्तेचा प्रकाश आहे. परंतु त्याने स्वतःस अलग केले आणि त्याला पकडले आणि परत मिळवून घेतले. आणि त्याच्या परतीच्या वेळी, जेव्हा हे युद्ध समाप्त झाले!

44 उत्पत्ती 14 कडे आपण जाऊया, फक्त एक मिनिट, म्हणजे गोष्ट अधिक सोपी होईल. उत्पत्ती मध्ये जाऊया, ...मला वाटते तो चौदावा, उत्पत्ती 14. होय, उत्पत्ती 14:18 घेऊया, सुरुवात करू. थोडेसे त्याच्या अगोदरच्या वचनाने सुरुवात करूया. सुरुवात करूया, होय, 18 वे वचन, उत्पत्ती 14:18, "आणि मलकीसदेक..." आता, अब्राहाम राजांना ठार मारून परत येत होता. परतत असताना, त्या रस्त्यावर, लोटांला, व त्याच्या सर्व लोकांना ज्यांनी लुटले होते ते सगळे परत आणताना. सर्व!

45 दाविदासारखे, ज्याने जाऊन आणि...दाविदाने काय केले? लहानशी गोफण घेतली, बाहेर जाऊन आणि एका लहान मेंढरास सिंहाच्या मुखांतून सोडविले. गोफणीविषयी विचार करा, त्या मेंढरामागे तो गेला. या जगात असे कोण करील? येथे असलेल्या पैकी कोणता पुरुष असे करिल, तुमचे हात वर दाखवा. मी तुम्हांला सांगु इच्छितो जलदरित्या की तुमचे चुक आहे. तुम्ही माझे हात वर पहिले नाहीत. नाही, मी त्याच्यामागे जाऊ शकलो नसतो, छत्तीस जणास घेऊनही, महत्प्रयासानेही. परंतु तो त्याच्यामागे गोफण घेऊन गेला, एक छोटे चामडया च्या तुकडयाचे बनवलेले, दोन्ही बाजूस दोऱ्या असलेले, आणि बांधलेल...आणि जेव्हा गल्ल्याथाला बढाई मारण्याची वेळ येते, तेव्हा तो गल्ल्याथामागे गेला, आणि तो म्हणाला, "स्वर्गाच्या देवाने एका सिंहाच्या तोंडातून मेंढराला माझ्याद्वारे मुक्त केले आणि अस्वलाच्या तोंडातून सोडवले." त्याला हे माहित होते की ती गोफण नाही. हे देवाचे सामर्थ्य होते जे त्याच्या बरोबर चालले होते. तो एक होता ज्याने ते मेंढरु परत आणले.

46 आणि तेच आज आम्ही म्हणतो. दविदाच्या सभोवती देव होता, होय महाशय, जो पित्याची मेंढरे राखित होता. आणि कधीतरी एक गाठ येते, किंवा कर्करोग येतो, किंवा अजून काही, आणि ते डॉक्टरच्या ही हाताबाहेर जाते. ते दाविदाला थांबवू शकत नाही, तो त्या व्यक्तीच्या मागे जाणारच, त्या एका छोटयाशा गोफणीद्वारे, जी, "माझ्या नावाने काहीही मागा, ते तुम्हाला दिले जाईल." मी त्यांची काळजी करीत नाही, डॉक्टर थट्टा उडवतील, आणि सर्वजण त्याची मजा उडवतील, तरी तो त्याच्यामागे जाणारच, त्या मेंढराला पुन्हा कळपात आणण्यासाठी. होय, महाशय, "तो देवाचे मूल आहे, त्याच्यावरुन हात काढ!" त्या सिंहाला तडाखा दे, मग सिंह उठला, त्याने त्याला एकदम दाढीपाशी पकडले आणि ठार केले. एक कोवळा, छोटया उंचीचा, तांबुस वर्णिय, कदाचित त्याचे वजन ऐंशी किंवा नव्वद पौंड असेल.

47 पाहा, मलकीसदेक, शालेमाचा राजा जो शांतीचा राजा, जे शालेमाने वास्तविक टेकडीपलिकडे ठेवले आहे. तो यरुशलेमेचा राजा, तो कोण होता. तेच आहे की तो कोण होता, यरुशलेमेचा राजा. जिला, पूर्वी शालेम बोलावण्यात येई, म्हणजे शांती; ती पहिली यरुशलेम; तिला यरुशलेम बोलविण्या अगोदर. तो यरुशलेमेचा राजा होता शांतीचा राजा. तो नीतिमत्वाचा राजा होता, शांतीचा राजा, शालेमाचा राजा. त्याचे माता, पितरे नव्हते, त्याचा जन्मदिवस अथवा आयुष्याचा शेवट, किंवा वंशावळ नाही. ओह, ओह, ओह! हा कोण व्यक्ती आहे? त्याला पाहा. जेव्हा युद्ध समाप्त होते, जेव्हा विजय हासिल होतो. पाहा त्याने काय म्हटले आहे, "आणि मलकीसदेक," 18 वे वचन, 14 वा अध्याय, उत्त्पती.

*आणि शालेमाचा राजा मलकीसदेक भाकर व द्राक्षारस घेऊन त्यास सामोरा आला; हा परात्पर देवाचा याजक होता.*

*त्याने त्याला येणेप्रमाणे, आशिर्वाद दिला;* आकाशाच्या *व पृथ्वीच्या स्वामी जो परात्पर देव तो अब्रामाला आशिर्वाद देवो.*

*ज्या परात्पर देवाने तुझे शत्रू तुझ्या स्वाधीन* केले *तो धन्य, तेव्हा अब्रामाने त्याला अवघ्याचा* दहावा *भाग दिला.*

48 अजून पुढे वाचूया.

*आणि सदोमाचा राजा अब्रामास म्हणाला, माणसे मला दया, आणि मालमत्ता तुम्ही ठेवा.*

*पण अब्राम सदोमाच्या राजाला म्हणाला, परमेश्वर परात्पर देव, आकाशाचा व पृथ्वीचा स्वामी* (लक्षपुर्वक ऐका त्याने कसे संक्षिप्त केले, कसे त्याने ते त्याला दिले)

*याजसमोर मी बाहु उभारुन सांगतो की, तुमचा एक* सुतळीचा *तोडा किंवा वहाणेचा बंद मी घेणार* नाही, *...मी अब्रामास संपन्न केले असे* म्हणावयास *तुम्हाला कारण न मिळो:*

*ह्या तरुण माणसांनी अन्न* खाल्ले *तेवढे पुरे...*

49 लक्ष दया, हा मलकीसदेक अब्राहामाला भेटला जेव्हा तो राजांना ठार मारून परत येत होता. देवाचे रहस्य आता प्रकट केले गेले आहे! तो कोण होता? कोणीच नाही... त्यांना त्याचा काही इतिहास सापडला नाही, कारण त्याला वडील नव्हते, त्याला आई नव्हती, त्याची सुरुवात दाखववावी अशी वेळ नव्हती, त्याचा मुत्यु दाखववावा अशी वेळ नव्हती, म्हणून तो जे काही होता तो अजूनही जिवंत आहे. त्याची सुरुवात नाही, म्हणून तो दुसरा कोणी असू शकत नाही परंतु एल, एला, एलोहिम; स्वतः अस्तित्वात असलेला, स्वतः वास करुन राहणारा, सर्व समर्थ देव!

50 येशूला पिता होता, येशूला आई ही होती; येशूच्या दिवसांची सुरुवात होती, येशूच्या पृथ्वीवरील जीवनाचा अंत ही होता. परंतु या मनुष्याला नाही पिता ना ही आई, आमेन, माता नाही पिता ही नाही. येशूला दोन्हीही आहेत पिता आणि माता. ह्या मनुष्याला नाही पिता नाही माता. आमेन. आणि त्याने काय केले, युद्ध झाल्यावर, जेव्हा अब्राहामाने आपले स्थान घेतले होते?

51 मंडळी जेव्हा आपले स्थान घेईल, आम्ही पवित्र आत्म्याद्वारे, दत्तकपुत्र म्हणून बोलावलेले आहोत. आणि जेव्हा प्रत्येक मनुष्य आपले स्थान घेईल, ज्यासाठी देवाने त्याला बोलावले आहे, आणि शेवटपर्यंत उभा राहील, हरवलेल्यांना शोधण्यास.

52 प्रथम, पौलाने त्याच्यातून सर्व भीती काढली, म्हणून आता, "जर तुम्हांला बोलावले आहे, जर तुम्ही तुमच्या मनामध्ये काही प्रकारच्या दैव विषयक विचारांनी काम केले नसेल, जर तुम्ही खरोखर आत्म्याने जन्म पावलेले आहांत, तर देवाने जगाच्या स्थापने अगोदर तुमची पूर्वनियुक्ती केली आहे, आणि तुमचे नाव कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात घातले आहे, आणि आता आपण येशू ख्रिस्तामध्ये स्वर्गीय स्थानात बसण्यासाठी एकत्र आलो आहो. एक पवित्र लोक एक पवित्र राष्ट्र, खास लोक, राजकीय याजकगण, आत्मिक अर्पणे देवासाठी देणारे, म्हणजे आमच्या ओठांचे फळ त्याच्या नामाची स्तुती करणारे."

53 लोक आत येतात आणि म्हणतात, "ते लोक वेडे आहेत." खचीत ते आहेत, देवाचे ज्ञान मनुष्यांना मुर्खतेचे आहे, आणि मनुष्याचे ज्ञान देवाला मूर्खता आहे. ते एकमेकांविरुद्ध, आहे.

54 परंतु खरी आत्म्याने भरलेली मंडळी, देवाच्या सामर्थ्याने भरलेली, स्वर्गिय स्थानांत एकत्र बसलेली, देवाला आत्मीक यज्ञ अर्पिणारी, देवाच्या स्तुतीने भरलेली, पवित्र आत्मा त्यांच्यामध्ये कार्य करीत फिरतो, पापाची पारख करतो, आणि चुकीच्या गोष्टींतून बाहेर येणे ज्या त्यांच्यात आहेत त्यासाठी बोलावतो, त्या सरळ करणे आणि त्या सपाट आणि समांतर करणे. कारण काय देवाच्या उपस्थितीत कायम अर्पिलेले रक्तरंजित यज्ञ आहे.

55 आता आठवण ठेवा, आज सकाळी आम्ही त्यांतून गेलो. तुम्ही रक्ताने वाचला नाहीत, तुम्हांला रक्ताद्वारे *वाचविण्यात* आले आहे. परंतु तुम्ही कृपेने तारला आहात, विश्वासाद्वारे, विश्वास पत्करण्याद्वारे. देवाने तुमच्या हृदयात ठोठावले कारण तुम्ही पूर्वनियुक्ती केलेले आहात. तुम्ही वर पाहिले आणि विश्वास केला, स्विकारले. आता रक्ताने पापांसाठी प्रायश्चित्त केले. लक्षात असू दया, मी म्हणालो, "देव पाप्यांना पाप करण्याबददल दोष देत नाही." तो सुरुवातीपासूनच पापी आहे. तो एका ख्रिस्ती व्यक्तीला पाप करतो म्हणून दोष लावतो. आणि मग ज्या कारणांमुळे तो त्याला दोष लावतो, ख्रिस्ताने आमचा दोष घेतला. म्हणून त्यांच्यावर जे येशू ख्रिस्तामध्ये आहेत त्यांना दंडाज्ञा नाही, ते देहस्वभावाने चालत नाहीत परंतु आत्म्याने चालतात. आणि जर तुम्ही काही चुकीचे केले, स्वच्छेने नव्हे. तुम्ही पाप जाणूनबुजून नाही करत. एक मनुष्य जर जाणूनबुजून पाप करितो, तो बाहेर जातो आणि जाणूनबुजून पाप करतो, तो अजूनही त्या शरीरात दाखल झाला नाही. परंतु एक मनुष्य जो पूर्वी तेथे होता, तो मृत्यू पावला आहे, आणि त्याचे जीवन देवामध्ये लपलेले आहे, ख्रिस्ताद्वारे, पवित्र आत्म्याद्वारे सीलबंद केले आहे, आणि सैतान त्याला शोधू शकत नाही, आता पर्यंत तो दूर गेलेला आहे. त्याला सैतानाने गाठण्याअगोदर त्याला तेथून बाहेर यावे लागेल. "कारण तुम्ही मृत आहा!"

56 मृत माणसाला सांगा तो ढोंगी आहे आणि पाहा काय होते ते. त्याला एका बाजूला लाथ मारा आणि म्हणा, "तू ढोंगी, तू ढोंगी," तो एक शब्दही बोलणार नाही. आणि ते खरे आहे, तो तेथे पडून राहिल.

57 आणि एक मनुष्य जो ख्रिस्तामध्ये मृत्यू पावला आहे, तुम्ही त्याला ढोंगी बोलू शकता, त्यांना जे वाटते ते बोलू शकता, तो त्यावर तापणार नाही. जर काही, त्याचा पाय कुठे सरकला आणि तो तुमच्यासाठी प्रार्थना करिल. हे सत्य आहे. परंतु, ओह, त्यांच्यातले काहीजण फार जीवंत भासतात.तेच काय तो मी विचार करतोय, आम्ही मृत व्यक्तींनाच पुरतो. ते जे ख्रिस्तामध्ये मेलेले आहेत, त्यांना आम्ही पाण्यात पुरतो. काही वेळेला आम्ही पुष्कळ लोकांना ते जिवंत असता पुरतो. फार प्रमाणात द्वेष आणि संताप, आणि मंडळीमध्ये हे फारच आहे. परंतु त्यांना आम्ही वेगळे करू शकत नाही, परंतु देव ते करतो. तो त्याच्या लोकांना ओळखतो, तो त्याच्या मेंढरांना ओळखतो. तो प्रत्येक आवाज ओळखतो. तो त्याच्या मुलांना ओळखतो. तो जाणतो ज्यांना तो पाचारण करतो, तो जाणतो ज्यांना त्याने पूर्व नियुक्त केले आहे. तो जाणतो कोणाला त्याने या गोष्टी दिल्या आहेत, कसे तो स्वतःला त्याद्वारे प्रकट करतो…देव आपल्या मुलांमध्ये भरवंसा करू शकतो, नक्की काय करावे, हे जाणतो की ते तसेच करणार.

58 तुम्ही विश्वास करता देव हे करतो? का, सैतानाने म्हटले ईयोबाला एके दिवशी… एके दिवशी देवाला म्हटले, "होय, तुझा एक सेवक आहे."

59 देव म्हणाला, "या पृथ्वीवर त्याच्या तोडीचा मनुष्य नाही. तो परिपूर्ण मनुष्य आहे." त्यांच्यामध्ये त्याला भरवंसा होता.

60 सैतान म्हणाला, "ओह, होय, त्याला सर्व काही सोप्यारितेने मिळते. त्याला माझ्या हाती दया थोडया वेळेसाठी आणि मी त्याला तुला तुझ्या मुखावर शाप दयायला लावीन."

61 तो म्हणाला, “तो तुझ्या हाती आहे, परंतु त्याच्या जीवाला हात लावू नकोस.” पाहा? आणि त्याने सर्व काही केले परंतु त्याचे जीवन घेतले.

62 परंतु, ओह, ईयोबा,…त्याने काय केले? त्याने देवाला शाप दिला काय, जेव्हा त्याच्या देवाने मुलांना ठार मारले, जेव्हा त्याने सर्व वाईट गोष्टी त्याच्यावर आणल्या, आणि सर्व काही? ईयोबाने प्रश्न ही विचारला नाही. तो उपडा पडला आणि भक्ती करू लागला, हालेलुयाह, म्हणाला, “प्रभूने दिले आणि प्रभूने नेले, देवाचे नाम धन्यावादीत असो!” तेथे ते आहे.

63 देव जाणतो ईयोबा वरील भरवंसा. देव जाणतो की तुमच्यावर तो किती भरवंसा करू शकतो. तो जाणतो की माझ्यावर तो किती भरवंसा करू शकतो. परंतु आता जे आपण बोलत आहोत ते पुत्राच्या स्थानावर नेमणूक करण्या संदर्भात.

64 आता, जेव्हा बायबल…जेव्हा युद्धाची समाप्ती होते, जेव्हा सर्व काही समाप्त होते, मग नंतर आम्ही काय करतो? युद्ध समाप्त झाल्यावर मग आम्ही काय करतो? तुम्हाला माहित आहे आम्ही काय केले? आम्ही मलकीसदेकाला भेटलो मत्तय 16:16 कडे वळूया, लगेच, पाहा, जर ते खरे आहे की नाही. संत मत्तय, 16 वा अध्याय आणि 16 वे वचन. मला पूर्ण खात्री आहे की ते बरोबर असणारच, मत्तय 16:16…मत्तय 6…नाही, ते चुकीचे आहे, त्याच्या जवळ नाहीए न? 26:26. ओह, 16 वे वचन येथे. तो शिमोन पेत्राशी बोलत होता; क्षमा असावी, माझ्या म्हणण्याचा उददेश तसा नव्हता. 26:26, ते फक्त प्रभू भोजनासबंधी आहे, तेथेच जाण्याचा मी प्रयत्न करित आहे. मत्तय, 26 वा अध्याय आणि 26 वे वचन. आता ते आम्हांला सापडले, येथे आम्ही आहो, त्या शेवटच्या प्रभू भोजनाच्या वेळी.

> *मग ते भोजन करीत असतांना येशूने भाकरी घेतली व आशिर्वाद देऊन ती मोडली आणि* शिष्यांस *देऊन म्हटले, घ्या, खा, हे माझे शरीर आहे.*
>
> *आणि त्याने प्याला घेतला व उपकार स्तुती करून तो त्यांस दिला व म्हटले, तुम्ही सर्व ह्यांतून प्या.*
>
> *हे माझे नव्या ‘कराराचे रक्त’ आहे. हे पापांचे मोचन* (पापे, ख्रिस्ती व्यक्ती जे चुकीच्या गोष्टी करतात) *होण्यासाठी पुष्कळांकरिता ओतले जात आहे.*

65 ठीक आहे, “परंतु—परंतु…” ऐका, 29 वे वचन.

> *…मी तुम्हांस सांगतो की, मी आपल्या पित्याच्या राज्यांत तुम्हाबरोबर* नवा *द्राक्षारस पिईपर्यंत, येथून पुढे द्राक्षाचा हा* उपज *पिणारच नाही.*

66 काय? तिच गोष्ट मलकीसदेकाने केली, अब्राहामाने आपले स्थान घेतल्यावर. त्याने आपल्या मनुष्यांना व्यवस्थेत आणले, आणि युद्ध जिंकले, आणि घरी परतला, आणि मलकीसदेक भाकर व द्राक्षारस घेऊन सामोरा आला. युध्द समाप्त झाल्यावर, मग आम्ही लग्नाचे भोजन प्रभू येशू बरोबर नविन जगात घेणार. ओह, प्रभूचे नाव धन्यवादित असो. ठीक आहे.

67 “त्यांच्या इच्छेचे रहस्य, त्याच्या स्वसंकल्पानुसार” पुन्हा परत त्याठिकाणी इफिसकरास पत्र 9 वे वचन “त्याने स्वतःच्या इच्छेनुरूप स्वतःच्या ठायी योजले.”

> कालखंडाच्या *पूर्णतेची व्यवस्था लावतांना…*

68 आणि ते लक्षात ठेवा, आम्ही त्यांतून पार झालो. इफिस, 1 ला अध्याय, 10 वे वचन.

> कालखंडाच्या *पूर्णतेची व्यवस्था लावताना…*

69 आता, आम्हाला येथे शिकावयास मिळते कि पूर्णतेची वेळ कशा विषयी प्रतिक्षा करीत आहे? पूर्णतेची वेळ, ती अशी वेळ जेव्हा पाप नष्ट होईल, ती एकवेळ जेव्हा मृत्यू नष्ट होईल, ती एकवेळ जेव्हा आजार नष्ट होईल, तीवेळ जेव्हा पाप नष्ट होईल, ती वेळ जेव्हा सर्व बिघाड (सैतानांनी विकृत केलेल्या गोष्टी) नष्ट होतील, जेव्हा वेळ स्वतःहून नष्ट होईल. पाहा.

> *ती योजना* अशी *की कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना*...*स्वर्गात* व *पृथ्वीवर जे आहे, ते सर्व ख्रिस्तांमध्ये एकत्र करावे:*

70 "ख्रिस्तांमध्ये सर्व एकत्र करावे." जसे मी सकाळी म्हटले, सर्व छोटेछोटे सोन्याचे गोळे जे आम्हांला मिळतात, ह्या महान गोष्टी, त्याला तुम्ही उत्पत्ती, मध्ये तकाकी आणू शकता, तुम्ही निर्गम मध्ये त्याला तकाकी आणू शकता, तुम्ही ते लेवियमध्ये त्याला तकाकी आणू शकता, आणि त्यांच्यामधून, आणि ते प्रकाटीकरणात त्याचा शेवट येशू मध्ये होतो. तुम्ही योसेफास घ्या, तुम्ही अब्राहामास घ्या, तुम्ही इसहाकाला घ्या, तुम्ही याकोबाला घ्या, तुम्ही दाविदाला घ्या, तुम्ही त्या सोन्याच्या गोळ्यातील कोणतेही गोळे घ्या, ते देवाचे मनुष्य, आणि पाहा जर, त्याच्या प्रत्येकात येशू ख्रिस्त दिसत नाही. "तो सर्व गोष्टी एकामध्ये, येशू ख्रिस्तात एकत्र करील."

71 आता थोडे पुढे जाऊया आता, आता 11 वे वचन

> *ख्रिस्ताच्याठायी वतनदार झाले आहे.*

72 ओह, "वतनदार." कोणाला तरी तुमच्यासाठी काहीतरी सोडावे लागते, यासाठी कि वतनदार व्हावे. हे बरोबर आहे ना? वतनदार! आम्हाला कोणते वतन आहे? कोणते वतन माझ्याकडे आहे? माझ्या कडे कुठलेही नाही. परंतु देवाने माझ्यासाठी ते वतन सोडले जेव्हा त्याने माझे नाव कोकऱ्यांच्या जीवनाच्या पुस्तकात जगाच्या स्थापने अगोदर लिहिले.

73 ओह, तुम्ही म्हणता, "आता, एक मिनिट थांबा, भावा, येशूने हे केले जेव्हा तो तुम्हासाठी मरण पावला." नाही, कधीच नाही. येशू ते वतन माझ्यासाठी विकत घेण्यासाठी आला. पुढच्या ओळीतल वचन...वाचा.

> *आपल्याला मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवधे चालवितो*...*त्याच्या* योजनेप्रमाणे आम्ही *पूर्वी नेमलेले असून ख्रिस्ताच्या ठायी वतनदार झालो आहो.*

74 देवाने, जगाच्या स्थापनेपूर्वी, जसे आम्ही या धड्यामध्ये पाहिले, तुम्ही लोकहो, आम्ही कसे देवाला पाहिले जो स्व–अस्तित्व असलेला, कसे त्याच्यामध्ये प्रेम होते. त्याच्यामध्ये म्हणजे देवामध्ये, कारण भजण्यासाठी काही नव्हते. त्याच्यामध्ये म्हणजे तो पिता असावा तेथे...तो स्वतःहून होता. त्याच्यामध्ये तारणारा हा गुण होता ज्यामुळे काही हरवू शकत नाही; त्याच्यामध्ये आरोग्यदानाचागुण होता. हे त्याचे गुण विशेष होते. तेथे अजून काही नव्हते. म्हणून त्याच्या स्वतःने, त्याच्या सत्संकल्पाने या गोष्टी योजील्या होत्या, यासाठी की यात एका माणसाद्वारे, जो ख्रिस्त येशू, त्याच्यात सर्व गोष्टी पुन्हा एकत्र उतराव्या. ओह! "डोळ्याने जे पाहिले नाही कानाने ऐकले नाही..." अदभूत काही नाही ह्या रहस्यमय गोष्टी आहेत!

75 पाहा, "त्याचे वारसदार ठरविण्यासाठी त्याने आम्हाला पूर्वीच नेमले" जर मी काहींचा योग्य वारीसदार आहे, जर देव माझ्या हृदयाला ठोठावतो आणि म्हणतो, "विल्यम ब्रॅन्हम, मी तुला फार पूर्वीपासून बोलावले आहे, जगाच्या स्थापनेअगोदर पासून, सुवार्तेचा

प्रचार करण्यासाठी," माझ्याकडे वारसा आहे, सार्वकलिक जीवनाचा वारसा. आता, देवाने येशूला पाठविले यासाठी कि तो वारसा माझ्यासाठी खरेपणा ठरावा, कारण मी काही केल्याने काहीही करू शकत नव्हतो की—की मला वारसा मिळेल ते पूर्ण कोरे होते, ते वैध होते, मी काही करू शकत नव्हतो. परंतु पूर्णतेच्या काळात, सुयोग्य वेळी, देवाने येशू जो कोकरा पाठविला, जो जगाच्या स्थापनेअगोदर वधला गेला होता. त्याचे रक्त सांडले गेले यासाठी की मी माझ्या वारसाला योग्य ठरावा. काय असल्याचे, कुठला वारसा? पुत्रत्व, म्हणजे देवाचा पुत्र बनणे.

76 आणि आता हे तुम्हाला गुदमरून मारिल. परंतु तुम्हाला हे माहित होते का की देवाचे पुत्र हे छोटे देव होते? किती जण हे जाणत? किती जणांना हे माहित आहे कि येशूने हे सांगितले? पवित्र शास्त्रात, येशूने म्हटले, "तुमचे नियमशास्त्र हे शिकवित नाही का, की तुम्ही देव आहा? आणि जर तुम्ही त्याला देव असे बोलवाल…" ते उत्पत्ती 2 मध्ये देवाने सांगितले आहे कि ते देव होते, कारण ते होते आणि त्यांना पूर्ण अधिकार या जगावर होता. त्याने त्याला सर्वावर धनिपण दिले होते. आणि त्याचे देवत्व तो हरवून बसला, तो आपले पुत्रत्व हरवून बसला, तो आपला अधिकार हरवून बसला आणि सैतानाने ते ताब्यात घेतले. परंतु, भावा, देवाच्या पुत्रांचे प्रगट होण्याची वाट पाहत आहोत जे परत येतील आणि ते त्याचा ताबा घेतील. पूर्णतेच्या वेळेची प्रतिक्षा करीत आहे, जेव्हा पिरॅमिड त्याच्या शेंडयाला पोहचले, जेव्हा देवाचे पूर्ण पुत्र हे प्रकट होतील, जेव्हा देवाचे सामर्थ्य हे चालून येईल (हालेलुयाह) आणि संपूर्ण सामर्थ्य जे सैतानाकडे आहे ते काढण्यात येईल. होय, महाशय, ते त्याचे आहे.

77 तो लोगॉस आहे जो देवापासून बाहेर आला, हे सत्य आहे, तो देवाचा पुत्र होता. मग त्याने मनुष्याला छोटा देव बनविले. आणि तो म्हणाला, "जर ते त्यांना देव म्हणतात ज्यांच्याकडे देवाचे वचन येते, संदेष्टे, ते जर त्यांना 'देव' म्हणते ज्यांच्याकडे देवाचे वचन येते…" आणि देवाने असे म्हटले आहे कि ते देव होते त्याने मोशेला सांगितले, "स्वतः मी तुला देव असे केले आहे, आणि अहरोनाला तुझा संदेष्टा केले आहे." आमेन. काय! म्हणता! मी जरा धार्मिकतेच्या विक्षिप्तपणा सारखा कृती करतो असे वाटते, पण मी तसा नाही आहे, जेव्हा तुमचे डोळे उघडले जातील आणि या गोष्टी पाहाल. ठीक आहे. त्याने मनुष्याला एक देव बनविले, त्याच्या अधिकरातला देव. आणि त्याचा अधिकार एका समुद्रापासून दुसऱ्या समुद्रापर्यंत आहे, एका किनाऱ्यापासून ते दुसऱ्या किनाऱ्यापर्यंत; आणि त्याला त्याचा काबू ठेवता येईल.

78 आणि जेव्हा येशू आला, तो एक देव पापरहित, त्याने ते सिद्ध करून दाखविले. जेव्हा हवा सुटली, तो म्हणाला, "शांत, राहा." आमेन. आणि जेव्हा झाड, तो म्हणाला, "कोणी मनुष्य तुझे फळ कधीही न खावो."

79 "मी तुम्हांस, खचित खचित सांगतो, तुम्ही जे लहान देव आहात, जर तुम्ही ह्या डोंगरास सांगाल कि, 'तू जागेवरून हट,' आणि हृदयात कोणताही संशय बाळगणार नाही, परंतु जे बोलले गेले ते घडून येणारच यावर विश्वास ठेवला तर, तुम्हाला ते मिळेल जे तुम्ही बोललात."

80 उत्पत्तीत सरळ मागे चला, जेथे मुळ आहे, ते काय आहे? आता जग आणि निसर्ग हा कण्हत आहे, वेदना भोगित आहे, सर्व काही हालचाल चालू आहे. काय? देवाच्या पुत्र प्रकट होण्यासाठी, जेव्हा खरे पुत्र, जन्मलेले पुत्र, आत्म्याने भरलेले पुत्र बोलतील तेव्हा त्याचे शब्द परत मिळतील, आता आम्ही त्याच्या कांठावर आहे असा माझा विश्वास आहे. होय, महाशय. ह्या डोंगराला म्हण, आता तसे होवो.

81 “भावा, मला—मला *अमुक—अमुक* पाहिजे, एक गोष्टी घडली पाहीजे. मी येशू ख्रिस्तावर विश्वास करणारा आहे.”

82 “मी ते तुला प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने देतो.” आमेन. तेच प्रकटीकरण आहे.

83 “हो, भावा माझी पिके पलिकडे जळत चालली आहेत. माझ्याकडे पाऊस आला नाही.”

84 “मी तुला पाऊस पाठवत आहे, प्रभूच्या नावाने.” तिथे ती येते. होय, प्रतिक्षा करित, कण्हत, संपूर्ण सृष्टी देवाच्या पुत्रांच्या प्रकट होण्याची प्रतिक्षा करित आहे. देवाने प्रारंभीच सर्व नेमणूक केली आहे. त्याने मनुष्याला धनीपण दिले.

85 त्याने येशू ख्रिस्त दिला, आणि येशूने ते त्याच्या नावाने दिले, ही खात्री दिली, “माझ्या नावाने तुम्ही पित्याकडे काहीही मागा आणि मी ते करीन.” होय, भाऊ, पामर! मंडळी, स्थिती, प्रतिक्षा, करीत आहे देवाच्या पुत्रांची प्रगट होण्याची.

86 जसे मी म्हणालो, इफिसकरांस पत्र हे यहोशवाचे पुस्तक आहे, आणि यहोशवा लोकांना त्याच्या स्थळी ठेवीत होता जे त्याच्यासाठी होते. आता, जर ते आपल्या जागी स्थिर नसतील, आणि त्याने एफ्राईमाला येथे आणि मनश्शेच्या भूमीत ठेवले, आणि *तो* एक परत येऊन चिंतातूर बनून आणि निराश असे, ते कसे एकत्र चालतील? जेव्हा एक म्हणतो, “मी बॅप्टिस्ट, मी मेथॉडिस्ट, मी पेंटेकॉस्टल, मी वननेस, मी टूनेस आहे, मी *अमुक—अमुक* आहे.”

87 तुम्ही हे कसे काय करणार आहात? शांत रहा! देवाची इच्छा आहे की त्याच्या मंडळीला तिच्या स्थानावर नेमावे, देवाचे पुत्र व कन्या म्हणून नेमायचे आहे. देवा, मला जगू दे ते पाहण्यासाठी, ही माझी प्रार्थना आहे. मला असे वाटते की मी फार जवळ आहे आणि मला मी माझ्या हातांनी जणू त्याला अनुभवत आहे. ते तेथे आहेच. तेच मी पाहण्यासाठी लुलपत आहे, जेव्हा रस्त्यांवर चालतो तेव्हा त्या वेळेची प्रतिक्षा करीत असतो; तेथे एक अपंग पडला होता, जो आईच्या उदरापासूनच तसा होता, “सोने किंवा चांदी माझ्याकडे काही नाही.” ओह, देवाच्या पुत्रांच्या प्रकटीकरणाची मी वाट पाहत आहे, हालेलुयाह, जेव्हा देव आपल्या स्वतःला प्रकट करून देईल, तेव्हा आजार थांबवतील ते, आणि ते कर्करोग थांबवतील, ते व्याधी थांबवतील.

88 तुम्ही विचार करता की कर्करोग काहीतरी आहे? बायबल म्हणते एक अशी वेळ येत आहे जेव्हा पुरुषाचे मांस झडले जाईल, आणि गिधाडे हे शवाला मरण्याअगोदर खातील. कर्करोग म्हणजे दातांचे दु:खणे असे येत आहे. परंतु, लक्षात असू दे, ह्या भयंकर गोष्टीचा स्पर्श नाकारलेला आहे ज्यांना देवाचा शिक्का मिळाला आहे.त्यासाठीच तर आता आम्ही संघर्ष करित आहोत, यासाठी की आत जावे आणि देवाच्या राज्यात आम्हांला योग्य स्थळी नेमावे हे या सर्व भयंकर पिडा पोहचण्याआधी. ओह, हे किती चांगले! कालखंडाची वेळ, पूर्णतेची वेळ, वतन.

*आणि त्याच्यात* आम्ही सुद्धा…*पूर्वनियुक्तीने*…*वतनदार बनलो आहो*…

89 आमचे वतन आम्हाला कसे मिळाले आहे, कशाद्वारे? पूर्वनियुक्तीने. पुर्वनियुक्ती ही पूर्वज्ञान आहे. देवाला हे कसे माहित आहे की त्याने आमच्यावर भरवंसा करावा त्याचा प्रचारक म्हणून? त्याच्या पूर्वज्ञानाने. “हे इच्छा बाळगणाऱ्यावर नव्हे व धावणाऱ्यावर ही नव्हे, किंवा…परंतु कृपा करणाऱ्या देवावर अवलंबुन आहे.” हे खरे आहे, पूर्वनियुक्ती. तो हे जाणतो की तुमच्यामध्ये काय आहे. तो हे जाणतो तुमच्या मध्ये काय आहे, तुम्ही पृथ्वीवर येण्या अगोदर. तो हे जाणतो की तुम्हांमध्ये काय होते पृथ्वीवर येण्यापूर्वी, ज्यामुळे तुम्ही

आलांत. तो—तो तोच आहे. तो अनंत देव आहे, अनंत. आम्ही मर्यादित आहो. आम्ही फक्त एका मर्यादेपर्यंत विचार करु शकतो.

90 ते माझ्यासाठी खूप काही आहे, तेव्हापासून मला काही झाले आहे. मला माहित नाही. जेव्हा मी तेथे विचार केला, जेव्हा मी त्या आनंदमय क्षणांसाठी उभा राहिलो, आणि विचार केला, "तेथे काही उद्या नाही." तेथे काल नव्हता, तेथे आजारपणा नव्हता, तेथे काही दु:ख नव्हते. तेथे थोडा आनंदाचा थेंब नाही, परंतु पूर्णतः आनंद तो; सर्व आनंदीतपणा. बापरे! ओह, जेव्हा मी तेथे उभा राहीन आणि मी म्हणालो, "हे काय आहे?"

91 तो आवाज म्हणाला, "ते पूर्ण प्रेम आहे, आणि सर्व ज्यावर तुम्ही प्रेम केले ते सर्व आणि ज्यांनी तुझ्यावर प्रेम केले ते सर्व येथे तुझ्याबरोबर आहे."

92 "आणि तु आम्हांला प्रभू येशूला सादर करशील जेव्हा तो येईल, तुझ्या सेवकाईची बक्षिसे म्हणून." मी तेथे सुंदर स्त्रीयां उभ्या असलेल्या पाहिल्या आहेत, ज्या मला आलिंगन देत होत्या आणि ओरडत होत्या, "माझ्या मौल्यवान, जिवलग भावा!" त्या पुरुषांना ही मी पाहिले त्यांचे केस त्या मानेपर्यंत होते, धावत होते व मला आलींगन देत होते आणि म्हणाले, "आमच्या जीवलग भावा!"

आणि मी विचारात पडलो, "ह्याचा अर्थ काय असावा?"

तो म्हणाला, "ते तुझे लोक आहेत."

93 मी म्हणालो, "माझे लोक? तेथे दुसरे फार बॅन्हम नसतील तेथे लाखों आहेत."

94 तो म्हणाला, "ते तुझे परीवर्तन झालेले लोक!" हालेलुयाह! "ते तुझे बदललेले लोक आहेत. ते ते आहेत जे..." म्हणाला, "तु पाहतोस तेथे कोणी उभा आहे?" फार सुंदर स्त्री, जी मी कधी पाहिली असेल. म्हणाला, "ती नव्वदी ओलांडली होती जेव्हा तू तिला देवाकडे वळवले. ह्यात काही आश्चर्य नाही ती ओरडत आहे, 'माझ्या जिवलग भावा.'" म्हणाला, "ती आता कधी म्हातारी होणार नाही, तिने ते ओलांडले आहे. ती आपल्या तारुण्याच्या वैभवात आहे. ती येथे उभी आहे. ती थंड पाणी पिऊ शकत नाही, कारण त्याची तिला गरज नाहीए. ती आता झोपण्यासाठी बसवण्याची गरज नाहीऐ, कारण ती थकलेली नाही. तेथे आता उद्या म्हणून काही नाही, काळ म्हणून काही नाही, काळ नाहीत. आम्ही आता अनंत काळात आहोत. परंतु एका गौरवी दिवशी देवाचा पुत्र येईल आणि तुझा न्याय वचनांप्रमाणे होईल ज्या गोष्टी तू त्यांना प्रचार केल्या." हो भावा!

मी म्हणालो, "पौलाला देखील आपले लोक आणावे लागतील?

"होय, महाशय!"

95 मी म्हणालो, "मी पौलाप्रमाणेच तंतोतंत प्रचार केला आहे. मी कधी बदललो नाही, वळलो, नाही मी कधी इतर चर्चच्या तत्वांना कधी स्वीकारले नाही. मी त्यावरच उभा राहिलो."

96 आणि त्या सर्वांनी ओरडून एक दमात म्हणाले, "आम्हाला हे माहित आहे! आम्ही खात्रीपूर्वक शांतीत विसावा घेत आहोत." म्हणाला, "तुम्ही आम्हांला त्याला सादर करणार आहांत आणि नंतर आम्ही सर्व पृथ्वीवर परत जाणार आहोत,तेथे कायम राहण्यासाठी." बापरे!

97 त्यानंतर मी परतण्यास सुरुवात केली, मी मला स्वतःला बिछान्यावर पडलेले पाहिले, आणि मी माझा जुना शव पाहिला जो सुरकुत्या पडलेला, जो, आजारी आणि—

व्याधीचा होता, आणि मी माझे हात माझ्या डोक्याखाली पाहिले, आणि मी विचार केला, “ओह, मला परत त्यामध्ये जावे लागेल?”

98 आणि मी तो आवाज ऐकत राहिलो, “प्रयत्न करीत राहा! प्रयत्न करीत राहा!”

99 मी म्हणालो, “प्रभू, मी नेहमीच दैवी आरोग्य दानावर विश्वास केला आहे, मी त्यावर विश्वास करीत राहीन. परंतु मी त्या जीवांसाठी प्रयत्न करित राहीन, म्हणून मला सहाय्य कर. मला तेथे पुष्कळ मिळतील. मी जाईन…मला जीवंत राहू दे, प्रभू आणि मी त्यात अजून लाखोंची भर घालिन, जर तू मला जगू देशील.”

100 मी यांची चिंता करीत नाही ते कोणत्या रंगाचे, कोणत्या तत्वाचे, कोणत्या देशाचे, ते कोण आहेत, ते सर्व एकच आहेत जेव्हा ते तेथे येतील, आणि तेव्हा त्या मर्यादा समाप्त होतील. ओह, मी त्या स्त्रिया पाहू शकतो, फार सुंदर, कधीही पाहिले नाही…लांब केसाचे. जे त्यांच्या पाठी मागे खाली आलेले. लांब स्कर्ट्स घातलेले. ते चप्पला विरहित पायांचे. ते पुरुष पाहा, ज्यांचे केस त्यांच्या मानेसभोवती, तांबुस डोक्याचे, काळ्या डोक्याचे, आणि विविध रंगाचे. आणि त्यांनी आपले हात माझ्या गळ्याशी भिडून मिठी मारीत होते. मी त्यांना अनुभव करित होतो. त्यांचे हात मी अनुभवत होतो. देव माझा न्याय करील, आणि ते पवित्र पुस्तक उघडले. जसा माझा हात मी माझ्या मुखावर ठेवल्यावर अनुभव करतो, तसाच मी अनुभव करीत होतो. ते आपल्या हातांनी कुरवाळून मला अलिंगन देत होते, जसे आता स्त्रियांबददल ज्या लैंगिक भावना आहेत तशा नाहीत. मी याची चिंता करित नाही, की तुम्ही किती पवित्र आहांत, तुम्ही कोण आहांत, कोणत्या प्रकारचे प्रचारक तुम्ही आहांत, धर्मगुरू किंवा कोणीही का असेना, असा कोणीही पुरुष नाही त्याला एका स्त्रिचे अलिंगन दिल्यावर ही कोणत्याही मानवी लैंगिक भावने विरहीत. हे संपूर्णरित्या खरे आहे. परंतु, भावा, जेव्हा तुम्ही येथून पलिकडे पार होता, तो तसा मार्ग नाही. बापरे!… हे अशक्य आहे. हे सर्व प्रेम आहे, सगळं काही खरे भाऊ, सगळे काही खरेच बहिणी. तेथे कोणते मरण नाही, दुखःही नाही, द्वेष नाही, काही काहीही नाही, तेथे त्याचा प्रवेश ही होणार नाही. ते फक्त पूर्णता आहे. त्यासाठी मी संघर्ष करित आहे. त्यासाठी माझ्या स्थानावर मला नेमले आहे.

101 मी म्हणालो, “हे प्रभू, त्यासाठी मी येथे या मंडळींमध्ये आहे, मंडळीला व्यवस्थेत आणण्यासाठी प्रयत्नशील आहे.” भावांनो, बहिणींनो, तुम्हाला सांगत आहे, तेथे एकाच गोष्टीचा प्रवेश होईल, ते पूर्ण प्रेम. यासाठी नाही की तुम्ही ब्रन्हम टॅबरनॅकलशी एकनिष्ठ राहिला किंवा मेथडीस्ट चर्च किंवा बॅप्टिस्ट चर्च. ते आपल्या जागी बरोबर आहेत, तसेच तुम्ही सुद्धा. परंतु, मित्रानो, तुमच्याकडे…तुम्ही अन्य भाषां बोलता म्हणून नव्हे, आत्म्यात नाचता म्हणून ही नव्हे, भूतांना घालवून दिल्यामुळे ही नव्हे किंवा विश्वासाने डोंगर ढळवल्यामुळे ही नाही, ते सर्व काही ठिक आहे, ते सर्व ठिक आहे, परंतु तरीही त्या परिपुर्ण प्रेमाशिवाय काही नाही. त्या ठिकाणी ते परिपूर्ण प्रेम होते. आणि तिच एकमेव गोष्ट तेथे राहील, जी तुम्हाला तेथे घेऊन जाईल. तीच एकमेव गोष्ट आहे जी तेथे राहू शकते, तीच एकमेव गोष्ट आहे जी तेथे होती. बापरे! हे दत्तकपणा आहे. देवाने, जगाच्या स्थापनेपूर्वी.

102 आता, घाई करुया, आता हा एक अध्याय घेऊ, कसे ही करून, शक्य असल्यास पुढल्या दहा मिनिटांत.

> *आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवितो त्याच्या योजनेप्रमाणे आम्ही पूर्वी नेमलेले असून ख्रिस्ताच्या ठायी वतनदार झालो आहो…* (आम्ही कसले वतनदार झालो? सार्वकालिक जीवनाचे)

कसे?...सगळेजण समजत आहांत काय? तुम्ही देवाला पुकारले काय? नाही, देवानेच आम्हाला पुकारले. काही लोकं म्हणतात, “ओह, मी देवाला शोधले, आणि देवाला शोधले.”

तुम्ही नाही. कोणा मनुष्याने अजूनपर्यंत देवाला शोधले नाही. तो देव आहे जो मनुष्याला शोधतो. येशूने म्हटले, “कोणी ही मनुष्य पित्याने आकर्षित केल्या शिवाय माझ्याकडे येत नाही.” बघा, हा मनुष्य स्वभाव आहे की देवापासून पळ काढावा. आणि तुम्ही म्हणता आता...

103 ते, तेच मला त्रास देते, जरी तुम्हां लोकांना प्रचार केला; तुम्ही ज्यामध्ये जात होता त्या स्थितींतून बाहेर या, त्यामध्ये राहू नका, बदला! मी म्हणत आहे तसे ऐका, प्रभू परमेश्वर असे म्हणतो. मी माझ्या स्वतःला असे कधी म्हणालो नाही, मी नाही म्हणालो. परंतु तुम्ही मला तुमचा संदेष्टा म्हणता, किंवा एक संदेष्टा. जग त्यावर विश्वास करते, जगाभोवती, लाखों आणि लाखों लोक. मी प्रत्यक्षात आणि अप्रत्यक्षरित्या, करोडों लोकांना, किंबहुना अधिक लोकांना प्रत्यक्षात बोलतोय. मी दहा हजारों असे दृष्टांत आणि चिन्हे आणि अदभुते पाहिली आहेत, आणि त्यांतील एकही कधी खोटी झाली नाही. आणि हे खरे आहे. त्यांने मला गोष्टी घडण्यापूर्वीच सांगितले आणि ते कधीच अयशस्वी झाल्या नाहीत. मी कोणाही मनुष्याला त्याची परिक्षा करण्यासाठी बोलवी. हे खरे आहे. मी एक संदेष्टा आहे याचा दावा करित नाही, परंतु तुम्ही माझे ऐका.

104 प्रभू परमेश्वर असे म्हणतो, ते परिपूर्ण प्रेम आहे जे तुम्हांला त्या जागी नेते, हेच ते आहे जे तेथे होते. कितीही पैसा, कितीही धार्मिक प्रमाणे दर्शवा, कितीही चांगली कामे तुम्ही केली किंवा जे काही तुम्ही केलेत, ते त्या दिवशी गणले जाणार नाही. ते परिपूर्ण प्रेम तुम्हाला घेईल. म्हणून जे काही तुम्ही कराल, तुम्ही सर्व काही बाजूला सारून दया म्हणजे जोपर्यंत तुम्ही देवाच्या त्या प्रेमाने भरत नाहीत म्हणजे जे तुमचा द्वेष करतात त्यांच्यावर प्रेम कराल तोपर्यंत.

105 जसे आज सकाळी मी म्हणालो, माझे पूर्ण दिसणे हे कृपेचे आहे असे बनले आहे. पुष्कळ लोकं म्हणतात, “आता, तुम्ही माझी पाठ खाजवा आणि मी तुमची खाजविन. होय, तुम्ही माझ्यासाठी काही करा आणि मी तुमच्यासाठी काही करीन.” ती कृपा नाहीए. कृपा अशी आहे की जरी तुमच्या पाठीत खाज येत आहे, मी तुमची पाठ खांजविणार, जरी तुम्ही माझी पाठ खाजविली किंवा नाही. तुम्ही माझ्या थोबाडात मारली, आणि म्हणाला “माझ्या पाठीला खाज आहे किंवा खाजवण्याची गरज आहे,” मी ती खाजविन. पाहा? तेच हे आहे, काही तरी करा. मी कामांवर विश्वास करित नाही. मी विश्वास करतो की काम हे प्रेम आहे. काम हे काम हे कृपेने आपले स्थान घेतल्याचे प्रकटीकरण आहे. मी माझ्या पत्निबरोबर विश्वासयोग्य राहत नाही कारण मला वाटते ती मला सुटपत्र देईल जर मी नाही केले, मी तिच्याशी विश्वासयुक्त राहतो कारण मी तिच्यावर प्रेम करतो.

106 मी शुभवर्तमानाचा प्रचार करित नाही कारण मला वाटते मी नाही केला तर नरकात जाईन, मी प्रचार करतो कारण मी त्याच्यावर प्रेम करतो. खचित, तुम्ही म्हणाल मी तो खवळणारा समुद्र ओलांडलाय, आणि तशी विमाने मागे पुढे हादवणारी आणि विजा चमकत आहेत, आणि असे सगळे आणि कोणत्याही मिनिटाला...आणि सर्वजण किंचाळतायेत, आणि “नमो कृपा मरीये” ही प्रार्थना त्या विमानांत चालू आहे आणि असे. त्या लोकांनी सुविधा असलेले सुरक्षेचे बेल्टमध्ये आहेत आणि पायलट म्हणतो “फक्त 15 मिनिटे चालेल ऐवढाच गॅस उरला आहे, आम्हांला माहित नाही आम्ही कुठे आहोत.” तुम्हाला वाटते काय की मी हे मजा करण्यासाठी सांगतोय? ह! तुम्हाला वाटते काय मी त्या

जंगलामध्ये गेलोय *जेथे* जर्मनीच्या सैनिकांनी प्रत्येक रात्री आपल्या कवेत मला घेतले आणि सभेबाहेर नेले, जितपर्यंत पवित्र आत्मा चमत्कार करण्यास सुरुवात करीत नाही? साम्यवादी लोकांनी मला कैक मैलांवरून रात्रीच्या वेळी उडविण्याचा बेत आखला होता. तुम्हांला वाटते काय हे मी मजेसाठी बोलत आहे? कारण काहीतरी माझ्यामध्ये आहे जे प्रेम करते. ते मनुष्य आहेत ज्यांच्यासाठी ख्रिस्त मरण पावला. पौल म्हणाला, "मी फक्त यरूशलेमेला जाऊ इच्छित नाही, परंतु मी तेथे क्रुसावर जाण्यास जात आहे. मी मरावयास जात आहे. मी प्रभूच्या कारणांमुळे तेथे मरावयास जात आहे." ते काही तरी आहे, प्रेम आम्हांला भाग पाडते, आणि करण्यास लावते. हे संपूर्ण सत्य आहे.

107 जर मी पैश्यासाठी शुभवर्तमान प्रचार करू लागलो असतो, जर ते तसे असते तर मी २०,०००/–डॉलर्सच्या कर्जात आज रात्री नसलो असतो. नाही महाशय, कारण मी काही लाखों जे मला देण्यात आले ते ठेवले असते. एक माणूस, एका मनुष्याने F.B.I च्या एंजटाला लाख पाचशे हजार डॉलर पैशाच्या ड्राफ्टला घेऊन पाठविले, आणि मी म्हणालो, "ही परत घ्या" पैशासाठी नाही.! हे पैशासाठी नाहीए! मी सुवार्ता पैशासाठी प्रचार करित नाहीए. त्यांसाठी नाहिये!

108 हे प्रेमामुळे आहे. गोष्ट जी मला करायची आहे, ती म्हणजे शेवटचा श्वास संपल्यावर पलिकडे जेव्हा मी जाईन, ते कदाचित आता पाच मिनिटांनी ही असेल, मला माहित नाहिए ते कधी असेल. परंतु जेव्हा ती वेळ येईल, मी तेथे पोहचेन. मला तुम्हाला तारुण्याच्या वैभवात पाहायचे आहे, धावतांयेत, हाकां मारतायेत, "माझा जीवलग भाऊ! माझा भाऊ!" तेच माझ्या हृदयात आहे. म्हणून मी तुमच्याशी वेगळेपणा ठेऊन असहमत न असण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु मी प्रयत्न करित आहे त्या योग्य रस्त्यावर तुम्हाला ठेवावे. तोच आत जाण्याचा रस्ता आहे. तो तुमच्या मंडळीचा नाही, तुमच्या संप्रदायाचा ही नाही. परंतु तुमचा ख्रिस्तातील जन्म. बाप रे! काय म्हणता!

> *जो आपल्या इछेच्या संकल्पाप्रमाणे सर्व काही चालवतो त्याच्या योजनेप्रमाणे...जे आम्ही पूर्वी नेमलेलो होतो, ते आम्ही त्याच्यात...वतन ही झालो आहो.*

109 ऐका, काही मिनिटांतच आम्ही बंद करणार आहोत. आम्ही बंद करण्यापूर्वी लक्षपूर्वक ऐका.

> *अशासाठी की, ज्या आम्ही पूर्वी ख्रिस्तावर आशा ठेवली, त्या आम्हांकडून त्याच्या गौरवाची स्तुती व्हावी...*

110 आता हे पाहा, लक्षपूर्वक, तुम्ही आपले सुवार्तेची बंडी घाला. तुमचे कान सताड उघडा, लक्षपूर्वक ऐका. मी आता 13 व्या वचनात आहे.

> *त्याच्यावर* तुम्ही *विश्वास ठेवला तुम्ही ऐकल्यानंतर...*

"विश्वास कशाने येतो..." [मंडळी म्हणते, "ऐकल्याने"—संपा.] ["वचन"] "ऐकल्याने..." ["देवाचे"] "वचन."

> ... तुम्ही *खरेपणाचे वचन ऐकल्यानंतर...*

111 सत्य काय आहे? देवाचे वचन. हे खरे आहे ना? योहा 17:17 तुम्ही जे वचने लिहत आहा, येशूने म्हटले, "पित्या, तुझ्या सत्याने त्यांना पवित्र कर. तुझे वचन हेच सत्य आहे."

> ... तुम्ही *खरेपणाचे* वचन ऐकल्यानंतर *म्हणजे तुमच्या तारणाचे शुभवर्तमानः...*

112 तो काय तारणाबददल सांगण्याचा प्रयत्न करित आहे? पृथ्वीच्या स्थापनेअगोदरची पूर्वनियुक्ती (हे खरे आहे ना?) पुत्रांच्या दत्तकपणासाठी, सार्वकालिक जीवनासाठी पूर्व नियुक्ती केलेले. जेव्हा तुम्ही त्या सार्वकालिक जीवनात आले, आल्यानंतर तारण पावले, पवित्रीकरण झाले, पवित्र आत्म्याने भरले, तुम्ही पुत्र झालांत. आता देव इच्छा करित आहे की तुम्हांला त्याने तुमच्या योग्य जागी नेमावे, ओह, यासाठी की तुम्ही त्याच्या राज्यासाठी व गौरवासाठी काम करावे.

113 हेच शुभवर्तमान आहे. पहिल्याने, त्याचे वचन ऐकले, "पश्चाताप करा आणि पापांचे मोचन होण्यासाठी प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने बाफिस्मा घ्या." तुमची सर्व पापे काढण्यात येतील, अभिवचनाच्या भूमीसाठी प्रभू येशू ख्रिस्ताचे नाव पुकारा हे अभिवचन प्रत्येक परदेशासाठी आहे जे तुमच्या रस्त्यांवर आहेत. आजच्या रात्री जर तुम्ही एक पापी, आपले घर सोडून येथे आला आहांत म्हणा, "मी त्या ब्रॅन्हम टॅबरनॅकलला जाईन," देव तुम्हाला आज रात्री संधी देवो तेथे तुमच्यामध्ये व अभिवचनाच्या भूमीच्या मध्ये एक गोष्ट आहे. अभिवचनाची भूमी कोणती? पवित्र आत्मा यहोशवा आणि अभिवचानाची भूमी यांमध्ये यार्देन होती. तंतोतंत खरे आहे.

114 मोशे जो ख्रिस्ताचे दर्शक आहे, पुत्रांना अभिवचनाच्या देशात नेण्यास मार्गदर्शन केले, मग मोशेने त्या पुत्रांना वचनदत्त देशात नेले नाही. यहोशवाने लोकांना घेऊन त्यात नेले व भूमी सुत्रांनी वाटून दिली. येशूने किंमत दिली, व त्यांना पवित्र आत्म्यापर्यंत मार्गदर्शन केले. देवाने पवित्र आत्मा खाली पाठविला आणि त्याने मंडळीला व्यवस्थेद्वारे, प्रत्येक मनुष्याला, त्याच्या योग्य स्थळी नेमले, त्याच्या व्यक्तीत्वाच्या उपस्थितीने भरले. तुम्ही समजता माझा काय अर्थ आहे? सर्व काही ख्रिस्त येशुमध्ये, देवाने कसे हे शुभवर्तमानाचे पाचारण पूर्व नियुक्तासाठी खरे केले!

115 पौल, गलतीकरास पत्र 1:8मध्ये, म्हणतो, "जर कोणी दूत येऊन दुसरेच काही प्रचार करू लागला तर तो शापभ्रष्ट असो." सत्य, शुभवर्तमान. जसे आम्ही पुढे वाचत आहो आता लक्ष द्या, वाचने संपवित आहोत.

> ...*तुमच्या तारणाचे शुभवर्तमान: त्याच्यावर विश्वास ठेवल्यावर...* (लक्षपूर्वक ऐका)...*तुम्ही वचनाने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याकडून शिक्का मारलेले आहो.*

116 अंतिम दिवसांत, बायबल म्हणते, आता पाहा, अंतिम दिवसांत दोन प्रकारचे लोक असतील त्यांच्यातील एकाकडे देवाचा शिक्का असेल, दुसऱ्यांकडे पशूची छाप असेल. हे खरे आहे ना? किती जणांना हे माहित आहे? बरे, जर देवाचा शिक्का हा...जर देवाचा शिक्का हा पवित्र आत्मा आहे, मग पवित्र आत्म्याचा शिक्या शिवाय असलेला छाप हा पशुचा आहे आणि बायबल म्हणते कि दोन्ही आत्मे हे फार जवळचे भासणार त्यामुळे ते शक्य असेल तर निवडलेल्यांस हि फसवतील परंतु ते शक्य नाही कारण निवडलेले सार्वकालिक जीवनासाठी आहेत. पाहा?

117 मंडळी जाते, आम्हाला माहित आहे जशा दहा कुमारी प्रभूला भेटण्यासाठी निघाल्या, सर्वच पवित्र, त्यांतील प्रत्येक जण पवित्र केलेल्या, पाच जण मंदावलेल्या, आणि त्यांचे दिवे विझत चाललेले. पाच जणा जवळ दिव्यात तेल होते, "आणि पाहा वर आला आहे!" आणि ज्या पाच जणाकडे दिव्यात तेल होते ते लग्नाच्या मेजवानीस गेल्या. आणि बाकीच्या बाहेर राहून गेल्या जेथे रडणे व दांत ओठ खाणे चालेल. तयार व्हा, कारण तुम्हांला माहित नाही त्याक्षणी प्रभू येणार आहे...बायबलमध्ये तेल कशाला दर्शवित आहे? पवित्र आत्म्याला.

118 आता. तुम्हा, सेवेन्थ डे अँडवान्टीस्ट बंधुजनांना जे म्हणतात सातवा दिवस हा देवाचा शिक्का आहे, एक तरी वचन हे साबित करण्यासाठी दाखवा. बायबल म्हणते कि देवाचा शिक्का म्हणजे पवित्र आत्मा, पाहा हे...13 वे वचन पाहा. "कोणते..." आता 13वे वचन पाहा.

> ... तुम्ही *विश्वास ठेवल्यावर, पवित्र आत्म्याच्याद्वारे शिक्का मारलेले झालांत.*

119 इफिसकरांस पत्र 4:30 कडे वळा, मी विश्वास करतो तेच ते आहे. पाहा जर आम्हांला 4:30 मिळत नाही. इफिसकरांस करास पत्र 4था अध्याय आणि 30 वे वचन. होय, येथे ते आहे, 4था अध्याय 30 वे वचन

> *देवाच्या पवित्र आत्म्याला खेद देऊ नका, तुम्हांस खंडून घेण्याच्या* दिवसासाठी *त्याच्याकडून तुम्हावर शिक्का केलेला आहे.*

120 कधी पर्यंत? जेव्हा तुम्हाला खरोखर, खरोखर पवित्र आत्मा मिळाला होता, तो कधीपर्यंत राहतो? दुसऱ्या संजीवनापर्यंत काय, आजी आपला रस्ता ओलांडेपर्यंत काय, तुमचा धनी तुम्हांवर ओरडे पर्यंत काय! मुक्तिच्या दिवसा पर्यंत? हालेलुयाह!

121 तुम्ही मुत्यृ पावल्यावर, तुम्ही त्या भूमित पोहचल्यावर, तेथे तुम्ही तुमच्या प्रिय लोकांबरोबर उभे असाल, त्यावेळी ही पवित्र आत्म्याने भरलेले असाल. वचन आहे! जसे तुम्ही आता आहात तसेच,...तुम्ही फक्त एका दुसऱ्या शरीरात असाल, तुम्ही तुमचा मंडप बदलला हा एक जिर्ण ओंडका झालेला, त्यावर तुम्हाला बाहेरील छप्पर चालणार नाही, लाकडाचा खांब कुजलेला आहे. हे खरे आहे. म्हणून तुम्ही जुन्या गोष्टी दूर करा आणि त्याला सडू द्या. आणि नविन मध्ये बदलतील. हे खरे आहे ना? "कारण जर हे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडून टाकण्यात आले तर आमचसाठी एक प्रतीक्षा करीत आहे."

122 तुम्ही आठवण करा एके दिवशी, त्यांतून जाणार ना? जेव्हा एक लहान बाळ आईच्या गर्भात वाढून आकार घेते, आणि त्याचे लहानशे स्नायू लाथा मारतात आणि उड्या मारतात असे चाललेले असते. परंतु जेव्हा आई बाळंत होते, बाळाला खाली टाकते आणि तसेच पृथ्वी संबधाने आहे, पहिली गोष्ट, तेथे आत्मिक शरीर आहे जे नैसर्गिक शरीर घेते. कदाचित डॉक्टरने दिला असेल...[ब्र. बॅन्हम आपल्या हातांनी टाळ्या मारतात—संपा.] *अशाप्रकारे*, किंवा काहीतरी करून त्याला हालवावे, आणि "व्हा, व्हा, व्हा." आणि लगेच त्याच्या आईच्या स्तनांजवळ नेते, "उम उम उम," आपले डोके हालवित वर नेते आणि आईच्या स्तनांकडे खाली करते, त्या दुधाच्या शिरांतून दुध घेण्यासाठी.

123 एक छोटे वासरू, जसा त्याचा आईच्या उदरातून जन्म होतो, काही मिनिटांतच ते आपल्या पायांवर उभे राहते. ते काय करते? सरळ आजूबाजूस सरकते आणि आईला पकडून राहण्यासाठी, आणि आपले लहान डोके अशाप्रकारे हलवते वर खाली, आणि आपले दुध ते घेते. हालेलूयाह! होय महाशय.

124 जेव्हा हे नैसर्गिक शरीर तिच्यात येते, तेथे एक आध्यात्मिक शरीर तिच्यासाठी वाट पहात असते.

125 आणि जेव्हा हे नैसर्गिक शरीर भूमीवर टाकले जाते, हालेलुयाह, तेथे पलिकडे एक वाट पहात असे. आपण फक्त एक मधून दुसरीकडे जातो, आपण आपले निवासस्थान बदलतो. हे नाशवंत अविनाशीपणात बदलले पाहिजे, हे आध्यात्मिक, हे विनाशी अविनाशीपणात बदलले गेले पाहिजे. हे वृध्द सुरकुत्या पडलेले, खचलेले वाकले गेलेले शरीर, परंतु ते त्याचे बाह्यस्वरूप मूळीच बदलणार नाही, मला म्हणायचे आहे जेव्हा ते पलिकडे जाईल, तुमच्याकडे अजूनही तोच आत्मा असेल.

126 मला तुम्हाला थोडे काहीतरी देऊद्या जे तुम्हाला हलविणारे वाटेल, परंतु ते पवित्र शास्त्र आहे, नंतर मी तुम्हाला एक देईन जे तुम्हाला ते स्थिर करील ह्यावर लक्ष द्या. जेव्हा वृध्द शौल,...एक—एक राजा, वृध्द, मोठ्या जुन्या संप्रदायाचा त्या काळचा प्रचारक, तुम्हाला माहीत आहे, त्याचे डोळे आणि खांदे त्या सर्वांपेक्षा उंच होते, आणि घाबरत होते, त्यांना अद्भूत गोष्टींविषयी काहीच माहीत नव्हते. दाविदाला यावे लागले आणि मेंढराला सिंहाच्या जबड्यातून सोडवावे लागले, गल्याथाला मारले. त्याच्याकडे पाहा. आतापर्यंत त्याला ह्या गोष्टी परमेश्वरापासून मिळाल्या होत्या. तो त्या देववेडा प्रचारकाचा द्वेष करीत होता. आणि त्याच्याशी बरे वागण्याऐवजी, त्याच्या बाजूने असण्या ऐवजी व मदत करण्या ऐवजी, तो त्याच्या विरुध्द झाला. ते तसेच हुबेहूब चित्र, आज आहे ना. त्याच्या पासून फिरले!

127 येथे किती होते जेव्हा मी माझ्या पहिल्या दौऱ्यासाठी निघालो, आणि प्रचार केला, "दाविद गल्याथाचा वध करतो," जेव्हा मी निघालो? खूप, काही, जुन्या काळातील काहीजण, मी ह्यावर पुन्हा सोडण्याचे ठरवीत आहे. लक्षात ठेवा काय, मागील रविवारी काय आले होते ते पाहा? तेथे दुसऱ्या टप्प्यात जात आहे. दाविदाची दुसरी मोहीम, त्याच्या सेवकाईचा दुसरा टप्पा. ते अगदी बरोबर आहे. कोणती, तेव्हा तो इस्त्राएल वर राजा झाला. लक्ष द्या आता त्याची सेवकाई. एक महान टप्प्यात जात आहे, महान होत आहे. दाविदाने केली. माझ्या हे लक्षात आले जेव्हा तो आला, दाविद, ओह, जेव्हा तेथे देवाकडे दाविद होता जो तेथे बाहेर आला आणि सिंहाचा वध केला, पाहा, आणि अस्वलाचा वध केला, नंतर पालिश्त्याचा वध केला. आता, अशी एक वेळ आली जेव्हा देवाने ह्या वृध्द मनुष्यावर दुष्ट आत्मा आणला. आणि...कशासाठी? दाविदाचा व्देष करण्यासाठी. आणि मी विश्वास करतो...

128 आता, ह्या ध्वनीमुद्रणाच्या फिती, आता, बंधुजनहो, तुम्ही ह्या ध्वनीमुद्रित फीतीं लक्षपुर्वक ऐका, जर तुम्ही माझ्याशी सहमत नसाल, मला क्षमा करा. पाहा, मी तुमच्यावर प्रेम करतो. मी तुम्हाला पलिकडे कसेही करून भेटणार आहे, पाहा, कारण जर तुम्ही देवाचे मनुष्य आहात तर मी तुम्हाला कसेही करून भेटणार आहे. परंतु, मला तुम्हाला हे सांगायचे आहे, येथे त्याचे कारण आहे. फक्त कारण हेच की शौलाने पाहिले की दाविदाकडे काहीतरी आहे जे त्याच्याकडे नाही. मग काय घडले?

129 एक लहान "तांबूस," खेचून आणलेला, बायबल म्हणते तो "तांबूस." एक लहानसा वर तशा प्रकारचा मुलगा. आणि तो तेथे गेला, आणि शौल, का, त्याने शौलाचे चिलखत त्याच्यावर घातले, आणि मी कल्पना करतो ती ढाल त्याच्या पायापर्यंत लोंबकळत होती. आणि तो म्हणाला, "ही सामग्री माझ्याकडून घ्या..." त्याने त्याला कदाचित डॉक्टरची पदवी दिली असेल, पी.एच.डी. किंवा एल. एल. डी., किंवा कुठलीतरी. तुम्हाला माहीत आहे. तो कसे म्हणाला असेल, "मला त्या सामग्रीबद्दल काहीच माहीत नाही, कारण मला त्याचा सराव नाही. मला हे घेऊ द्या, जे मला माहीत आहे जे मी करत आहे." होय महाशय. त्याने गोफण घेतले.

130 आणि त्यांनी दाविदाला वेडे केले कारण मुली, मंडळ्या—मंडळ्या गात होत्या, "शौलाने हजारो वधिले, परंतु दाविदाने लाखो वधिले."

131 तेव्हा त्याला व्देष आला, "ते तेच जुने येशूचे नाव घेणारे लोक, तेथे काहीच नाही," ते बरोबर आहे. आणि देवाने त्याला काय केले? देवाने त्याच्यावर एक दुरात्मा पाठवला, दाविदाचा द्वेष करण्यासाठी, आणि त्याने काहीही कारणशिवाय दाविदाचा व्देष केला.

132 दाविद त्याची मान काही वेळातच तोडू शकला असता. तो शकला असता, परंतु त्याने ते तसेच जाऊ दिले. तो कधीही काही बोलला नाही. तो निश्चितच ते करू शकला असता. तो तेथे गेला आणि एके रात्री, त्याच्या वस्त्राचा काठ कापला, परत येतो, म्हणतो, "येथे पाहा, तुम्ही पाहिले!" होय, महाशय, तो ते करू शकला असता, परंतु त्याने त्याला एकटे जाऊ दिले. तो त्याची मंडळी तोडू शकला असता आणि त्यांना विखरले असते, आणि त्याला वाटले असते तर तो त्याची स्वत:ची संघटना सुरु करू शकला असता. परंतु त्याने ते केले नाही, त्याने शौलाला करू दिले. देव लढाई करो. होय, महाशय.

133 म्हणून जसे तो बाहेर गेला आणि मोहीम संपली, आणि आला, शौलावर दुरात्मा आला की त्याला देवाकडून उत्तर मिळत नव्हते. काही वेळा नंतर...देवाच्या आत्माने त्याला सोडले. आणि वृध्द शमुवेल, ज्याला त्यांनी धुडकावून लावले होते, तो एक जो खरोखरीच त्यांच्यासाठी देवाची वाणी होता, तो जो त्यांना सांगत होता. जेव्हा त्यांची जगाप्रमाणे वागण्याची इच्छा होती.

134 मंडळीला कसे जगासारखे वागायची इच्छा आहे? पेंटीकोस्टल, बाप्तिस्मा घेतलेले, पवित्र आत्म्याचा अनुभव घेतलेले मेथोडिस्ट, आणि बाप्तिस्ट, आणि प्रेसबेटेरियन यांना जगासारखे वागण्याची का इच्छा आहे? ते तसे का करीत आहेत? मला माहीत नाही. मला ते नेमके कळत नाही. तुम्ही म्हणता, "ठीक आहे, पत्याचा एक खेळ खेळणे इतके मजेशीर आहे. अगदी थोडा वेळ मजेसाठी, फक्त एक चांदीचे नाणे." तुम्ही त्यास काय म्हणता. ते पाप आहे. तुमच्या घरात त्या गोष्टी ठेवू नका "का, एक लहानसा बीअरचा पेला घेण्यात काही नुकसान नाही. आम्ही फक्त थोडी घेतली. मी आणि माझी पत्नीने दुपारी थोडीशी घेतली." आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, तुमच्या मुलानी ही थोडी घेतली. ते निश्चित आहे.

135 आणि तुम्ही स्त्रीयांनी, होय, सैतानाने युक्ती केली...तेच त्याने उत्पतीत केले, आणि त्याने निश्चितीच तुम्हा बहिणीना लक्ष्य केले आहे. तो हेच करतो...कारण त्याला माहीत आहे की तो काय करू शकतो. तो स्त्रियांना पुरुषांपेक्षा हजारो पटीने जलद फसवू शकतो. मला माहीत आहे की तुमच्या भावना दुखावल्या जात आहेत, परंतु ते सत्य आहे. ते अगदी बरोबर आहे. तेच त्याने एदेन बागेत केले. तो. तो बनवू शकतो...आता, ती प्रामाणिक होती, ती सच्ची होती, परंतु ती भूलवली गेली. "आदाम भुलविला गेला नव्हता," बायबल म्हणते. तो भुलविला गेला नाही, परंतु ती भुलविली गेली. तर तो तिला फसवू शकतो. आणि तरीही पाळक बाहेर जातील आणि स्त्रीयांची प्रचारक म्हणून नियुक्ती करतील. त्यांना मंडळीत नेतात; आणि हे बायबल उत्पतीपासून प्रकटीकरणापर्यंत ह्या गोष्टीचा निषेध करते. तुम्ही म्हणता, "ठीक, ते सर्व बरोबर आहे. ते सर्व बरोबर आहे. त्याच्याकडे आहे...ते तशाच प्रकारे ते प्रचार करू शकतात." मला माहीत आहे ते खरे आहे.

136 जसे एकदा कोणीतरी अनन्य भाषेत बोलण्यास सुरुवात केली, मी फक्त प्रचार करीत राहिलो. आणि जेव्हा मी बाहेर गेलो, एक स्त्री माझ्या मुलाला म्हणाली, "उद्या रात्री देण्यासाठी माझ्याकडे संदेश आहे," म्हणाली, "जेव्हा तुझे वडील मंचावर येतात."

म्हणालो, "ठीक आहे, श्रीमती तुला काय म्हणायचे आहे?"

137 आणि त्या रात्री जेव्हा ते तयार झाले, जेव्हा मी वेदीवरून पुकारण्याची तयारी करीत होतो, तीने तिचे केस वर बांधले आणि तिचे पायमोजे वर ओढले आणि सर्व काही, तयार झाली, मध्येच तिने वर उडी घातली आणि वर आणि खाली उड्या मारण्यास सुरुवात केली, निरनिराळ्या भाषेत बोलू लागली आणि भविष्यवाणी करू लागली, मी माझा प्रचार तसाच चालू ठेवला, मी वेदीजवळ बोलाविले तेव्हा मी तिचा जराही सन्मान केला

नाही, ते बरोबर नव्हते. म्हणून नंतर बायबल म्हणते तसे करू नका, म्हणते, “संदेष्टयांचे आत्मे संदेष्टयांच्या अधीन आहेत.” …देव मंचावरून बोलत आहे, त्याला बोलू द्या. पॉल म्हणतो, “जर बसलेल्या इतरांपैकी कोणाला काही प्रगट झाले, तर बोलणाऱ्याने उगेच राहावे जोपर्यंत दुसरा संपवित नाही.” ते बरोबर आहे.

138 आता, तेव्हा जेव्हा मी बाहेर आलो, ते लोक म्हणाले, लोकांचा एक मोठा समुह, म्हणाला, “तु आजरात्री पवित्र आत्म्याला खिन्न केले.”

मी म्हणालो, “काय केले? मी काय केले?”

139 म्हणाले, “बरे, जेव्हा त्या बहिणीने तो संदेश दिला, हालेलुयाह, ते म्हणाले.”

“का,” मी म्हणालो, “मी प्रचार करीत होतो. ती व्यवस्थेच्या बाहेर वागली.”

140 “ओह,” म्हणाला, “ती देवाच्या राजासनांतून ताजे घेऊन आली. आणि तू प्रचार करतोस त्यापेक्षा ते ताजे आहे.” ओह!

141 आता, ते फक्त हेच दाखविते…ते हेच दाखवते, आणि मी तुमचा मान राखून ह्यास तेच म्हणेन एकतर वेडेपणा, किंवा अनादर, किंवा चुकीची शिकवण ज्यांना देवाविषयी अधिक माहीत नाही जेवढे सशाला त्याच्या बर्फातील बुटाविषयी माहीत आहे. आता, त्यास एक मूर्ख शेरा म्हणत नाही, कारण ही जागा विनोद करण्याची नाही. परंतु ते—ते अगदी बरोबर आहे. एक व्यक्ती ज्यास ठाऊक आहे की देव अव्यवस्थेचा जनक नाही. तो शांतीचा देव आहे. त्यांना बायबल ठाऊक नाही. त्यांना फक्त एवढच माहीत आहे की कसे वर आणि खाली उड्या मारणे, विविध भाषा बोलणे; म्हणणे, “माझ्याकडे पवित्र आत्मा आहे. हालेलुयाह!”

142 आफ्रिकेमध्ये, मी उभा राहिलो आणि पाहिले आहे, भूतविद्याप्रविण आणि गोष्टी बोलतात, एका वेळेला त्यांच्यातील पाच हजार जण, वर आणि खाली उड्या मारतात, त्यांच्या पूर्ण चेहऱ्यावर रक्त, विविध भाषा बोलताना, आणि मानवी कवटीतून रक्त पिताना; सैतानाला बोलावतात, आणि विविध भाषा बोलतात.

143 आणि तरीही विविध भाषा बोलणे हे देवाचे दान आहे, परंतु तो कधीही न चुकणारा असा पवित्र आत्म्याचा पुरावा नाही. मला तुम्हाला आता हे सांगू द्या. मी विश्वास करतो की सर्व प्रेरित झालेले संत विविध भाषेत बोलतात. मी विश्वास करतो की एखादा मनुष्य कोणीतरी जेव्हा देवाच्या आत्म्याने प्रेरित होतो तेव्हा विविध भाषेत बोलतो. मी त्यावर विश्वास ठेवतो. परंतु मी ह्यावर विश्वास ठेवत नाही की ते तुमच्यामध्ये पवित्र आत्मा असण्याचे चिन्ह आहे. होय महाशय. मी विश्वास करतो तेथे वेळ आहे जेव्हा तुम्ही विश्वास ठेवता, तो व्यक्ती, तुम्ही थेट बाहेर जाता आणि हात एका लहान मुलावर ठेवतात ज्यास कर्करोग झालेला आहे. जेव्हा पन्नास प्रचारकांनी त्याच्यासाठी प्रार्थना केलेली आहे, आणि तो बरा होतो कारण त्यामुलासाठी आई विश्वास ठेवते. देवाने तो तिला दिलेला आहे, ती ख्रिस्ताच्या शरीराची सदस्य आहे. होय, महाशय मी विश्वास करतो की, मी ते होताना पहिले आहे आणि मला माहीत आहे की ते खरे आहे. परंतु ते काय आहे; मंडळी आज्ञेत असणे, व्यवस्थेत आणणे ह्यासाठी आपण काम करू शकू.

144 आता आपण जाण्याअगोदर हे उर्वरित वचन पूर्ण करूया,

> …*तो* तुम्हाला *मिळाल्यानंतर,* तुम्ही *पवित्र आत्म्याच्या वचनाव्दारे शिक्कामोर्तब झाले.*

145 "शिक्का!" शिक्का काय आहे? शिक्का काय आहे? शिक्का म्हणजे, पहिली गोष्ट, तो दाखवितो की काम पूर्ण झालेले आहे, पूर्ण झालेले काम. दुसरी गोष्ट तो दाखवितो ती म्हणजे मालकी. आणि दुसरी गोष्ट तो दाखवितो ती म्हणजे सुरक्षितता, काळजी घेणे.

146 उदाहरणार्थ, मी पेन्सिलवानीया रेलरोड साठी काम करीत असे, मी माझ्या वडिलाबरोबर रेल्वेमार्गावर काम करीत असे. आम्ही गाडीत ओझे लादत असू. आणि आम्ही ते ह्या पॅकिंग कंपनीत खाली ठेवत असू, आम्ही ते कथिल डब्ब्यात भरत असू, आणि आम्ही ते थोडे *वर* आणि थोडे खाली *येथे* रचत असू, आणि काही *ह्या* ठिकाणी वर. परंतु ती गाडी सिलबंद करण्याआधी, निरीक्षक तेथे येतो आणि तो *ते* ढकलतो, एकावर धक्का मारतो, *ते* हालवतो: "हा! त्यांचा दोष दाखवतो! तेथे पोहचण्याआधी त्या सर्वांचे तुकडे होतील. त्यांचे दोष दाखवतो! त्यांना बाहेर काढतो. तसे पुन्हा करितो." तो निरीक्षक गाडीला नापसंती दर्शवितो.

147 पवित्र आत्मा हा निरीक्षक आहे. तो तुम्हाला जरासे हालवतो, आणि तुम्ही कुरकुर करता. तुम्ही देवाच्या सर्व वचनावर विश्वास ठेवता का? "मी त्या जुन्या येशू नावाच्या लोकांवर विश्वास ठेवत नाही." तो दोष लावतो. तुम्ही कुरकुर करता, पाहा. "मी दैवी आरोग्यामध्ये किंवा अशा गोष्टींवर विश्वास ठेवत नाही." अजूनही कुरकुर. त्यांना बाहेर काढा. तुम्ही विश्वास करता काय की येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे…"बरे, कोणत्यातरी मार्गाने." तुम्ही कुरकुर करता. ती बाहेर काढून टाका, पाहा, ते अजूनही तयार नाहीत. होय, महाशय.

148 भावा, जेव्हा ते, "आमेन!" म्हणण्यास तयार होतील, तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला आहे काय? "आमेन!" सर्वकाही पूर्ण झालेले आहे काय? "आमेन." तर मग निरीक्षक काय करतो? सर्वकाही चांगल्याप्रकारे आणि घट्ट, पूर्ण शुभवर्तमानाने बांधले आहे. ओह, देवाचा प्रत्येक शब्द चांगला आहे. सर्वकाही परिपूर्ण आहे, "मी प्रत्येक वचनावर विश्वास ठेवतो. आमेन! आमेन! आमेन!" तुम्ही विश्वास ठेवता की देव हा अजूनही बरे करतो? "आमेन." तुम्ही विश्वास करता येशू काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे? "आमेन." तुम्ही विश्वास ठेवतो की पवित्र आत्मा हा तितकाच खरा आहे, जितका तो आजतगायत होता? "आमेन." तू विश्वास ठेवतो की तोच आत्मा जो पौलावर उतरला तोच आपल्यावरही उतरतो? "आमेन". तू विश्वास ठेवते की ज्या गोष्टी त्याने त्यांच्यावर केल्या त्याच आपल्याशीही करितो? "आमेन." ओह, ओह, ती आता घट्ट बनत आहे. पाहा, घट बनत आहे, आपण दरवाजा बंद करण्यासाठी तयार आहोत. बरोबर आहे.

149 तेव्हा तो निरीक्षक दरवाजा बंद करतो. तो काय करतो? तो त्यावर शिक्का मारतो. मग तो येथे खाली उतरतो आणि ह्या लहान गोष्टींची पक्कड घेतो, तेथे ह्या लहान गोष्टींपर्यंत पोहोचतो आणि सीलबंद करतो. तुम्ही ते तोडू नका. जर त्या गाडीचे, अंतीम स्थळ बोस्टन आहे, ती तुटू शकत नाही. बोस्टन येथे ती पोहचेपर्यंत तो शिक्का तोडणे हा तुरुंगावास होण्यासारखा गुन्हा आहे. आणि ज्या मनुष्यास तो अधिकार आहे तोच तो शिक्का फोडू शकतो, आणि फक्त त्यालाच. ते बरोबर आहे. ती कंपनी *अमुक—अमुक* रेलरोड कंपनीच्या मालकीची आहे. तो त्यांचा शिक्का आहे. ती त्यांची हमी (खात्री) आहे की ती गाडी भरलेली आहे, ती गाडी तयार आहे. ती त्यांच्या त्यांच्या मालकीची आहे. ते "पेन्सिलवेनीया" वर "बी & ओ" असे नाव टाकू शकत नाही. तुम्ही शिक्कामोर्तब झालेले पाहिजे, आणि जेव्हा ते सीलबंद केलेले आहे.

150 आणि जेव्हा एक ख्रिस्ती शुभवर्तमानाने भरला जातो, देवाच्या चांगुलपणाने, भरला जातो, देवाच्या सर्व चांगल्या गोष्टी त्याच्यामध्ये ठेवलेल्या असतात, खुल्या हृदयाने, काम

करण्यास तयार असलेले, योग्यरितीने रचले जाण्याची इच्छा बाळगतात, पवित्र आत्मा त्यांना जे काही करायला सांगतो तेच करतात, जे मरणांतून जीवनात पार झालेले आहेत, जगाच्या सर्व गोष्टींपासून शुध्द केलेले. त्याच्याकडे आलेल्या प्रकाशात चालणारे, चालत राहणारे, तो तयार आहे. तेव्हाच देव त्याच्या मागे जगाचे दार बंद करतो, आणि जोराने त्यासारखे धक्का मारतो, आणि पवित्र आत्म्याच्या वचनाने शिक्का मारतो. हालेलुयाह! किती वेळ? मुक्कामास पोहचेपर्यंत. येथे रेलरोड मार्गावर त्याला उतरवीत नाही आणि ते तोडतो, पुन्हा उघडतो आणि पाहतो की सर्वकाही व्यवस्थित आहे. ते अगदी बरोबर आहे. ते एकटेच राहूद्या. निरीक्षकाने निरीक्षण केलेले आहे. किती वेळासाठी तुला सीलबंद केलेले आहे? तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत. त्याच समयापर्यंत तुम्ही शिक्कामोर्तब केलेले आहे.

151 "ठीक आहे, जेव्हा तू मरशील, तेव्हा, भाऊ ब्रॅन्हम, तु मेल्यानंतर काय, तू म्हणतोस तुझ्याकडे तो तरीही आहे?" तुझ्याकडे तो सदैव आहे. जीवनाची सुरुवात कुठे होते. वेदीवर. बरोबर तेथेच जेथे तु लहानशी छाया पाहत आहेत. ती छाया आहे, पवित्र आत्म्याचा शिक्का. मग ती छायेतील, छायेतील छाया आहे, जसे मी त्या दिवशी म्हणालो. परंतु जेव्हा तुम्ही मृत्यू पावता, तुम्ही त्या छायांमधून जात राहता, जोपर्यंत तुम्ही ओलाव्यात येत नाही, ओलाव्यांतून, लहान झऱ्याकडे, झऱ्याकडून खाडीकडे, खाडीकडून नदीकडे, नदीकडून समुद्राकडे, पाहा, देवाच्या प्रेमाकडे तुम्ही अगदी तोच मनुष्य आहात.

152 येथे पाहा; वृध्द शौल, जुना पतित झालेला, तो देवाकडे जाऊ शकत नव्हता, तरीही त्याचा नाश झाला नव्हता. तो निश्चितच नव्हता. तो एक संदेष्टा होता, परंतु तो केवळ देवाच्यापासून दूर गेला. तेच कारण आहे, बंधुजनहो, मी म्हणालो, "तुझा नाश झाला नाही." म्हणून मग लक्षात ठेवा, तो केवळ देवाच्या इच्छेबाहेर गेला, मग पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, तो—तो मान्य होणार नाही. आता, मी कदाचित ते सांगितले नसेल. ठीक आहे, मी फक्त आनंदी मंडळीसाठी आजरात्री जात आहे. तर मग, तुम्हाला माहीत आहे, आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, ओह, वापरे, तो ...उरीम थुम्मीम कडे गेला.

153 तुम्हाला माहीत आहे ते उरीम आणि थुम्मीम काय होते, ते एक उरस्त्राण, एफोद जे अहरोन घालीत असे. आणि ते सदैव होते, देव नेहमीच अद्भूत देव अद्भूत प्रकारे उत्तर देणारा आहे. आणि जेव्हा एक संदेष्टा भविष्यवाणी करितो, आणि जर गूढ प्रकाश त्या उरीम थुम्मीममधून आला नाही, तर तो खोटा आहे. जेव्हा द्रष्टा स्वप्न सांगत असे आणि जर त्या उरीम आणि थुम्मीमधून प्रकाश येत नसे, मी त्याची तमा बाळगीत नाही की ते किती चांगले भासत आहे, ते चुकीचे होते. ते बरोबर आहे.

154 आणि मी तमा बाळगीत नाही की तुझ्याकडे किती डॉक्टरच्या पदव्या आहेत आणि तुझी संघटना किती मोठी आहे, जेव्हा तुम्ही भविष्यवाणी किंवा प्रचार करता, ती ह्या वचनाप्रमाणे नसेल, तू खोटा आहेस, भावा...हेच देवाचे उरीम थुम्मीम आहे. जेव्हा तुम्ही म्हणता तुमची युगाच्या स्थापने अगोदर पूर्व नियुक्ती नाही, त्यांतून प्रकाश येणार नाही, कारण बायबल म्हणते तुमची होती. जेव्हा तुम्ही म्हणता की तुमचा बाप्तिस्मा "पिता, पुत्र, पवित्र आत्मा," ह्या नावाने व्हायला पाहिजे, ते प्रकाशत नाही, कारण आजपर्यंत बायबलमध्ये कोणाचाही तशाप्रकारे बाप्तिस्मा झाला नाही. फक्त प्रभू येशूच्या नावातच झाला आहे. ते प्रकाशणार नाही, म्हणजे तेथे काहीतरी कुठेतरी चुकीचे आहे.

155 म्हणून उरीम थुम्मीम वृध्द शौलाला उत्तर देत नव्हते, आणि त्याला स्वप्नही पडत नव्हते. तो इतका दूर गेला होता की त्याला स्वप्नही पडत नव्हते. म्हणून तुम्हाला माहीत

आहे त्याने काय केले? तो खाली भूत विद्या प्रविण स्त्रीकडे गेला आणि ती वृध्द भूत विद्या प्रविण स्त्री, वृध्द सैतानाची वैद्यीण तेथे खाली, भूतविद्याप्रविण स्त्री. आणि तो म्हणाला, "काय तू भाकीत करू शकते?"

156 ती म्हणाली, "होय, परंतु शौलाने सांगितले आहे की तो भूत विद्या प्रविण आणि चेटकी यांना मारून टाकील."

157 तो म्हणाला, "मी तुझे रक्षण करीन," स्वैपाक्याचा वेश केला होता. तो म्हणाला, "माझ्यासाठी दैवी गोष्ट कर. आणि मृतांच्या जगात जे पलिकडे गेलेले आहे माझ्यासाठी वर आण." आता ह्याकडे लक्ष द्या. "शमुवेल संदेष्टयांच्या आत्म्यास उठवून आण."

158 आणि ती त्या आत्म्यास बोलाविण्यास गेली. आणि, जेव्हा तिने केले, ती तोंडघशी पडली, ती म्हणाली, "कोणी दैवते पृथ्वीतून वर येताना दिसत आहेत." पाहा, ती मूर्तीपुजक होती, "दैवते," त्याच्यातले दोन किंवा तीन जण, पिता, पुत्र, पवित्र आत्मा, किंवा असेच काहीतरी, तुम्हाला माहीत आहे. ती म्हणाली, "कोणी दैवते पृथ्वीतून वर येताना दिसत आहेत."

159 विचारले, "त्याचे वर्णन कर. त्याचे स्वरूप कसे आहे? तो कशासारखा दिसतो?"

160 म्हणाली, "तो वृध्द पुरुष आहे आणि त्याने झगा घातला आहे." तो जराही, बदलला नव्हता.

161 तो म्हणाला, "तो शमुवेल आहे. त्याला ह्या खोलीत आण, त्याला येथे माझ्यासमोर आण."

162 आणि लक्ष द्या जेव्हा शमुवेल शौला समोर आला, तो म्हणाला, "तू मला का बोलावले, तू देवाचा शत्रू झाला आहेस?" आणि पाहा. तो अजूनही केवळ शमुवेलच नव्हता, त्याच्याकडे अजूनही भविष्यवाणी करण्याचा आत्मा होता. हे चुकीचे आहे, कोणातरी सांगू दे ते चुकीचे आहे. ते सत्य आहे! तो अजूनही संदेष्टा होता. म्हणून तो म्हणाला, त्याने भविष्यवाणी केली आणि म्हणाला, "उद्या युध्दात तू हरशील, आणि तू आणि तुझे पुत्र उद्या युध्दात हरतील, आणि उद्या तू आपल्या पुत्रांसह मजकडे येशील." ते बरोबर आहे का? तो अजूनही संदेष्टा होता!

आता तुम्ही म्हणता, "ओह, परंतु त्या चेटकीने ते केले."

163 ठीक आहे, मी तुम्हाला एक सांगीन की जी चेटकी नव्हती. येशूने पेत्र, याकोब, आणि योहान, ह्यांना घेतले, आणि एकदा रुपांतराच्या डोंगरावर गेला, आणि डोंगरावर ते उभे होते. आणि, येशू, देव त्याच्या पुत्राला पुर्नस्थापित करीत होता; जसे मी प्रयत्न करीत आहे...त्या रात्री घेतले, पुत्राची पुर्नस्थापना आणि जेव्हा ते गेले, त्यांनी सभोवती पाहिले आणि कळले की तेथे मोशे आणि एलिया उभे होते. ते त्याच्याबरोबर सेभाषण करीत होते. लहान पांढरे झेडे सभोवती फडकत नव्हते, किंवा लहान पांढरे ढग, निश्चित सभोवती वाहत नव्हते. परंतु ते मनुष्य होते, सेभाषण करीत होते. मोशेला अनामिक अशा कबरेत आठशे वर्षांअगोदर पुरले होते. आणि एलिया रथांतून घरी गेला, पाचशे वर्षांअगोदर आणि येथे ते दोघे होते, अजूनही जीवंत जसे ते पूर्वी होते, त्याच्याशी उभे राहून संभाषण करीत होते. तो कलवरीवर जाण्याआधी. हालेलुयाह! "मुक्तीच्या दिवसापर्यंत शिक्का मोर्तब केले आहे!"

164 मी घाई करीन, आणि मग मी बंद करीन कारण उशीर झाला आहे, आणि आपण आजाऱ्यासाठी प्रार्थना करूया, अंदाजे पाच मिनीटे अधिक. 14वे वचन, वाचा, मला पार्श्वभूमीसाठी 13वे वाचू द्या.

*तुम्हीहि* सत्याचे *वचन म्हणजे तुमच्या...तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर त्याच्यावर विश्वास ठेवला...*

165 आता लक्ष द्या, त्यांना कोणते तारण मिळाले? ते—ते इफिसयेथील ख्रिस्ती होते. ते, आता पाहा, तुम्ही करिंथकरांचे अवलोकन केले का? त्याला त्यांना नेहमीच सांगावे लागेल, "जेव्हा मी तुमच्यामध्ये येतो, एकाला भाषा बोलता येते, एकाला स्तोत्रे गाण्याचे, एकाला भविष्यवाद करण्याचे, एकाला..." पाहा, तो त्यांना काहीच शिकवू शकला नाही, कारण ते नेहमी कशाचीतरी इच्छा धरीत होते *हे*, *ते* किंवा *दुसरे*. ह्या लोकांकडेही त्याच गोष्टी होत्या, परंतु त्यांच्याकडे त्या क्रमवार होत्या. त्याने करिंथकरास कधीच असे शिकवले नाही, तो शिकवू शकला नाही, ती मंडळी शिकवण्यासाठी योग्य चांगल्या स्थितीत नव्हती. आता, ह्या लोकांना तो खऱ्या गोष्टी शिकवू शकला

... तुमच्या *तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर...त्याच्यावर विश्वास ठेवला, आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुम्हावर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे.*

*देवाच्या गौरवाची स्तूति व्हावी म्हणून* (ओह, हे मी सोडू नये)...*स्वकीय जनाच्या खंडणी भरून मिळविलेल्या मुक्तीसाठी हा पवित्र आत्मा आपल्या वतनाचा...विसार आहे!*

काय म्हणता!

166 पवित्र आत्मा काय आहे? आता, मी बाकीचे जलद रीतीने वाचीन जर तुम्ही माझ्याबरोबर थोडा वेळ राहाल. आपण दुसऱ्या रात्री कोठे होतो, भाऊ माईक? जेथे ते सर्व आनंदी होते, ओह, सर्वकाही शांतता होती, ते परिपूर्ण प्रेम होते. आता, प्रत्येक वेळी तुम्ही *ह्या* मार्गाने येता तुम्ही एक लहान थेंब टाकता. प्रत्येक वेळी तुम्ही एक पायरी चढता, तुम्ही इंचानी जवळ येता. जेव्हा ते जमिनीत खाली जाते, तुम्हाला छायेची छाया, छायेची छाया मिळते. आता, तितकाच पवित्र आत्मा तुमच्यामध्ये तुम्हाला मिळतो. ते प्रेम आहे. परंतु, ओह, तुम्हाला कसलीतरी तहान लागली आहे.

167 ओह, वृध्द लोकांसारखे नाही, वृध्द लोक...मला मागे जायला आवडेल आणि पुन्हा पंधराचा होणे आवडेल, ओह, मी काहीतरी दिले. ते माझ्याशी काय चांगले करील? मी पंधराचा असेल आणि तरी आजरात्री मरेन. ते अनिश्चित आहे. जर तुम्ही आज रात्री पंधरा वर्षाचे असाल. तर काय, तुम्हाला कसे कळेल आई जीवंत असेल, वेळेवर तुम्ही घरी जाता किंवा नाही? तुम्हाला कसे कळेल की तुम्ही घरी जाणार आहात? तुम्हाला हे कसे कळेल की तुम्ही उद्या जगणार आहात जर तुम्ही बारा वर्षाचे आहात, पूर्ण आरोग्य? तुम्ही कदाचित एका अपघातात मारले जाल, मृत्यूत पडले जाल, तुमच्याबरोबर काहीही होऊ शकते. अनिश्चित, पाहा. येथे काहीच निश्चित नाही परंतु तुम्ही त्याची इच्छा धरता. ते काय आहे? ते वर आहे त्याची इच्छा तुम्ही धरा.

168 आता, तुम्ही ह्यात चालत राहा, तर मग तुम्हाला सार्वकालिक जीवन आहे. आता ते काय झाले आहे? ते "विसार" आहे.

169 विसाराची रक्कम काय आहे? मी जर तुमच्याकडे गाडी विकत घेण्यासाठी आलो. मी म्हणालो, "ती गाडी कितीची आहे?"

170 तुम्ही म्हणता, "ही गाडी, भाऊ ब्रॅन्हम, तुम्हाला तीन हजार डॉलर्स किंमतीला मिळेल."

"बयानाची रक्कम काय आहे?"

"ठीक, मी तुम्हाला ती पाचशे डॉलर्सला घेऊन जाऊ देईन."

171 "ठीक आहे, हे पाचशे डॉलर्स घ्या. मी—मी बाकीचे पैसे नंतर कधी आणेन, जेव्हा मला शक्य होईल तुमच्याकडे गाडी आहे." मी तुम्हाला पाचशे डॉलर्स दिले, ती विसार आहे. हे बरोबर आहे का?

172 आता, पकडून ठेवा, तो "विसार," ती "बयानाची रक्कम" आहे.

...*अभिवचनाच्या आत्म्याद्वारे*... तुमच्यावर *पवित्र शिक्का मारण्यात आला, अभिवचनाचा आत्मा*... तुमच्यावर *शिक्का मारण्यात आल्यावर*...

*कोणते आहे*...

शिक्क्याचे अभिवचन काय आहे, पवित्र आत्म्याचे अभिवचन?

*जो आपल्या वतनाचा विसार आहे खंडणी भरून मिळविलेल्या मुक्तीसाठी*...

173 ते काय आहे? ती बयानाची रक्कम आहे. आणि, भाऊ, ओह, ओह, ओह, ओह, प्रचारकांनो! जर ही बयानाची रक्कम आहे, मग ते काय असेल जेव्हा आपल्याला संपूर्ण तेथे मिळणार आहे! ते काय असणार आहे? जर ह्याचा ...जर ह्याचा आपण आता आस्वाद घेत आहोत, आणि इतके आनंदित होतो...मी पाहिले आहे नव्वद वर्षे वयाची माणसे येथे येतात...

174 मी एका जुन्या प्रचारकाला पाहिले जो एके रात्री उभा राहिला. तो बाहेर आला, तो म्हणाला...*अशाप्रकारे*, मंचावर येणे. आणि मी म्हणालो, "तो वृध्द मनुष्य प्रचार करणार आहे?"

175 तो म्हणाला, "ठीक आहे, प्रभू धन्यवादित असो." एक वृध्द काळ्या रंगाचा व्यक्ती, महान मोठ्या जुना लांब प्रचारकाचा कोट घालून.

176 मी म्हणालो, "ते त्यांच्यातील काही तरुण प्रचारकाला का प्रचार करू देत नाही? तो वृध्द मनुष्य, तो अजुनपर्यंत कसा प्रचार करू शकतो?"

177 तो म्हणाला, "ठीक आहे," तो म्हणाला, "बंधुजनहो," तो म्हणाला, "आज मी भावांना पूर्ण दिवसभर प्रचार करताना ऐकले," तो म्हणाला, "येशूने जगात काय केले. मी तुम्हाला सांगणार आहे की त्यांने स्वर्गात काय केले." तो म्हणाला, "मी आज रात्री माझा विषय इयोब ७:२७ मधून घेणार आहे," म्हणाला, "जेव्हा ते जगाच्या स्थापनेअगोदर पलिकडे तेव्हापासून होते," म्हणाला, "जेव्हा तो पहाटेच्या ताऱ्यांना म्हणाला एकत्र गायन करा आणि देवाच्या पुत्रांनी आनंदाने जयघोष केला." त्यासारखी सुरुवात करा. म्हणाला, "तुम्हाला हे माहीत आहे, तेथे मागे काहीतरी मागे गेले आहे." तो म्हणाला, "तुम्हाला माहीत आहे..." आणि त्याने त्या गोष्टी आणायला सुरुवात केली ज्या स्वर्गात घडल्या होत्या. त्याच्या दुसऱ्या आगमनावेळी त्याने क्षितीजाला समांतर मेघ धनुष्य खाली आणला. त्या वेळी, पवित्र आत्मा त्याच्यावर आला. आता, त्यांनी त्या वृध्द मनुष्याला बाहेर न्यावयास हवे होते, तो जवळजवळ पंचाण्णव वर्षांचा होता. तो *तसाच* होता, पूर्ण वाकलेला, आणि फक्त वरच्या बाजूला थोडे केस; तुम्हाला माहीत आहे, *अशा* प्रकारे. तेथे बाहेर आला, आणि त्याने प्रचार करायला सुरुवात केली, म्हणाला, "हूप, हालेलुयाह! गौरव असो!" वर आणि खाली अशाप्रकारे उड्या मारू लागला. म्हणाला, "ओह, तुमच्याकडे येथे मला प्रचार करण्यासाठी पुरेशी खोली नाही." आणि मंचावरून खाली उतरला; त्याला शक्य होईल त्याप्रमाणे गेला, आणि तो फक्त विसार आहे. ओह!

178 पवित्र आत्मा काय करतो? ओह, येथे चांगली जागा आहे, मला पुढच्या अध्यायाचे पहिले वचन वाचू द्या. मी वाचू शकतो काय? ते बरोबर ओह काय? म्हणालो, "आमेन".

[मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] ठीक आहे, दुसऱ्या अध्यायातील पहिले वचन, लवकर. लक्ष द्या. "तुम्ही जे होता…"

*तुम्ही: आपले अपराध आणि आपली पातके ह्यामुळे मृत झालेला होता.*

179 "तुमच्यामध्ये त्याने जीवन घातले." *जीवन* म्हणजे काय. "जीवंत करणे," तूम्ही जाण्याच्या मार्गावर होता, परंतु त्याने बयानाची रक्कम देऊन तुम्हाला जीवंत केले. तेव्हा काय असेल जेव्हा तुम्हाला खरोखर सर्व नफ्यासह तुम्हाला ते मिळेल? ओह! ह्यात आश्चर्य नाही पॉल, तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलून नेव्यात आला, म्हणाला, "डोळ्यानी पहिले नाही; कानांनी ऐकले नाही; मनुष्याच्या मनातही आले नाही, देवावर प्रीती करणाऱ्यांसाठी ते (सज्ज करण्यात) आले." ते काय असेल! तुम्ही त्या अवर्णनीय आणि महिमेने भरलेल्या आनंदाविषयी बोलत आहा! ओह! ओह! तुम्ही जे आपल्या अपराधात आणि पातकात मृत झालेले होता, त्याने जीवंत केले छायेद्वारे छायेच्या छाये द्वारे छाये ते काय असेल जेव्हा तुम्ही छायेच्या छाये मध्ये छाये मध्ये याल, छाया नंतर छाया खाडीमध्ये, खाडी नदीमध्ये, नदी समुद्रामध्ये?

180 आणि ते काय असेल जेव्हा तुम्ही मुक्तीच्या मार्गावर असाल, एका नवीन कोऱ्या शरीरासह, तुम्ही पुन्हा एक तरूण मनुष्यात पूर्णत: बदलले जाणार, किंवा तरूण स्त्री, तुम्ही ह्यापुढे कधीच मरणार नाही? आणि तुम्ही खाली पृथ्वीवर पाहाल, आणि विचार कराल, "मी काही द्राक्षे आणि काही चांगले थंड पाण्याचा स्वाद घेऊ शकला असता तर! परंतु, तुम्हाला माहीत आहे येथे मला त्याची गरज नाही. परंतु कोणे एके दिवस येशू येत आहे, आणि हे स्वर्गीय शरीर, हे दैवी शरीर ज्यात मी राहात आहे…" तो स्त्रींच्या उदरातून ह्यापुढे येणार नाही, ते ह्यापुढे लैंगिक वासनेद्वारे येणार नाही; परंतु कारण त्याचा जन्म लैंगिक इच्छेद्वारे झाला नव्हता. माझे पुनरुत्थान त्याशिवाय होणार, आणि तो ऐके दिवशी बोलेल. आणि ख्रिस्तात मेलेले उठतील, आणि ते शरीर ज्यात मी राहत होतो ते पुनरुत्थित होऊन गौरवी शरीरात प्रवेश करील; आणि मी चालेन आणि मी बोलेन, आणि मी जगेन आणि मी आनंद करीन (हालेलुयाह), मी सार्वकालिक युगात जगेन जे आपला प्रभू, येशू ख्रिस्ताद्वारे येणार आहे. तेथेच तू आहेस, भावा, तेच तर शुभ वर्तमान आहे!

181 "ज्यामुळे मी सुद्धा," पौल सांगत आहे की तो आता काय आहे. मी हे बाकीचे वाचेन आणि मग आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहोत. "वतन मिळेपर्यंत, हा आपल्या वतनाचा विसार आहे, देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून."

> *म्हणून तुमच्या ठायी असलेल्या प्रभू येशूवरचा विश्वास* (मी ऐकले आहे की तुम्ही ह्या गोष्टीत विश्वास ठेवता, मी ऐकले की तुम्ही खरोखर, पूर्वनियुक्ती, सार्वकालिक जीवन, आणि तारण, आणि अशाच गोष्टींवर विश्वास ठेवता) *आणि सर्व पवित्र जनासंबंधाने तूम्ही व्यक्त केलेली प्रीती ह्याविषयी ऐकून,*
>
> *मी ही तुम्हासाठी आभार मानण्यात खंड पडू* देत *नसतो; मी आपल्या प्रार्थनांमध्ये तुमची आठवण करून असे मागतो की;*
>
> *आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा देव जो वैभवशाली पिता, ह्याने तुम्हाला आपल्या ओळखीसंबंधीच्या ज्ञानाचा व प्रकटीकरणाचा आत्मा द्यावा:* त्याला स्वतःला तुम्हाला नेहमी प्रगट करीत राहील, कृपेवरून कृपेत वाढत राहील, सामर्थ्यापासून सामर्थ्य, गौरवावर गौरव, मागे पडणे नाही; आणि परंतु गौरवांतून गौरवाकडे, चालत राहा. मी तुमच्यासाठी प्रार्थना करीत राहील.
>
> *तुमचे* अंत:चक्षू *प्रकाशीत होतील…*

182 तुम्हाला माहीत आहे, बायबल मध्ये सांगितले आहे तुम्ही आंधळे होता आणि ते तुम्हाला ते माहीत नाही. परंतु येथे पौल म्हणतो, “मी प्रार्थना करतो की तुमचे अंत:चक्षू प्रकाशित…” तुम्हाला तुमच्या हृदयाने आकलन होते. त्याच विषयी तो बोलत आहे. तुम्ही तुमच्या डोळ्याने पाहता, परंतु तुम्ही तुमच्या हृदयाने समजता. तुम्ही डोळ्यांनी पाहता परंतु हृदयाने तुम्ही पाहता. तुम्हाला ते माहीत आहे. ठीक आहे. “जेणेकरून गौरवाचा देव…” आपण पाहूया, 18 वे वचन म्हणजे त्यामुळे

*तुमचे अंत:चक्षू प्रकाशित होऊन त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती, पवित्र जनांमध्ये त्याने दिलेल्या ‘वतनाच्या’ वैभवाची समृध्दी केवढी.*

*आणि जे आपण विश्वास ठेवणारे त्या आपणांविषयीच्या त्याच्या सामर्थ्याचे अपार महत्त्व* (काय म्हणता! ते म्हणतात सामर्थ्य गेले आहे? सामर्थ्य अजूनपर्यंत मिळाले नाही)…*ते काय हे तुम्ही त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवरून ओळखून घ्यावे.*

तुम्ही ज्यांनी त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवर विश्वास ठेवला आहे. मी अशी प्रार्थना करितो की देव त्याचे सामर्थ्य तुमच्यावर ओतो. पाहा?

*त्याने तीच कृती ख्रिस्ताच्या ठायी दाखवून त्याला मेलेल्यांतून उठविले, आणि त्याला स्वर्गीय स्थानात आपल्या उजवीकडे बसविले,*

*सर्व* सत्ता…, अधिकार…, *सामर्थ्य…., धनीपणा, आणि प्रत्येक नाव जे ठेवले…*

183 ओह, ओह, ओह!…नाही, मी करू नये. आपण ह्या रात्री विश्रांती निश्चितच घेऊ शकतो.

*सांप्रत आणि* भावी युगांतील *कोणतेही नाव घ्या.*

184 प्रत्येक नाव काय आहे? प्रत्येक व्यक्तीचे प्रत्येक नाव कोणते नाव धारण करील? [मंडळी म्हणते, “येशू.”—संपा.] पूर्ण स्वर्गाला येशू नाव दिले जाईल. पूर्ण मंडळीला येशू नाव दिले जाईल. प्रत्येक वस्तूला येशू नाव दिले जाईल, कारण ते एकच नाव जे देवाचे होते. त्याला यहोवा म्हणतात; यहोवा यिरे, देवाने पुरविलेले अर्पण त्याला यहोवा–राफा, देव जो तुम्हाला आरोग्य देतो; यहोवा, प्रभूचा झेंडा, मनरशे, आणि येहोवा, वेगवेगळे यहोवा. त्याला प्रभात तारा म्हटले आहे. त्याला पिता म्हणतात, त्याला पुत्र म्हणतात, त्याला पवित्र आत्मा म्हणतात. त्याला अल्फा म्हणतात, त्याला ओमेगा म्हणतात. त्याला आदी म्हणतात, त्याला अंत म्हणतात. त्याला फांदी म्हणतात. ओह, त्याला म्हणतात… त्याला सर्व प्रकारच्या उपाध्या देऊन संबोधले जाते, परंतु त्याचे नाव एकच आहे.

185 त्याच विषयी मत्तय बोलत होता, जेव्हा तो म्हणाला, “तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा, त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.” अनेक नावांत नाही, “पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावाने.” पिता हे नाव नाही, पुत्र हे नाव नाही, पवित्र आत्मा हे नाव नाही. ती नावाची उपाधी आहे. ते देवाच्या तीन गुणधर्मांचे नाव आहे. त्याचे नाव काय होते? देवदूत म्हणाला, “तुम्ही त्याचे नाव…”[मंडळी म्हणते, “येशू.”—संपा.] “कारण तो त्याच्या लोकांना त्यांच्या पापांपासून सोडवील.” तेच कारण आहे की बायबलमध्ये त्या सर्वांचा बाप्तिस्मा अशा प्रकारे झाला. त्याच प्रकारे संत आगोस्तीनने इंग्लेंडच्या राजाला बाप्तिस्मा दिला, अंदाजे दिडशे दोनशे वर्षे ख्रिस्ताच्या मृत्यू नंतर, येशू ख्रिस्ताच्या नावाने. ठीक आहे.

*आणि सर्व* सत्ता, अधिकार, *सामर्थ्य, धनीपणा, सांप्रत आणि भावी युगांतील कोणतेही नाव घ्या.*

*आणि त्याने* सर्व *काही त्याच्या* पायाखाली *ठेवले, त्याने सर्वांवर मस्तक असे व्हावे म्हणून त्यास मंडळीला दिले,*

*जे त्याचे शरीर आहे,...*

186 आता, जर माझ्या शरीराला सर्व गोष्टींवर अधिकार आहे, मग माझे शरीर ते आहे जे मी आहे. ते बरोबर आहे क? तोच मी आहे, त्याच प्रकारे तुम्ही मला ओळखता. ते बरोबर आहे काय? बरे मग, जे सर्व देवात होते, त्याने ते येशुमध्ये ओतले, कारण त्याच्याठायी देवपणाची सर्व पूर्णत: मुर्तिमान वसते. हे बरोबर आहे काय? आणि जे सर्व येशुमध्ये होते, त्याने ते मंडळीत ओतले, "ही मी जी कृत्ये करितो ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यांपेक्षा मोठी करील कारण मी पित्याकडे जातो."

*हेच त्याचे शरीर आहे, जो सर्वांना सर्व काही भरतो त्याने ती भरलेली आहे.*

187 ओह, मला ते किती आवडते! मला ते किती आवडते! त्या दिवशी मी एक पुस्तक वाचीत होतो जे मी आफ्रिकेतील एक सेवकाकडे गेलो होतो त्याविषयी आहे. ते ह्यापूर्वी कधीच वाचले नव्हते किती जणांनी हे पुस्तक आतापर्यंत वाचले आहे, *संदेष्टा आफ्रिकेस भेट देतो?* त्यामध्ये मी एका लहान भारतीय मुलाकडे पाहात होतो. किती जणांनी ते चित्र पाहिलेले आहे?

188 मी काही सुवार्तिकांना, आजाऱ्यांसाठी प्रार्थना करताना, पंधरा किंवा अधिक वर्षांअगोदर ऐकले आहे, तो म्हणाला, "मी कधीही चमत्कार होताना माझ्या आयुष्यात पाहिले नाही." तो म्हणाला, "मी लोक पाहिले आहेत जे म्हणतात त्यांना डोकेदुखी आहे, बरे झाले. मी लोक पाहिले आहे जे म्हणतात त्यांना पोटदुखी आहे, बरे झाले, आणि असेच काही. परंतु चमत्कार, काहीतरी जे निर्माण केलेले आहे आणि काहीतरी बनविलेले..."

189 मला वाटले की तो मुलगा तेथे उभा राहिला आणि ते पाहिले. त्या भारतीय मुलाचा एक पाय *इतका* मोठा झाला होता, त्यांच्यातील एक. दुसरा सामान्य पाय होता एका मनुष्याच्या पाया प्रमाणे. आणि जर तुम्ही पाहिले, त्याची जोडणी, त्याचे बूट अंदाजे चौदा इंच किंवा पंधरा इंच उंच ह्या सारखे होते. त्यांच्या तळाशी लोखंडी पट्टी होती. त्याचे बूट दोन लांब मापावर उभारलेले होते. तो तेथे चालत आला जेथे मी उभा होतो, त्यांनी त्याला तेथे वर आणले. त्याच्याकडे दोन कुबड्या होत्या. हे मोठे लोखंडी बूट आणि त्याप्रकारे खाली टाकून आला. मी त्याच्या पायाकडे बघितले, तो जवळपास *इतका* मोठा होता.

190 आता, ते लोक मुसलमान, मुसलमान होते, तुम्हाला आठवते की मागील रविवारी जेव्हा मी तुम्हाला वर्तमान पत्रात काय होते ते वाचून दाखवले? ते माझ्याकडे येत आहे, आफ्रिकेतून, माझ्याकडे ते आपल्या मिशनरी भाऊ स्ट्रीकर कडून पाठवण्यात आले होते. तेथे एक लेख होता त्यावर बीली ग्राहम ने कशी प्रतिक्रिया दिली. अगदी बरोबर, ते मुसलमानांना थेट समुद्रात ढकलत आहेत. ते काय आहे? मिशनरी त्यांचे कार्यक्षेत्र सोडीत आहेत. तेथे जास्त वेळ थांबण्याचा काय उपयोग आहे, ते फक्त पक्षप्रतोदाने काढलेला फतवा आहेत.

191 मी बीली ग्रॅहमवर प्रेम करतो, आणि वाटते की तो एक देवाचा अद्भूत मनुष्य आहे. परंतु बीली ग्रॅहमने त्याच्यावर काय दोषारोप करायला हवा होता, म्हणाला, "एक मिनिट

थांबा…” जर काही स्वतःसताठ करणारे बाप्टिस्ट त्याला ते करू दिले असते, तर मी विश्वास ठेवतो त्याने ते केले असते. मी विश्वास ठेवतो बीली ग्रॅहम एक देवाचा मनुष्य आहे. परंतु जर तो म्हणाला असता, “एक मिनीट थांबा! मी शुभवर्तमानाचा एक सेवक आहे. तू जुन्या करारावर विश्वास ठेवतो, आणि तू म्हणतो, की येशू कोणीच नव्हता परंतु एक मनुष्य होता. मी तुला चर्चेसाठी आव्हान देतो.” मी सैतानाचे आव्हान स्विकारण्यावर विश्वास ठेवीत नाही, नाही महाशय, परंतु मी त्याला पुन्हा आव्हान केले, आणि म्हणालो, “तू आणि मी आपण एकत्र येऊया. मी दैवशास्त्राचा तज्ञ आहे.” बीली ग्राहम एक दैवशास्त्राचा तज्ञ आहे. “मला तुला ह्यावर आव्हान देऊ दे, आणि मला तुला हे सिध्द करू दे की येशूच ख्रिस्त होता, आता, जेव्हा ते दैवी आरोग्याकडे येतो माझ्याकडे ती दाने नाहीत, परंतु आमच्याकडे काही भाऊ आहेत जे ते करतात. आता, तू जर त्या लोकांना तेथे आणू इच्छितो, मला त्यांच्यातील एकाला बोलवू दे, ओरल रॉबर्टस किंवा कोणीतरी, कोणीतरी ज्याच्याकडे एक मोठी सेवकाई आहे जो खरोखरीच तेथे येऊ शकेल.” तेथे या, आणि मग बघा काय घडते, म्हणाला, “ख्रिस्तीत्त्व ते नाही जसा तुम्ही विचार करता.”

192 आता प्रत्येकाला वाईट वाटले कारण तो निघून गेला आणि त्याला सोडले. अर्थातच आता, मी विश्वास ठेवत नाही की सैतान तुम्हाला आव्हान देतो. मी त्याप्रकारे त्याच्या तोंडावर थुंकलो. आणि त्याच्यापासून दूर गेलो. ते बरोबर आहे. परंतु जेव्हा असे ठिकाण येते जेथे…बीलीने त्या मुसलमानास *असे* वाटण्यास लावले असते की ते लहानसे रानटी झुडूपासारखे आहेत. तो बायबल घेऊ शकला असता आणि यशया 9:6 काढले असते, आणि म्हटले असते, “तो कोणाविषयी बोलत होता, ‘आम्हासाठी बाळ जन्मला आहे, आम्हास पुत्र दिला आहे’? हा मनुष्य कोण आहे? तो कोण होता ज्याविषयी तो बोलत होता? हा संदेष्टा कोण होता? हा मसीहा कोण होता जो येणार होता? मला दाखवा त्याने कुठे त्याला मोहम्मदामध्ये निर्माण केले. ‘तो आमच्या अपराधामुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला, आम्हाला शांती देणारी शिक्षा त्यास झाली, त्यांस बसलेल्या फटक्यांनी आम्हास आरोग्य प्राप्त झाले.’ ते मला मोहम्मदामध्ये दाखव. तो कसा रडला, ‘माझ्या देवा, माझ्या देवा, तू मला का सोडले? त्यांनी माझे हात आणि माझे पाय विन्दिले,’ आणि तसेच पुढे? मला तुझ्या स्वतःच्या शब्दाद्वारे दाखव, तुझ्या स्वतःच्या कराराद्वारे दाखव.” त्याने त्या मुसलमानाला इतक्या वाईट रीतीने तडाखा दिला की तो कुठे आहे हे त्याला कळू शकले नाही. ते बरोबर आहे.

193 परंतु जेव्हा वर्तमानपत्र पालटले, त्याचे मला वाईट वाटले, कशामुळे माझे हृदय धडधडू लागले. जेव्हा ते तेथे म्हणाले, “जरी बीलीला आधार द्यावा लागला होता आणि आधार दिला, मुसलमान कसे सांगू शकतात की ते चुकीचे आहे,” म्हणाला, “जेव्हा आदरणीय विलीयम ब्रॅन्हम दर्बन, साउथ आफ्रिका येथे होते अविवादीत चमत्कारानंतर चमत्कार, दैवी सामर्थ्य, जेव्हा दहा हजार. मुसलमान त्यांच्या तोंडावर एका वेळेस पडले आणि त्यांचे जीवन येशू ख्रिस्ताला समर्पित केले.” पूर्णपणे त्यांना त्याविषयी माहीत होते. त्यांना मूलतत्त्व विषयी माहीत होते. तुम्ही मला ते सांगितले नाही काय.

194 एकदा तेथे एक जण येशूकडे आला, म्हणाला, “रब्बी!” तुम्हाला माहीत आहे तो परुशी होता. म्हणाला, “आपण देवापासून आलेले शिक्षक आहात. हे आम्हाला ठाऊक आहे; कारण ही जी चिन्हे आपण करिता ती देव बरोबर असल्यावाचून कोणालाही करिता येत नाहीत. आम्हाला समजते. आम्हाला हे ठाऊक आहे. परंतु आम्ही ते फक्त कबूल करू शकत नाही; पाहा, कारण जर आम्ही करतो, तर, आम्हाला आमच्या मंडळीतून बाहेर काढले जाईल. पाहा, आम्ही आमची प्रतिष्ठा गमवू.” आणि म्हणून येशू म्हणाला, त्याला सांगू लागला त्याचा पुन्हा नव्याने जन्म झाला पाहिजे.

195 त्या मुसलमान मुलावर, जेव्हा तो तेथे उभा होता, तेथे त्याचा फोटो आहे. कॅमेरा खोटा फोटो घेत नाही. तेथे तो उभा आहे, एक पाय खूप छोटा (अंदाजे चौदा इंच) दुसऱ्या पायापेक्षा, त्या लोखंडी बूटावर उभा आहे. त्याला म्हणालो, मी म्हणालो, “तू इंग्लीश बोलतोस?”

196 “नाही, महाशय.” इंग्रजी बोलू शकत नाही. दुभाष्या म्हणाला, “तो इंग्रजी बोलत नाही.”

“तू ह्या स्थितीत कधी पासून आहेस.” दुभाष्याने त्याला विचारले.

“जन्मापासून.”

“तू पाय हलवू शकतोस का?”

“नाही, महाशय.”

“तू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवतोस काय?”

म्हणाला, “मी मुसलमान आहे.”

मी म्हणालो, “तू येशू ख्रिस्ताला स्विकारशील काय जर त्याने तुला बरे केले?”

197 “जर त्याने मला बरे केले तर, मी येशू ख्रिस्ताला माझा तारणारा म्हणून स्विकारीन.”

198 “जर त्याने ते बरे केले, तो पाय दुसऱ्या पायासारखा झाला, तू त्याला स्विकारशील काय?”

“मी स्विकारीन.”

199 “बरे, देवा, तू काय करशील?” ही पुढची गोष्ट आहे; सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. भाऊ माईक, ती संवेदना आहे. तो काय सांगत आहे हे पाहण्यासाठी मी एक मिनीटासाठी थांबलो. मी तेथे पाहिले आणि मी त्या मुलाला जाताना, चालताना, भीतींच्या बाजूला अशा प्रकारे पाहिले. मी म्हणालो, “तुमच्यातील किती मुसलमान हे स्विकार करतील? येथे एक मुसलमान मुलगा आहे; त्याच्याकडे पाहा, त्याला तेथे वर उभे करा.” मी म्हणालो, “तुम्ही डॉक्टर, तुम्हाला त्याच्याकडे पहायचे आहे का? तेथे तो उभा आहे.” ओह, तुम्हाला समजले की तुम्ही कोठे आहात. पाहा, तुम्हाला माहीत आहे का तुम्ही कोठे उभे आहात. कोणी नाही…तेथे तो होता.

200 मी म्हणालो, “ह्या मार्गाने चाल मुला” आणि त्यांनी त्याला पाहिले, येथे तो आला. (“ता–लम्प, ता–लम्प.”) मी म्हणालो, “बारा, चौदा इंच लहान दिसत होता. अंदाजे *त्या* प्रकारे.”

“होय.”

201 मी म्हणालो, “परंतु येशू ख्रिस्त देवाचा पुत्र त्याला बरे करू शकतो. तुम्ही मुसलमान ह्यावर विश्वास ठेवाल आणि त्याला वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकाराल काय?”

202 तेथे हजारो जणांनी काळे हात अशाप्रकारे वर केले. “असो, प्रभू, आता ही वेळ आहे.” मी म्हणालो, “स्वर्गीय पित्या, जर तू आजपर्यंत उत्तर दिले आहेस, आता मला उत्तर दे, हे तुझ्या गौरवासाठी होऊदे, हे तुझ्यासाठी होऊ दे. मी प्रार्थना तुझ्याकडे करितो ह्या मुलाला बरे कर.” मी त्याप्रमाणे त्याच्यावर प्रार्थना केली.

203 मी म्हणालो, “तुझे बूट काढ.” त्याने माझ्याकडे खरोखरी चमत्कारीकरीला पाहिले, दुभाष्या. मी म्हणालो, “तुझे बूट काढ.” त्याने ते सोडले. कारण मी दृष्टांतात ते पाहिले, काय घडणार आहे. त्याने ती गोष्ट काढली. जेव्हा त्याने ते परत घेतले आणि माझ्याकडे

चालत आला, दोन्ही पाय अगदी सारखे, जसे दोघेही नव्यासारखे चालत होते. मी म्हणालो, “तुला मागे आणि पुढे चालायचे आहे काय?”

204 त्याने रडायला सुरुवात केली, मागे आणि पुढे जाऊ लागला, त्याला कळत नव्हते की काय करावे. तसे चालत असता, तो म्हणाला, “ओ अल्लाह! अल्लाह!”

मी म्हणालो, “येशू! येशू!”

ओह! ओह! ओह! “ओ येशू! येशू,” नंतर “येशू! येशू,” त्या सारखे.

मी म्हणालो, “तेथे काही प्रश्न आहेत काय, काही प्रश्न?”

205 ज्युलियस स्टँस्क्लेव, त्याला कितीजण ओळखतात? भाऊ स्टँस्क्लेव येथे मंडळीत आला आहे; आताच—आताच जर्मनीला गेला. म्हणाला, “फक्त एक मिनीट, भाऊ ब्रॅन्हम फक्त एक मिनीट.” छायाचित्रकारास लगेच आणण्यासाठी. “मी त्याचा फोटो काढू शकतो काय?”

मी म्हणालो, “स्वतःची मदत कर.”

206 “*येथे* चाल, तुझे बूट *येथे* उभे कर.” तो तसा उभा राहिला, त्या मुलाचा तेथे फोटो घ्या, दोन्ही पाय अगदी सामान्य आणि सरळ जसे ते होऊ शकतील. तेथे त्याचे जूने बूट आणि जोडणी, *त्या* सारखी, *त्या* सारखे.

207 मी म्हणालो, “तुमच्यातील किती मुसलमान आता मोहम्मदला संदेष्टा म्हणून नाकारता, आणि येशू–वर देवाचा पुत्र म्हणून विश्वास ठेवता आणि त्याला तुमचा व्यक्तिगत तारणारा म्हणून स्विकारता?” दहा हजार हात वर केले. हालेलुयाह!...

208 ते पुन्हा ठेवण्याचा प्रयत्न करतात, कारण आम्ही “देवविषयक वेडे,” ते आम्हाला म्हणतात. तुम्ही पाहिले. अगदी त्याच प्रकारे, देव चालत आहे. तो त्याच्या मंडळीला पुन:स्थापित आहे, तो ते अति फार, उदंड सर्वांच्या वर करीत आहे जे आपण अगदी करू शकत नाही किंवा विचार करू शकत नाही. तो आज रात्री तसाच देव आहे जसा तो नेहमी होता.

209 म्हणून, लहान मित्रांनो, मला तुम्हाला आता काहीतरी सांगू द्या. माझे प्रिय मौल्यवान लोकांनो, तुम्ही येथे ह्या देशात, आणि दुसरे जे समुद्राच्या पलिकडे असलेल्या देशात आणि जेथे कोठे तुम्ही आहात, तुम्ही भयभीत होऊ नका. सर्वकाही ठीक आहे, देव, पिता, जगाच्या स्थापने अगोदर, सर्वकाही जाणून होता की काय घडणार आहे. सर्वकाही योग्यरितीने चाललय. तुम्ही त्याच्यावर प्रेम करता? तुमचे हृदय योग्य ठेवा.

210 आणि, लक्षात ठेवा, जेव्हा हा श्वास जीवनांतून श्वास सोडून जातो, तुम्ही वृध्द लोक किंवा तुम्हा तरूण लोकांना आणि तुम्ही आईंनो, जेव्हा तुम्ही तुमच्या लहान बाळांना बघता, ती लहान मुलगी मृत्यू पावली जेव्हा ती आठ दिवसांची किंवा पाच दिवसांची ही नव्हती, ती एक सुंदर तरुण स्त्री असेल जेव्हा तुम्ही तिला पाहाल. ते वृध्द आजोबा जे पूर्णपणे वाकले होते, जे जराही पाहू शकत नव्हते की ते कुठे चालले आहेत; जेव्हा तुम्ही त्यांना बघाल, आजी, तो एक सुरेख, देखणा तरुण पुरुष असेल, अगदी इतका तरुण जितका अंदाजे पंचवीसवर्षांचा, अगदी सौंदर्यात तारुण्याच्या आणि तो तसा कायम राहील. तु त्याच्या हाताला स्पर्श करू शकते, तू त्याच्याशी हात मिळवू शकते. तु त्याच्याभोवती तुझे हात घालू शकते, परंतु तो तुझा “पती,” नसणार, तो तुझा “भाऊ” असेल. ओह, बापरे! तो “पती” पेक्षाही खूप थोर असेल. तुला वाटते तू त्याच्यावर प्रेम करतेस? नक्कीच तू केले. परंतु ते *फिलोओ* होते; तू *अगापे* मिळेपर्यंत थांब. खरे दैवी प्रेम मिळेपर्यंत थांबा, आणि मग पाहा ते काय आहे. येथे हा जुना धुमसणाऱ्या कचऱ्याच्या ढीगासारखा आहे, हे

चांगले नाही, ते–ते नाही. फक्त एक गोष्टीचा मी तुला सल्ला देतो की, आता कर, ती ही आहे, माझ्या–माझ्या–माझ्या मित्रांनो…

211 थोड्या वेळानंतर मी…तुम्हाला माझ्यासाठी आवडेल की दूसरे दोन अध्याय कधीतरी घेईन? प्रभू…मला थोडी विश्रांती अगोदर घेतली पाहिजे चटुका येथे जाण्यापूर्वी. आता, मी ह्या गोष्टी ह्या सभेंत प्रचार करू शकत नाही. तेथे खूप निरनिराळे…विश्वास आहेत. तुम्ही पाहिले? ही फक्त एकच मंडळी आहे. पाहा? मी करु शकत नाही…येथे मला जे वाटेल ते प्रचार करण्याचा अधिकार आहे. हे माझे प्रार्थना मंदिर आहे, पाहा, आणि मी तुम्हाला सांगत आहे. आता, मी विश्वास करतो त्या लोकांचे तारण झाले आहे. होय, महाशय, मी खरोखरीच ते विश्वास करतो. परंतु, ओह, जेव्हा तुम्ही कोठे चालला आहात ते तुम्हाला माहीत असते तेव्हा आणखी किती चालायचे आहे हे तुम्हाला कळते. किती जणांना माहीत आहे की तुम्ही काय करीत आहा, तुम्ही पाहा, झोकांड्या खाण्याऐवजी, अडखळण्याऐवजी. आपण फक्त प्रकाशात उभे राहूया, आणि प्रकाशात चालूया आणि जाणून घेऊया की कोणत्या मार्गासाठी तुम्हाला अध्यक्ष केले आहे. ते बरोबर आहे. प्रभू तुमच्यासह असो.

212 आणि जर आता येथे असलेल्या तुमच्यातील प्रत्येक जणांची स्थितीप्रमाणे स्थापना झालेली नसेल. तुम्ही कदाचित काही नसाल परंतु एक गृहिणी. तर, तुम्ही म्हणा, "भाऊ ब्रॅन्हम, मी माझ्या जीवनात कधीच काही केले नाही. मी एक प्रचारक नाही." ठीक आहे, देवाने कदाचित तुम्हाला येथे तुमच्या कुटुंबातील मुले वाढविण्याकरिता आणले असेल जे प्रचारक असतील दशलक्ष जीव ख्रिस्ताकडे पाठवतील. तुम्ही येथे असले पाहिजे. तुम्ही येथे एका उद्देशांसाठी आहात. तुम्हाला ते माहीत आहे काय?

213 ठीक आहे, तुम्ही म्हणा, "जे सर्व मी आतापर्यंत केले ते ह्या मातीच्या ढेकळावर पेरणी केली. आणि मी काढून घेतले, संध्याकाळी लवकर, मला ठाऊक नव्हते की माझ्या मुलांचा उदरनिर्वाह कसा करू; मी त्या गरीब लहान व्यक्तीकडे पाहिले ज्याच्या पायात बूट नव्हते. मी बसलो आणि रडलो. माझ्याकडे एक जुनी बगी आहे आणि मी आणि मॅव प्रार्थनेला गेलो." तुम्ही काळजी करू नका, भाऊ. तुम्ही फक्त त्याच्यावर प्रेम करीत राहा. त्याचा तुमच्यासाठी एक उद्देश आहे. तुम्ही फक्त बरोबर मार्गात राहा जसे तुम्ही आहात, असेच सरळ मार्गाने जात राहा. पाहा? तुम्ही कदाचित कधीच संदेश प्रचार करणार नाहीत, परंतु तुम्ही एकाचे पणजोबा असाल जो ते करील.

214 तुम्हाला माहीत आहे की देवाने मान्यता दिली (आपण आता पाहुया, त्याचे नाव काय होत?) लेवींना दशमांश देण्यासाठी जेव्हा तो अब्राहामामध्ये बीजरूपाने होता, जेव्हा त्याला मलकीसदेक भेटला. किती जणांना हे माहीत आहे? आणि आपण पाहुया. अब्राहामाला इसहाक झाला, इसहाकाला याकोब, याकोबाला लेवी, जो पिता आजोबा, पणजोबा होता; जेव्हा तो पोटी, बीजरूपाने त्याच्या पणजोबात होता, बायबलने त्याला मानमान्यता दिली मलकीसदेकाला दशमांश देण्यासाठी, माझ्या, माझ्या, माझ्या! भावा! ओह!…मी…

215 तेथे एक लहान …एक लहान इंग्रजीमाणूस इंग्लेंडमध्ये तेथे एका रात्रीत परिवर्तन झाले, तो म्हणाला, "मी इतका आनंदी आहे! मी इतका आनंदित आहे!"

216 होय, ते सत्य आहे हे समजून खूप आनंद झाला! आणि एका गौरवी दिवशी, मला माहीत नाही तो दिवस केव्हा असेल, परंतु जर तो दृष्टांत होता, मी सांगत नाही मी येथे होतो. लक्षात ठेवा, नेहमी हे मनात ठेवा, टेपमध्ये असणारे कदाचित असे करतील. कसेही असले तरी मी दृष्टांतामध्ये होतो, किंवा आत्म्यामध्ये जात असलो, मला माहीत नाही.

परंतु ते इतके खरे असते जसे मी माझा भाऊ नेव्हिल ह्यास *असे* धरून ठेवले आहे, अगदी तसे खरे. आणि मी त्या लोकांकडे बघू शकतो आणि बोलू शकतो. आणि तेथे माझी पहिली पत्नी उभी होती, ती ओरडली नाही "माझा पती," ती म्हणाली "माझा प्रिय भाऊ."

तेथे एक मुलगी उभी होती जिच्यासह मी खूप वर्षांअगोदर जात असे.

217 कदाचित तिचे काही लोक येथे बसलेले आहेत, उत्तीका येथील ॲलिस लुवीस, खूप सुरेख, उदात्त ख्रिस्ती मुलगी. जीवनात जरा उशीरा लग्न झाले, आणि तिचे पहिले मुल झाले आणि मुलाच्या जन्मावेळी ती मृत्यू पावली. ॲलिस लुवीस, मी दफन घरी तिला पहाण्याकरिता गेलो. मी फक्त घरात गेलो, मी ऐकले ती मृत झाली होती. मी तेथे चालत गेलो, त्या खोलीत कोणी नव्हते, मी म्हणालो, "तेथे ती स्त्री आहे का येथे, श्रीमती..." तिचे नावं इमर्की होते. आणि तिने एका सुरेख ख्रिस्ती मुलाशी विवाह केला, आणि ती एक सुरेख ख्रिस्ती मुलगी होती. मी त्या मुलीबरोबर प्रत्येक ठिकाणी जाते असे, सर्वप्रकारच्या ठिकाणी आणि सर्व गोष्टी. आणि अगदी लहान मुल, अठरा एकोणीस वर्षे वयाची, सगळीकडे, सुरेख ख्रिस्ती. कधीच तिच्याविषयी काहीच माहीत नव्हते परंतु खरी ख्रिस्ती. आणि मी पापी होतो. परंतु मी तिच्याबरोबर जात असे. मी आत चालत गेलो... आणि तिचा पती नवीन जन्म पावलेला ख्रिस्ती, खरा मनुष्य होता. आणि मला माहीत नव्हते; मला माहीत होते; तिचा मृत्यू झाला होता, मी ते वर्तमानपत्रात पहिले होते. आणि मी खाली गेलो आणि ते मला म्हणाले. मी तेथे कुटसकडे गेलो आणि मी म्हणालो, "तुमच्याकडे श्रीमती इमर्की आहे काय?"

तो म्हणाला, "बीली, ती तेथे खोलीमध्ये आहे."

218 मी तेथे आत गेलो आणि तेथे पेटीच्या बाजूला उभे राहिलो. मला वाटले, "ॲलिस, मी तेथे अतिशय काळोख्या अंधारकोठडीत गेलो, मी काळ्या रस्त्यावरून गेलो. तू आणि मी एकत्र त्या रस्त्यावरून खाली आणि खाली नदीच्या पलीकडे चालत गेलो, जेव्हा ते एका अशा बोटीत ज्यात थेटर असते, तेथे आम्ही खाली बसत असू आणि ते कोलिऑप नाटक ऐकत असू. वर आणि खाली त्या रस्त्याच्या, तू किती चांगली स्त्री होतीस! मी देवाला तुझ्या जीवनासाठी किती धन्यवाद देतो. माझ्या प्रिय बहिणी, विश्राम कर, देवाच्या शांतीत विश्राम कर."

219 आणि दुसऱ्या रात्री दृष्टांतामध्ये, तेथे ती माझ्याकडे धावत आली. ती म्हणाली, "माझ्या पवित्र भावा," आणि तिचे हात माझ्याभोवती टाकले. ओह, ओह, भाऊ आणि बहीणी त्याने मला बदलले आहे. मी ह्यापुढे कधीच त्यासारखी असणार नाही. ते इतके खरे आहे! ते अगदी ते इतके खरे आहे जसे मी तुमच्याकडे पाहात आहे, अगदी खरे. म्हणून तेथे भीती नाही. मी ही रात्र संपण्याअगोदर मृत्यू पावेनही.

220 मी माझ्या लहान, मुलाला जो तेथे मागे, जोसेफला वाढवू इच्छितो. मी त्याला व्यासपीठावर पाहू इच्छितो, जेव्हा मी हे बायबल घेऊ शकेन...जेव्हा मी त्या जागेवर बसेन, मी जोसेफला व्यासपीठावरुन प्रचार करताना पाहीन, एक–एक तरुण पुरुष पवित्र आत्म्याने भरलेला, त्याच्यावर देवाच्या आत्म्याने अभिषेक केलेला. आणि मी विश्वास करतो तो एक संदेष्टा असेल. तो दिवस जेव्हा मी—जेव्हा मी–जेव्हा मी त्याला त्याच्या जन्माच्या सहा वर्षे अगोदर पहिले, तुम्हाला लक्षात आहे मी तुम्हाला सांगताना की तो येणार होता. लक्षात आहे. मी त्याला काय संबोधले, अगदी तेथे वेदीच्या बाजूला, मी काय सांगत आहे हे ठाऊक नसताना, मुलांचे समर्पण करताना, मी म्हणालो, "जोसेफ, तू एक संदेष्टा आहे."

221 आणि दुसऱ्या दिवशी बाहेर अंगणात उभा होतो. तो माझ्याकडे आला, आणि तो म्हणाला, "डॅडी, येशूकडे तुझ्यासारखे हात आहेत का?"

आणि मी म्हणालो, "होय, मुला. का?"

222 तो म्हणाला, "मी माझ्या सायकलवर बसून, साराकडे पाहात होतो" (ती त्याची लहान बहीण) "शाळेतून घरी येण्यासाठी." तेथे बाहेर बसलेला होतो. मी त्याला रस्त्यावर बाहेर जाऊ देत नाही, तो *अशाप्रकारे* मागे बसला होता. आणि म्हणाला, "मी वर बघितले, आणि," म्हणालो, "जेव्हा मी होतो, तेथे तुझ्यासारखे हात, पांढऱ्या बाह्याचे माझ्यावर धरले होते." आणि म्हणाला, "ते वर गेले." म्हणाला, "ते वर जाणारे येशूचे हात होते काय?" मी आईकडे पहिले, आईने माझ्याकडे पहिले. आम्ही खाली श्रीमती वूड्स कडे गेलो. जेथे ती बसली होती. आम्ही त्याला उलट प्रश्न केले, मागे आणि पुढे आणि प्रत्येक प्रकारे आमच्याने शक्य होईल तितके. तो दृष्टांत होता. त्याने तो पाहिला. जेव्हा मी ती वेळ पाहू शकतो की लहान जोसेफ उभा आहे...माझी आशा आहे मी त्याला विवाहीत पाहीपर्यंत जीवंत राहीन, जर येशूने उशीर केला.

223 आणि मी एक म्हातारा मनुष्य आहे, पांढरे केसाच्या बटाने माझ्या मानेभोवती लटकत आहेत. मी पाठविले...मी दोन किंवा तीनापेक्षा जास्त लक्ष जीव ख्रिस्ताकडे पाठवू इच्छितो जर मी करू शकेन. हा माझा निश्चय आहे की पृथ्वीच्या प्रत्येक कोपऱ्यात शुभवर्तमानाचा प्रचार करावा. होय, महाशय. म्हणून, देवा, मला सहाय्य कर, मी ते करीन. म्हणून, जेव्हा मी बघू शकेन की ती वेळ आली आहे, भाऊ माईक.

224 मी त्या वेळेकडे पाहू शकतो, मम्मा, मेडा, मी तिला, माझी प्रिय, बोलावतो, पाहा, ती...आम्ही वृध्द होत आहोत, पाहा तिचे केस पांढरे होत आहेत, आणि आमच्याकडे पाहा दूर जात आहोत, निस्तेज होत आहोत.

225 रिबेका, मी रिबेकासाठी फार आभारी आहे. तिची संगीत शिक्षीका मला त्या रात्री, म्हणाली, "भाऊ ब्रॅन्हम जर तीने हे चालू ठेवले," म्हणाली, "ते सांगणे कठीण आहे की काय करील." पाहा, संगीतात पुढे जात आहे. माझी इच्छा आहे...आणि मला वाटते... मला वाटते साराने मोठ्या पायपेटीवर, बेकी पियानोवर, मी जोसेफला व्यासपीठावर पाहू इच्छितो.

226 जेव्हा मी ते घडताना पाहीन, आणि मी आणि मम्मा थरथरत असू, मी माझ्या जुन्या काठीवर, कोणा रात्री, रस्त्यावरून खाली येताना, आणि मी तेथे पाहू शकेन आणि माझा मुलगा पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने तेथे उभा राहून हेच शुभवर्तमान प्रचार करताना पाहीन. मी हे जुने पुस्तक घेऊ इच्छितो आणि म्हणेन, "मुला हे येथे आहे, ते तुझे आहे. तू हे घेऊन उभे राहा., तू एकाही वचनावर तडजोड करू नको. प्रिया, तू त्यांच्याबरोबर राहा. तू करू नको, तू काळजी करू नको, मी काळजी करीत नाही की तुझ्या विरुध्द कोण आहे, कोण विरुध्द आहे, देव तुझ्यासाठी असेल. तू प्रत्येक वचन जसे तेथे लिहिले आहे तसेच प्रचार कर. आणि डॅडी तुला नदीच्या पलीकडून पाहील." मला तेथे पोहचण्यास आवडेल. आणि तिला माझ्या बाहुन घेण्यास, माझी पत्नी, आणि यार्देन ओलांडून जाण्यास आवडेल.

227 त्या वेळेपर्यंत, देवा, मला कार्यक्षेत्रावर निष्ठावंत राहू दे! मला राहू दे! मी त्याची पर्वा करीत नाही की काय किंमत मोजावी लागेल, किंवा किती. मी काय करू, किंवा *हे*, *ते* किंवा *दुसरे*. मला जीवंत देवाच्या वचनाशी निष्ठावंत आणि प्रामाणिक राहू दे, की जेव्हा तो दिवस येईल आणि मी तेथे पलिकडे जाईन, आणि मी पलिकडे पाहीन आणि म्हणेन, "तेथे तू आहे. ओह, माझ्या बहुमोल मित्रा, माझ्या बहुमोल भावा, माझी बहुमोल बहीण."

228 तरुण प्रचारकांनो, कार्यक्षेत्रात उतरा, कामामध्ये राहा. तुम्ही सर्व तरूण प्रचारकांनो आणि गोष्टी, तुम्ही अवतीभवती बसू नका. तूम्ही नुसतेच बसू नका आणि काहीच करत नाही असे करू नका. पलिकडे जा आणि आत्मे जिंका. काहीतरी करा! जात जा, जात राहा. थांबू नका, तरूण प्रचारकांनो. तेथे देव तुमची अंतकरणे आशीर्वादित करो.

229 तो मला आठवण देतो जेव्हा मी अंदाजे त्या वयाचा होतो, मला वाटते, आणि कदाचित त्याच्यापेक्षा थोडा लहान. मी फक्त अंदाजे वीस की काहीतरी वर्षे वयाचा होतो जेव्हा तेथे कोनशीला घातला होता. मला आठवते मी नीळा कोट आणि पांढऱ्या विजरांची जोडी घालीत असे, आणि तेथे उभा होतो आणि मी तो कोनशीला अंदाजे एकतीस वर्षांमागे घातला होता पाहा, किती लहान मी होतो, मी अगदी मुलगा होतो. तेथे उभा राहून, कोनशीला घालीत होतो. मी एकाही वचनावर तडजोड केली नाही. मी ते तंतोतत पाळले आहे ज्याप्रमाणे ही कोनशीला मी तेथे बसवली आहे. पलिकडे माझी साक्ष घातली जात आहे पलिकडे, जेथे मी बायबलच्या अखेरीस आतील बाजूस लिहिले आहे., आणि फाडून ती त्या कोनशीलेवर बसविली आहे., आणि ती अजूनही तेथे पडलेली आहे. आणि ती स्वर्गातील देवाच्या सार्वकालिक वचनाच्या पानांवर लिहिली जावो. मला शेवटपर्यंत सत्याने उभा राहू दे.

आपण आपली मस्तके आता काही मिनीटासाठी प्रार्थनेसाठी झुकवूया.

230 ह्या रात्री बंद करीत असताना, तो अध्याय, बंद करताना, जे योग्य वाटत नाही. तुमच्याकडे दुसरा असला पाहिजे, आणि तो पुढे जातो आणि त्याच्या मंडळीची तीच्या जागेवर पुर्नस्थापना करतो. देवाची इच्छा असेल तर त्याकडे मी तुम्हाला कधीतरी नेईन. मला आता थोडी विश्रांती घेतली पाहिजे मी चाऊटाउकामध्ये पलिकडे जाण्याआधी, दुसऱ्या मोठ्या सभेसाठी, मग मी तेथून ओकलाहोमा येथे जाईन, तेथून क्लेमथ फॉल्सला नंतर क्लेमथ फॉल्सहून खाली कॅलीफोर्नीयात, वर याकीमामध्ये, मी पुढील १५ ऑगस्ट पर्यंत परत येणार नाही.

231 परंतु पाहा, मला तुम्हाला काही विचारू द्या, जर काहीतरी तुमच्याशी घडले पाहिजे, किंवा मी ती वेळ येण्याआधी, जर मी ती नदी ओलांडून त्या देशात गेलो, किंवा जर तुम्ही ओलांडून त्या वेळेअगोदर त्या देशात गेलात, तर तुम्हाला ह्या रात्री ही खात्री वाटत आहे की आपण तेथे त्या जागेत भेटू? जर तुम्हाला वाटतो तुमचे हात वर करा, म्हणा, “मला माझ्या हृदयात खात्री वाटत आहे.” देव तुमचे हृदय आशीर्वादित करो परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो. जर तेथे एखादा असेल ज्याला खात्री वाटत नाही की ते तेथे भेटतील, आणि ज्यांना बोलायला आवडेल, “माझी आठवण करा, भाऊ ब्रॅन्हम, की माझ्याकडे ती खात्री असेल,” तुमचे हात वर करा, “मीही, तेथे जाऊ इच्छितो.” बाई, परमेश्वर तुला आशीर्वादित करो. परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो.

232 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही ह्या रात्री ही मंडळी तुझ्याकडे आणीत आहोत, प्रत्येक हात, माझ्या माहितीप्रमाणे, वर होता. सर्व परंतु एक व्यक्ती, काही बहुमोल आत्मे येथे मागे बसले आहेत, फक्त जरासे त्रस्त आहे की ते ओलांडून त्या देशात जातील किंवा नाही, जेथे त्यांच्या हृदयात पुरेसे खरे दैवी प्रेम आहे, त्या बहुमोल स्त्रीच्या अंतकरणात, जर ती आज रात्री मृत्यू पावली तर ती त्या देशात येईल; तो तिच्या त्रस्त आत्म्याला देवाच्या वचनदत्त भूमीत नेईल का?

233 स्वर्गातील पित्या, मी येथे ह्या व्यासपीठाकडे उभा राहिलो आणि प्रचार केला, आणि घामाघम झालो, आणि रडलो, आणि विनंती केली, आणि माझी खात्री झाली आहे, मला पुन्हा एकदा तुझ्याकडे मागू दे, प्रभू, मला माझी बहीण जी मागे तेथे आहे तिच्यासाठी मागू

दे; देवा, तीच्या अंतकरणात आज ह्या रात्री घाल: ते दैवी प्रेम, तो देवाचा पवित्र आत्मा, ती शांती जी सर्व समजण्या पलिकडे आहे, की तिला तुझा आत्मा मिळेल, त्या दिवसापर्यंत पवित्र आत्म्याद्वारे शिक्कामोर्तब करो. मी तिला पाहू इच्छितो, प्रभू, जेव्हा आम्ही तो पूल ओलांडू. जर–जर–जर तो ओलांडणे माझा सौभाग्य असेल, जर ते जे तू मला दाखवले ते खरे आहे, आणि मी तेथे ओलांडून पलिकडे गेलो, मी तिला तेथे भेटू इच्छितो. आणि तिला धावताना आणि माझा हात पकडताना पाहू इच्छितो आणि म्हणेल, "माझा बहुमोल भाऊ, ती ती रात्र होती जेथे मला कोणीतरी सांगितले माझा हात वर करण्यास सांगितले, जेव्हा तुम्ही इफिसकराच्या पत्रातून प्रचार करीत होतास. मी माझा हात वर केला, आणि त्यानंतर मला काहीतरी झाले. मी येथे आहे. मी आता सर्वकाळासाठी तरूण आहे." देवा त्या बहूमोल व्यक्तीला ते प्रदान कर.

234 ज्यांनी कोणी त्यांचे हात उभारले आहे की त्यांना पवित्र आत्म्याचा शिक्का मिळाला आहे, देवाचा आत्मा त्यांच्यावर आहे, आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे, त्यांच्या हृदयातील दैवी प्रेमासह त्यांना शिक्कामोर्तब करण्यात आहे आहे. आम्ही त्यांच्यासाठी तुला किती धन्यवाद देतो.

235 पित्या, हे ठाऊक आहे की सर्व जगात ह्या ध्वनिमुद्रित फीत जाणार, कित्येक ध्वनीविस्तारक यंत्रे ह्या व्यासपीठा पलिकडे पसरलेले आहेत; ज्याचा अर्थ आहे की ध्वनीमुद्रित फीत बनविल्या जात आहेत, माझ्या बाजूला तेथे, हा आवाज जगात वेगवेगळ्या भूमीत, सर्वत्र जगभरात जाणार आहे, वीस किंवा तीस वेगवेगळे देश ते ऐकतील, ह्या ध्वनिमुद्रित फीत ऐकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी मी प्रार्थना करतो, ज्यांना सार्वकालिक जीवनाची आशा मिळालेली नाही, ज्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला नाही, ती त्यांच्या हृदयात प्रेमाने येवो, प्रभू, ते प्रदान कर.

236 आणि मी, जर मी त्यांना ह्या जीवनात कधीच पहिले नसेल, जेव्हा मी ओलांडून त्या भूमीत प्रवेश करेन, ते धावून येवोत, आणि मला पकडो (आणि मी त्यांना पकडेन, आणि ते, आम्ही एकमेकांना "बहुमोल भावा!" शुभेच्छा देऊ), म्हणे, "मी इफिसकरांस पत्रावर. केलेली तुझी ध्वनिमुद्रित फीत ऐकली, कशाप्रकारे देवाने सार्वकालिक जीवनासाठी आमची नियुक्ती केली; आणि त्या ध्वनिमुद्रित फितीवर ते होते ज्यांतून मला देवाची वाणी मिळाली आणि पवित्र आत्म्याद्वारे देवाच्या राज्यामध्ये शिक्का मारण्यात आला." ते प्रदान कर पित्या.

237 सर्वांना आरोग्य दे जे आजारी व पीडीत आहेत. तुला गौरव मिळो कारण आम्ही हे सर्व तुला सर्व प्रयत्नांसह प्रभू येशू ख्रिस्त, तुझा पुत्र, ह्याच्या नावात समर्पित करतो. आमेन.

238 येथे कोणी असे आहेत की जे आजारी आहेत आणि इच्छा करतात त्यांच्यावर प्रार्थनेसाठी हात ठेवण्यात यावे? तुम्ही तुमचे हात वर कराल काय? ठीक आहे. तुम्ही शांततेने आता येथे वेदीजवळ चालत याल का? आणि येथे काही क्षणांसाठी उभे राहाल, जोपर्यंत भाऊ नेव्हिल तेथे येतील...

239 ओह, असे वाटते, आजाऱ्यासाठी प्रार्थना करणे, असे वाटते जणूकाही—जणूकाही खाली येत आहे जेथे तुम्हाला माहीत आहे तुम्ही बरोबर कोठे उभे आहात. देवाला ह्या सर्वविषयी माहीत आहे.

240 जेव्हा मी ते गाणे ऐकतो...लक्षात ठेवा, जेव्हा मी जाईन, जर तुम्ही जीवंत असलात तर माझ्यासाठी हे गाणे वाजवा: *फक्त विश्वास ठेवा*. लक्षात ठेवा, मी मेलो नाही, मी ते ऐकताना तुमच्यापासून दूर नसणार. मी मरू शकत नाही. येशूने मला सार्वकालिक जीवन

दिले आहे; तो मला शेवटच्या दिवशी उठवील; मी तुम्हाला भेटेन आणि जर तुम्ही गेलात, मी विश्वास ठेवीन आपण एकमेकांना पुन्हा पाहू.

241 ह्या बहुमोल येथे उभ्या असणाऱ्या पांढऱ्या केसाच्या स्त्रीकडे पाहात आहे. तू एक ख्रिस्ती? त्याच्या आत्म्याने भरलेली, त्याच्या येण्याची वाट पाहात आहे, येथे उभे राहून त्या नावेची येण्यासाठी वाट पाहात आहे. आमेन. ओह, बहिणी…

***दत्तकपणा*** *4* MAR60-0522E

(Adoption 4)

***दत्तकपण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी संध्याकाळी, 22 मे, 1960 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2019 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**छपाईच्या हक्काची सूचना**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS

P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A

www.branham.org.